
रोबो
दिनानाथ मनोहर
ई साहित्य प्रतिष्ठान



# रोबो ( कादंबरी )

लेखक : दिनानाथ मनोहर

ईबुक आवृत्ती : ८ एप्रिल २०१२

ई-बुक प्रकाशन :-
ई-साहित्य प्रतिष्ठान
११०२ ईटर्निटी, ठाणे
संपर्क :- ९८६९९६७६२०

© दिनानाथ मनोहर

डिझाईन :- सुधीर मुळीक

© सर्व हक्क लेखक दिनानाथ मनोहर याच्यांकडे सुरक्षित
ई-पुस्तकात वापरलेली छायाचित्र गुगल सर्च वरून मिळवण्यात
आलेली आहेत

# श्री दिनानाथ मनोहर यांची ओळख

नाव : दिनानाथ केशव मनोहर
अवकाश, ३२ वाघेश्वरी नगर,
नंदुरबार ‘ ४२५५४१२

फोन : ०२५६४२६१००६
मोबा : ९४०३४२२६२७
इमेल : dinamanohar @gmail.com
जन्म : 22 सप्टें.१९४०
शिक्षण : एस.एस.सी.

## कार्य :

आदिवासी, शेतमजूर चळवळीत पुर्णवेळ कार्यकर्ता (श्रमिक संघटना, शहादे)
सदस्य मागोवा ग्रुप
परिवर्तनाचा वाटसरू संपादन
टीम लिडर पश्चिम घाट बचाव मोहीम, नवापूर ते गोवा
आदिवासी साहित्य संमेलन, नंदुरबार, निमंत्रक, संघटक
जनार्थ आदिवासी विकास संस्था शहादा, ट्रस्टी
श्रमवन, पर्यावरण व विकास, बारामती, अध्यक्ष
भारत ज्ञान विज्ञान समुदाय महाराष्ट्र राज्य विद्यमान अध्यक्ष
महाराष्ट्र लोकसंस्कृती मंच, विद्यमान अध्यक्ष
सम्यक साहित्य संमेलन - पुणे अध्यक्ष
अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन - नांदेड विद्यमान अध्यक्ष

सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विषयांवर पुरोगामी नियतकालीकात लेखन
आदिवासी संस्कृती, अवकाश विज्ञान, पर्यावरण ह्या विषयात विशेष रस

## साहित्य निर्मिती :

रोबो (कादंबरी)
कै. ह. ना. आपटे पारितोषिक, महाराष्ट्र राज्य पुरस्कार (७६-७७)
सीमांत (कादंबरी)
आंदोलन (कांदबरी)
मन्वंतर (कादंबरी)
वा.म.जोशी पारितोषिक (महाराष्ट्र साहित्य परिषद) १९९९
बाबा पदमजी साहित्य पुरस्कार २०००, यशवंतराव दाते स्मृती संस्था, वर्धा
सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार २०००, महाराष्ट्र फाउंडेशन
प्रदेश साकल्याचा (कादंबरी)
शुन्यस्य शुन्यमादाय (कादंबरी)
कबिरा खडा बाजारमे (कादंबरी)
बाराशिव साहित्य पुरस्कार (२००९-१०) बाराशिव, ता. बसमत
ऐल ते पैल ( विद्न्यान कथा संग्रह)

## इतर ग्रंथलेखन :

सामर्थ्य आहे चळवळीचे (संघटन तंत्र)
जोडा नातं मातीशी (पर्यावरण संवर्धन)
खानदेशातील आदिवासी भिल्लांचा स्वातंत्र्यलढा
आमु आंही वाघा पील ( भील आदिवासींचा इतिहास) पुस्तिका
नवे शेतीतंत्र आणि शेतकरयांच्या आत्महत्या (पुस्तिका)
दिल्लीचे तख्त आणि दख्खनची सुभेदारी (पुस्तिका)

कथा, विद्न्यान कथा व ललित लेख,
मागोवा, वाटसरू, आदिवासी आवाज, युगांतर, जीवनमार्ग, सत्याग्रही, पुरुष उवाच, पुरुष स्पंदन, मिळून साऱ्याजणी, ललकारी, अनुभव, मुक्त शब्द, इ. नियतकालीकात लेखन

# ई साहित्य प्रतिष्ठान

**ई-साहित्य प्रतिष्ठान**
**प्रकाशकांचे मानस**

ई साहित्य प्रतिष्ठानचे दोनशेवे प्रकाशन म्हणून श्री दिनानाथ मनोहर लिखित रोबो ही कादंबरी आपल्या हाती ठेवताना आम्हाला होणारा आनंद अवर्णनीय आहे. ओर्कुटवर आणि नंतर फ़ेसबुकवर कविता व इतर लेखन करणारी मराठी मंडळी एकमेकांच्या ओळखीची झाली. एकत्र येऊन काहीतरी करावं या उद्देशाने भेटत गेली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातच नव्हे तर जगाच्या पाठीवर पसरलेली ही मंडळी मराठीत जागतिक दर्जाचं साहित्य निर्माण व्हावं या तळमळीने काम करत राहिली आणि ई साहित्य प्रतिष्ठानचं हे रोपटं वाढत गेलं. अजूनही हे एक छोटंसं झाडंच आहे. पुढे काय होणार याची कल्पना नसलेलं.
पण हे वाढेल. वाढावं अशी अनेकांची शुभेच्छा आहे म्हणून वाढेल. काळाची गरज म्हणून वाढेल. पण वाढेल म्हणजे काय? दोन हजार पुस्तकं केली म्हणजे वाढलं म्हणायचं का? बारा लाख वाचकवर्ग मिळाला तर वाढलं म्हणायचं का? स्वतःची अद्ययावत ऑफ़िस इमारत आणि कर्मचारी वर्ग, मोठंसं बजेट असलेली एक संस्था झाली की वाढलं म्हणायचं का? पाच हजार लेखक कवी ई साहित्य प्रतिष्ठानच्या छत्रीखाली जमा झाले तर वाढलं म्हणायचं की एखाद्या बड्या स्टेडियमवर ई साहित्य संमेलन घडवून आणल्यावर म्हणायचं?

नाही आमच्या मते जेव्हा आमच्याकडून दर्जेदार पुस्तकांचं प्रकाशन होईल तेव्हाच ई साहित्य प्रतिष्ठान मोठं झालं असं म्हणू. आणि त्या दर्जाची मागणी करणारा, त्याची समज आणि आवड निर्माण झालेला वाचकवर्ग आमच्याकडे असेल तेव्हा आम्ही ई साहित्य रुजलंय असं म्हणू. या आमच्या ध्येयापासून आम्ही आज कोसो दूर आहोत. पण रोबोसारखी एक कादंबरी प्रकाशित करून आम्ही त्या दिशेला वाटचाल चालू ठेवत आहोत.

या साऱ्या प्रयत्नांत आम्ही यशस्वी होऊ कि नाही ते ठाऊक नाही. पण आम्ही आणि आमच्यासारखे अनेक लोक आणि संस्था आज ई माध्यमातून जे काम करत आहेत त्यातून उद्या मराठी भाषेचा सुवर्णकाळ येईल यावर आमचा ठाम विश्वास आहे.

ई-साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान


## रोबो विषयी...

साडेतीन दशकांपूर्वी प्रकाशित झालेली ही कादंबरी, बदललेल्या वाचकांच्या हाती बदललेल्या रूपात द्यायची संधी मला उपलब्ध करून दिल्याबद्दल इ साहित्यचा मी आभारी आहे. गेल्या दोन तीन दशकांत भोवताल इतक्या गतीने बदलत आहे आणि भूतकाळ आणि वर्तमानकाळ ह्यातील अंतर इतक्या झपाट्यानं कमी होत आहे की, पस्तीस वर्षापूर्वीची ही कथा आम्ही का वाचावी ? असा प्रश्न कुणी उपस्थित केला तर ते अनुचित होणार नाही. आणि तरीही ही कादंबरी नव्या पिढीच्या वाचकांनी वाचावयास हवी. ह्याचे कारण ही कहाणी केवळ डिकीची, एका सैनिकाची नाहीये. केवळ युध्दरस्य कथा रम्या नसलेल्या लष्करी जीवनाचीही नाही. रोबो कहाणी आहे माणसाला रोबो बनविण्याऱ्या एका प्रक्रियेची, आणि ह्या व्यवस्थेच्या हजारो हातांच्या आक्टोपसच्या तावडीत न अडकता, मुक्त जगण्यासाठी धडपडणाऱ्या माणसाची. डिकी ह्या संवेदनाशील माणसाच्या संघर्षाची कहाणी वाचकाला भिडते, तिच्या प्रतिकात्मक रुपामुळे. माणसाला माणूसपणापासून दूर नेणारी ही यंत्रणा आता केवळ सैनिकी पेशापुरती मर्यादित राहिलेली नाही. आज ही यंत्रणा आपल्या भोवतालच्या जगात विविध पातळयांवर कार्यरत असल्याचे आपल्याला अनुभवास येत आहे.

एकीकडे व्यक्तीस्वातंत्र्याला व्यक्तीवादाचे रूप येत चालले आहे आणि त्याचबरोबर व्यक्ती हौसेने गिऱ्हाईक म्हणून बाजारात येत आहे. बाजारात मनाला रूचेल त्या वस्तू विकत घेण्याची कुवत कमावणे म्हणजे यशस्वी जीवन जगणे अशी त्याख्या आकारात आली आहे. बाजारातून असंख्य निरुपयोगी वस्तू विकत घेण्याचा नादीष्ठपणा करत आपण नैसर्गिक साधन संपत्तीचा विनाश करत आहोत. सतत वापरल्यानं बोथट झालेल्या शब्दांत सांगायचं तर चंगळवादी जीवनपद्धती सर्वमान्य होत आहे.

हे सगळ खरं असलं तरी माणसं बाजारात केवळ गिऱ्हाईक म्हणून उभी नाहीयेत. तर स्वतःच्या उपयुक्ततेबद्दल, ताजेपणाबद्दल, रुचकरपणाबद्दल, सकसपणाबद्दल स्वतःच ओरडा करून स्वतःला बाजारात विकायलाही ही माणसं बाजारात उतरली आहेत, असाही ह्याचा अर्थ आहे. स्वतःला विकण्याचं तंत्र आत्मसात करणं हाच सुखी होण्याचा राजमार्ग आहे हे घोषवाक्य सर्वमान्य होत आहे. ह्यामुळेच पस्तीस वर्षांपूर्वी रोबोच्या पहिल्या आवृत्तीला दिलेल्या अर्पण पत्रिकेचाच आज पुनरुच्चार करणं चुकीचे ठरणार नाही, असे खेदाने म्हणावे लागत आहे..

दिनानाथ मनोहर



“ स्वतःला पारखे होऊन हरवलेली माणुसकी जपण्यासाठी
वांझ बलिदान करणाऱ्या अगणितांना अर्पण ”



# रोबो - एक

आकाश निरभ्र होत वारा निश्चल होता. झाडे स्तब्ध होती, वातावरण अचल सूर्य क्षितिजाकडे झुकला होता. झाडांच्या सावल्या रोडवर पसरल्या. रोडपासून रेजिमेंट ओफिसकडे जाणारा तांबडा, मुरमाचा सुस्तावलेला रस्ता.

रेजिमेंट ओफिस. स्वच्छ, सफेद इमारत. कमांडिंग ओफिसरच्या ओफिसपाशी दरवाज्याशी ऊभा असलेला सेंट्री. झाडाखाली जीप, जीपमध्ये व्हीलमागे बसलेला ड्रायव्हर

सर्व जग कुणा एका क्षणाला थबकून गेले आहे. जीवन थांबून गेले आहे. हे आकाश, ही झाडे, हा रस्ता, ही बिल्डिंग, हा सेंट्री, हा ड्रायव्हर. तद्दन सर्व वस्तू एका निर्जीव स्थिरतेत गोठून गेल्या आहेत. फक्त सावल्या, संथ अन् निश्चित गतीने पसरत आहेत.

कंपनी ओफिससमोर एक प्रशस्त टेबलामागे ऐडयूटंट कॅप्टन काळे बसला आहे. त्याच्या दोन्ही बाजूंना कंपनी कमांडर कॅप्टन सोहनसिंग आणि सुभेदार उनीकृष्णन. त्यांच्या डोक्यांवर ताडपत्रीची तात्पुरती शेड उभारण्यात आली आहे. शेडची सावली मात्र त्यांच्या पाठीमागे दूर हिरव्या गवतावर पडली आहे.

टेबलापाशी माणसांची लांबच लांब रांग उभी आहे. ग्रीन हाफ - पॅन्टस्, रेड पी.टी. शूज् घातलेली माणसे रांगेत पुढे सरकत आहेत. ग्रीन बनियन्समधून त्यांची करपलेली शरीरे उन्हात चमकत आहेत.

टेबलासमोर सात-आठशे रिक्रूटस् वेगवेगळया गटांत बसले आहेत. त्यांच्या मागे जे.सी.ओ.ज् उभे आहेत.

सकाळपासून त्रस्त करणाऱ्या उन्हाचा चटका आता कमी झाला आहे. काही जण मांडी घालून, हात गुडघ्यांवर सरळ ठेवून बसले आहेत. काही मांडी मुडपून, काही खुरमांडी घालून, आणि काही जण चवडयांवर. काही पाय लांब करून बसले आहेत.

काही जण हळूहळू पुढे सरकणाऱ्या रांगेकडे पाहात आहेत; काही जण रोडकडे. काही स्वतःचे हात निरखीत आहेत, आणि बरेच जण जमिनीकडे टक लावून पाहात आहेत.

काही जण बारीक बारीक खडयांशी खेळत आहेत, काही जण जमिनीवर मातीत बोटाने रेघोटया खेचत आहेत, काही स्वतःच्याच पायाच्या हलणाऱ्या पंज्याकडे टक लावून पाहात आहेत. कित्येक जण हरवले आहेत.

आज तारीख काय? आणि वार?

कधी आलो मी इथे?

दोन दिवसांपूर्वी ? की दोन महिन्यांपूर्वी ?

त्याने मागे वळून पाहिले. काळाचे अंतर मोजायला आठवणींच्या खाणाखुणा धुंडाळल्या. सर्वदूर पाणी पसरले होते. क्षितिजापर्यंत हलते पाणी आणि पलीकडे आकाशाची पोकळी, अंतर मोजायचे कशापासून? किनारा कधीच दूर, दृष्टीच्या टप्प्याबाहेर गेला होता

रेल्वे स्टेशनबाहेर सामानाचा बोजा सांभाळीत तो आला, तेव्हा रिक्षावाले त्याच्या मागे लागले होते,

'बाबूजी, रिक्षा... बाबूजी, ट्रेनिंग सेंटर, सिर्फ आठ आना.'

सायकल रिक्षात बसणे नेहमीच जिवावर येई त्याच्या. रिक्षामधे बसल्यावर नकळत त्याची नजर रिक्षावाल्याच्या वर-खाली, खाली-वर हालणाऱ्या पायांवर स्थिर होत असे. पोटऱ्यांवरील टरारून फुगलेल्या शिरा त्याला अस्वस्थ करीत असत.

त्याने डाव्या हातातील बॅग जमिनीवर टेकवली. हातांना झटके देऊन त्याने खांद्यांचे अवघडलेले स्नायू मोकळे केले .उजव्या खांद्यावरील होल्डओल खाली ठेवावा, थोडा मोकळेपणा अनुभवावा, असे त्याला वाटले, पण नजरेच्या आवाक्यात आलेल्या मिलटरी बरॅक्स त्याला दिसत होत्या,

शरीराचे चोचले पुरवणे, शरीराचे लाड करणे आता योग्य नाही. संभाव्य श्रमाला, त्रासाला, यातनांना तोंड द्यायचे असेल, तर शरीराच्या सवयी बदलणे आवश्यक होते.

त्याने बॅग उचलली व तो पुढे निघाला.

रोडवर रहदारी नव्हती. निरव शांतता होती. रोडच्या दोन्ही साईडसंना रुंद फूटपाथ होते. फूटपाथच्या मागच्या बाजूंस टूमदार बंगले होते. भोवती प्रशस्त बागा.

तो बरॅक्सजवळ आला. उजव्या बाजूला बरॅक्सभोवती तारेचे कम्पाउंड होते. लोखंडी फाटकापाशी सेंट्री उभा होता. बाजूला भिंतीला टेकून दोन-तीन तरुण उभे होते. तो बराच दूर होता, तेव्हापासून ते त्याच्याकडे टक लावून पाहात होते. तो जवळ आला, तरी त्यांची नजर त्याच्यावरच होती. जवळ आल्यावर त्यांच्याकडे पाहून त्याने स्मित केले. पण त्यांच्या चेहऱ्यांवरील भाव बदलले नाहीत. थंड, थिजलेल्या नजरेने ते त्याच्याकडे पाहात राहिले.

चौकशी करण्यासाठी तो त्यांच्या दिशेने वळला पण तो त्यांच्याजवळ पोचण्याआधीच त्यांतील एकाने न बोलता रोडच्या पलीकडे असलेल्या बिल्डिंगकडे बोट दाखवले. खांद्यावरील ओझे सांभाळीत तो त्या बिल्डिंगकडे वळला. रिपोर्टिंग रूमच्या दरवाज्यावर लावलेला बोर्ड पाहून तो आत शिरला. खोलीमध्ये पाच-सहा टेबले होती. मधल्या मोकळया जागेत तो सामान सांभाळीत उभा होता.

सर्वसामान्य ओफिससारखीच हीही एक ओफिसरूम होती. पण रूममधील व्यवस्थितपणा त्याला प्रकर्षाने जाणवला .भिंतीला लागून रॅक्स होत्या. ह्या रॅक्समधे, टेबलांवर अनेक फाईल्स होत्या परंतु ह्या सर्व फाईल्स अत्यंत व्यवस्थित ठेवल्या होत्या. खोलीत तीन माणसे होती. त्यांच्या अंगावर सारखेच कपडे होते. ग्रीन हा-पॅन्टस्, ग्रीन जर्सीस्, लाल पी.टी.शूज्. एकजण समोरील फाईलमध्ये लिहीत होता. तिघांमधे तो वयाने तरुण होता. दुसरे दोघे नुसतेच खर्च्यांवर बसले होते. कुणाकडे विचारणा करावी ह्या संभ्रमात तो उभा राहिला.

' अबे, ओ, सलीमके बच्चे! सामान बाहर रखो, और जरा ठीक खडे रहो, क्या नेहरूपार्क में घूम रहे हो क्या?' त्यांच्यातील प्रौढ व मिशाळ माणसाने त्याचे स्वागत केले. तो घाईघाईने बाहेर आला.

रिक्रूटींग ओफिसने दिलेले पेपर्स त्याने त्या मिशाळ माणसासमोर ठेवले. कागदावर दोन-तीन ठिकाणी सह्या करून त्याने ते पेपर्स शेजारच्या टेबलावर भिरकावले. त्या तरुण माणसाने ते पेपर्स घाईघाईने ट्रेमध्ये व्यवस्थित ठेवले.

' रिक्रूटींग ओफिस से लाये हुवे कंबल यहीं जमा करो। ' मिशाळ रुक्ष, भसाडया आवाजात म्हणाला.

'लेकिन मुझे कंबल नही मिले।'

' नहीं मिले? ब्लडी फूल, क्या मतलब है तुम्हारा? लेके क्यौं नही आये?'

'लेकिन, मिस्टर, रिक्रूटींग ओफिसने दिये नही, सो मैं लाया नहीं। रिक्रूटींग ओफिसने क्या करना चाहिये ये मुझे कैसे पता चल सकता है?'

त्या तिघांनीही स्थिर नजरेने त्याच्याकडे पाहिले. तरुणाच्या नजरेत त्याला किंचित समाधान दिसले.

' ठीक है, ठीक है... नही दिये है, तो वैसा बोलो। और ये मिस्टर, मास्टर छोड दो, सर कहो, साब कहो। याद रखो, अब फौजमे हो, बच्चू। तमीज से बात करते जाओ सिनिअरके साथ। सर कहो, उस्तादजी कहो...' काही क्षण तो मिशाळ थबकला. मग त्यानं आवाज अधिकच वाढवला, ' जादा बकवास नही, समझे? जो कुछ पुछा जायेगा, सिर्फ हाँ या ना मे जबाब जाहिये । चलो, बाहर ठैरो।'

तो व्हरांडयात आला.

संध्याकाळी सात - साडेसातपर्यंत आणखीही रिक्रुटस् आले. कुणी बिहारमधून, कुणी केरळमधून.

ते सर्वच ह्या जगाला नवखे होते. ते तेथून निघाले, तेव्हा अंधार झाला होता. त्या मिशाळ माणसाने त्यांना तीन तीनच्या ओळींमधे उभे केले. त्यांना तसेच उभे करून तो आत नाहीसा झाला. अखेर बऱ्याच वेळानंतर तो परत आला, तेव्हा त्याच्याबरोबर एक तरुण सिग्नलमन होता. त्या तरुणाने सूचना दिल्या,

'मै जब 'सावधान' कहूँगा, सावधान करना, 'दाहिने मुड' दाहिने मुडना, 'थंब' कहूँगा, रूक जाना, और 'तेज चल' कहूँगा, तेज चलना। रास्ते मे मुँह बंद, समझे?'

रस्त्याने जाताना तो तरुण 'दाया...बाया, दाया...बाया' असे म्हणत होता; पण त्यांची पावले बरोबर पडत नव्हती. त्या तरुणालाही त्याची फिकीर नव्हती.केवळ सवयीनुसार तो अधून मधून 'दाया...बाया, दाया...बाया' म्हणत होता.

ते सर्व नवखे होते. काहींच्या पायांत स्लिपर्स होते, काहींच्या पायांत बूट. पण काही वेळानंतर त्याच्या लक्षात आले, त्यांची पावले तालात पडू लागली होती. पायांच्या हालचालीने सूर धरला होता, टप्प..टप्प..टप.. एक आवाज. आमच्या हालचालीत इतक्यातच एकसूत्रता यायला लागली आहे. ह्या सर्व व्यक्ती अलग अलग आहेत, पण लवकरच एका सूत्राने, एका शिस्तीने त्या बांधल्या जाणार आहेत. समान हालचाल, समान दिशा, संघटित कार्य, संघटित शक्ती. सर्वांची ताकद, आपली ताकद.

जोरजोरात पावले टाकून तो त्या आवाजात भर टाकण्याचा प्रयत्न करीत होता

.

कुणीतरी आपल्या पाठीत बोट खुपसल्याची आणि आपल्या नावाचा पुकारा होत असल्याची त्याला जाणीव झाली. तो टेबलावर पोचला. हातांच्या मुठी घट्ट वळून, मान ताठ करून तो उभा राहिला. कॅप्टनसाहेबांनी त्याच्याकडे भुवया उंचावून पाहिले.

छाती फुगवून, पोट आत खेचून घेऊन त्याने आपले शरीर अधिकच ताठ केले. कंपनी कमांडरने त्यांच्यासमोर सरकवलेले 'पे बूक' कॅप्टनसाहेबांनी उघडले. त्याच्यावरील फोटोकडे व खाली लिहिलेल्या नावाकडे पाहात ते म्हणाले,

' कुछ बको, रे, जवान! कुछ बको, ब्लडी फूल! तुम्हारा नंबर बोलो, रँक बोलो, नाम बोलो, कहो - 'सर, सिक्स टू..थ्री सेव्हन..टू फाईव्ह...रिक्रूट डिकी पे परेड के लिये हाजीर है, सर।'

' सर, सिक्स टू..थ्री सेव्हन..टू फाईव्ह..रिक्रूट डिकी पे परेड के लिये हाजीर है, सर!'

कर्कश शिटी ऐकून त्याच्या पापण्या खाडकन् उघडल्या .डोक्यावर लटकत असलेल्या बल्बची अणकुचीदार किरणे त्याच्या डोळयांत घुसली. पांढऱ्याफट्ट भिंती चारी दिशांनी सरकत येऊन त्याच्याभोवती स्थिरावल्या. चौकोनी हॉल, चौकोनी भिंती, चौकोनी दरवाजे, चौकोनी खिडक्या अन् चौकोनी फरश्या .एकच एक भावहीन, नीरस, पांढरा रंग.भूतकाळाची किंचितही सुरकुती न पडलेली पाषाणी चेहऱ्याची ही वास्तू. त्याचे शरीर जड झाले होते, अचेतन, मृत, थंड कलेवर त्या बॅरकमध्ये पडले होते.

मी इथे काय करीत आहे? कुठे आलो आहे मी?
ह्या अनोळखी, अज्ञात जगात मी कसा आलोय?
प्रश्न ...अन् प्रश्न.
ह्या प्रश्नांना उत्तरे आहेत का?
ह्या प्रश्नांना उत्तरे मिळणे आवश्यक आहे काय?
उत्तर सापडले, तर...
तर काय फरक पडणार आहे? काय बदल होणार आहे?
मी आहे .
मी आहे आणि माझ्या डोक्यावर लटकत असलेल्या बल्बची
अणकुचीदार किरणे आहेत.
पाषाणी चेहऱ्याची ही वास्तू आहे.

तो सावकाश उठून बसला. आपल्या बोटांनी त्याने पोटरीला स्पर्श केला. पोटरीच्या वरच्या भागाला निर्माण झालेल्या गाठीवरून त्याची बोटे अलगद फिरली. बोटांचा दाब किंचित वाढवला. एक धारदार कळ भिरभिरत त्याच्या शरीरभर पसरत गेली आणि मेंदूवर जाऊन आदळली. त्याच्या शरीरातील शीर न् शीर, स्नायू न् स्नायू ताठरले होते, ठणकत होते. घोटयाजवळ बूट घासून घासून फोड आले होते. पावले सुजली होती. बोटांचे सांधे जळत होते. कमरेचे, पाठीचे स्नायू ठणकत होते.

माझ्या शरीराची मलाच भीती वाटू लागली आहे.
इतक्या वर्षांनंतर प्रथमच शरीराची जाणीव होते आहे मला.
वाटत होते,शरीर म्हणजे मनाचे ताबेदार, मनाचे गुलाम.
आता समजतंय्, शरीराला स्वतंत्र अस्तित्व आहे.
का केवळ शरीरालाच अस्तित्व आहे?
मन केवळ भ्रम, केवळ सावली?
शरीर झेपावत जाणारा प्रवाह,
मन, वाहत्या पाण्याची खळखळ.

अंगावरील ब्लँकेटस् त्याने बाजूला केली, तेव्हा त्याच्या शरीरातील सांधा न् सांधा करकरला. हा आवाज ऐम्लीफाय् केला, तर केवढी घनगर्जना ऐकू येईल, हा विचार येऊन तो स्वतःशीच हसला.

बाजूच्या बाळसेदार शरीराच्या पांडेने त्याच्याकडे नजर उंचावून पाहिले. पांडेचे शरीर इतके ओघळलेले, थुलथुलीत होते, की त्याचे उघडे शरीर पाहिल्यावर, बोटांना गिळगिळीत, बुळबुळीत पदार्थांचा स्पर्श झाल्याने अंगावर शहारे उठावेत, तसे डिकीला वाटत असे

'गुड मॉर्निंग, डिकी.'

'मॉर्निंग, पांडे...'

पांडेच्या उघडया शरीराकडे पाहण्याचे डिकीने टाळले. त्याच्या सेक्शनमधील बहुतेक साथीदार आता उठले होते. कुणी बाथरूमकडे गेले होते, कुणी दाढी करायच्या तयारीत होते, कुणी चहाचे घुटके घेत उभे होते. काहीजण अंगांभोवती पांघरूण लपेटून घेऊन गुडघ्यात डोके खुपसून बसलेहोते. पांडेने डिकीकडे पाहात ओठांची हालचाल केली,

' आज पचास हुए..'

पलिकडील शर्माने जोरजोरात डोके हलवले. बेसिक मिलिटरी ट्रेनिंग सुरू होऊन काल एकोणपन्नास दिवस पुरे झाले होते, आज पन्नासावा दिवस होता. एकशेवीस दिवसांचे ट्रेनिंग संपण्यास अजून सत्तर दिवस बाकी आहेत. सत्तर दिवस. ड्रिल पी.टी. फटीग् ... ड्रिल.. पी.टी ..फटीग्.

त्याने भिंतीजवळील आरसा घेतला आणि ट्रंक पुढयात खेचून घेऊन त्यावर ठेवला. त्याने आरशात पाहिले. आरशातून एक..अनोळखी चेहरा त्याच्याकडे पाहात होता. मोठे कपाळ, खोलगट गाल, खोबण्यांत लपलेले डोळे, थिजलेली, थकलेली नजर, डोळयांखाली काळे फरफाटे, अरुंद ओघळलेला जबडा.

त्या अनोळखी चेहऱयाकडे तो पाहात राहिला. त्या चेहऱ्यात पूर्वीचा डिकी शोधायचा प्रयत्न केला त्याने. पण तो काय शोधीत होता, हे त्याला स्पष्ट होत नव्हते, डिकीचा चेहरा डिकी विसरला होता. त्याच्या शरीराचे, त्याच्या चेहऱ्याचे वेगळेपण त्यांनी ओरबाडून काढले होते.

त्या असंख्यांमधील तो ही एक.. ग्रीन हाफ- पॅन्ट, ग्रीन बनियन, रेड पी.टी. शूज् . सेक्शन ए टेन. सिक्स टू..थ्री सेव्हन..सिक्स टू फाईव्ह रिक्रूट्ट डिकी ..एक नंबर.

दाया...बाया,दाया...बाया ...लेफ्ट-राईट, लेफ्ट-राईट...सेक्शन थंब!

चाळीस जणांचे पाय एकाच वेळी थांबले, उजवे हात मांडीजवळ गेले, नजर शून्यात.

कालच त्यांची मंथली मेडिकल टेस्ट्स् झाली होती. मेडिकल रूमपाशी दुपारी सात-आठशे रिक्रूट्टस् जमा झाले होते. शंभर एक मुलें रांग लावून उभी होती. रांगेतील मुलांनी हा-पॅन्टस् आणि बनियन्स काढून टाकले होते आणि केवळ अंडरपॅन्टसमध्ये ती उभी होती.

रांग पुढे पुढे सरकत होती. दरवाज्याच्या आतील बाजूस गालभर मिशांचे आकडे असलेला मेडिकल कोअरचा हवालदार हातात पेन्सिल घेऊन बसला होता.

ए टेन् सेक्शन रिक्रुटसची यादी हवालदारासमोर आली. हवालदाराजवळ पोचण्यास, पुढे पाच-सहा नंबर असले, की जवान अंडरपॅन्टची नाडी सोडून तयार रहात असे.

हवालदाराचा वेळ अमूल्य होता. नंबर पुकारला जाण्याचा अवकाश, रिक्रुटने अंडरपॅन्ट गुडघ्यांखाली सोडून हवालदारासमोर उभे राह्यचे.

'पीछे मूड, नीचे झुको, खांसो... नेक्स्ट। अगला नंबर।'

माझ्या शरीरावरील वेगळेपणाचे, माझ्या अस्तित्वाचे बाह्य आवरण
त्याने ओरबाडून काढले आहे .
या अदृश्य प्राण्याच्या क्रूर, तीक्ष्ण नखांनी
माझ्या अंगावरील कातडी सोलून काढली आहे.
आता ती बोटे शरीरावर फिरत आहेत.
अलगद, संथ, धीम्या गतीने;
पण सातत्याने .चाचपडत, थबकत, शोध घेत.
मला माहीत आहे, कोणत्याही क्षणी
ती बोटे खचकन् खुपसली जातील आत .आत....आत...
माझ्या मेंदूपर्यंत, माझ्या हृदयापर्यंत
ती वखवखणारी बोटे वळवळत शिरतील, खोल..खोल.
आवरणांमागून आवरणे फाडीत.
चामडी मागून चामडी सोलत. चिरफाड करीत. टरकावीत.
माझी चालण्याची ढब, माझी बोलण्याची स्वतंत्र स्टाईल,
माझी उभे राहाण्याची पध्दत,
माझ्या शरीराला उठाव आणणारे कपडे,
माझ्या सवयी, माझी मते, माझे विचार, माझ्या स्मृती आणि....
आणि माझी स्वप्ने.
चिंध्या चिंध्या केल्या जातील माझ्या अस्तित्वाच्या
अन् लक्तरे लटकत राहतील हाडांच्या सांगाडयावर
आणि मी पडून राहीन अर्धांगवायू होऊन
लोळागोळा झाल्यासारखा. असहाय, अगतिक.
माझ्या अस्तित्वाचा प्रत्येक अणू आक्रंदन करेल, थरथरू लागेल .

पण मी काही हालचाल करणार नाही. पाण्यात पडलेल्या मातीच्या ढेकळाप्रमाणे विरत जाईन, फूटत जाईन.

डिकी? डिकी कुठे असेल तेव्हा? काय शिल्लक राहील....
ही कातडीची, चरबीची, स्नायूंची, मांसाची आवरणे फाडून फेकल्यावर?
काय शिल्लक राहील, मनाच्या, मेंदूच्या चिंध्या केल्यावर?
हाडांचा सांगाडा, की अविनाशी आत्मा?
प्रत्येक क्षण ...क्षण न् क्षण .दिवस रात्र ..अहोरात्र. ही प्रक्रिया चालू आहे,
मला गिळण्याची.

ह्या प्रक्रियेचे वर्णन करणे कठीण आहे, हिची व्याख्या करणे कठीण आहे.
माणसातील माणूसपण नष्ट करणारी प्रक्रिया आहे ही.
माणसाला अमानुष बनवणारी, जनावर बनवणारी...
पशू बनवणारी, यंत्र बनवणारी.

पांडुरंग आत आला. रोजच्या प्रमाणे त्याने डिकीच्या उशाजवळील ग्लास घेऊन त्याच्या मगमधील अर्धा चहा  डिकीच्या मगात ओतला. तो आपल्या जागेवर गेला, डिकीच्या लक्षात आलं. पांडुरंग नेहमीप्रमाणे भुपाळी गुणगुणत नव्हता.

'काय पांडुरंग..काय झालं?'

पांडुरंग काही वेळ मगातील चहा भुरकत राहिला. मग अचानक मोठया स्वरात म्हणाला,

'बोर्डावर चाळिसावा दिवस लिहिलाय आज!'

बरॅकमध्ये शांतता पसरली. चाळीस? ए टेन सेक्शन इज रेलिगेटेड टेन डेज्...दस दिन..दहा दिवस .दहा दिवस वाढले होते. पांडे दाढी करता करता थांबला. शर्मा शर्टचे बटण लावता लावता थबकला. विश्वनाथचे पाऊल दरवाज्याशी अडखळले, डिकीचा कणा ढिलावला. खांदे ओघळले. ओठ विलग झाले.

'ब्लडी रास्कल्स !' बलबीरसिंगची सणसणीत शिवी त्याच्या कानांवर आली, अन् त्याला जाणवले. सर्वांप्रमाणे तोही सुन्न झाला होता.

आय मस्ट नॉट यिल्ड!
क्षण न् क्षण सावध राहिले पाहिजे मला.
सतत सतर्क, जागृत.
काही अंशी मी बाजी हरलो आहे,
पण आता, जे आहे, ते टिकवले पाहिजे.
वॉच आऊट ....न विसावता, गाफील न होता.

घाईघाईने डिकी उठला, आणि बाहेर पडता पडता म्हणाला,


'सो, बॉईज्, और अस्सी दिन । चिअर्स ।'

तो बाहेर पडला. ह्यात फारसे काही अनपेक्षित नव्हते. जरी ट्रेनिंग एकशेवीस दिवसांचे असले, तरी सोयीसाठी सेक्शन असे रेलिगेट केले जातातच. चलता है।

दोन बरॅक्समधील फटीमधून दूर पूर्वेला तळपणारा शुक्र तारा पाहून तो थबकला.

साडेचार वाजले असावेत. खांद्यावरील टॉवेल सांभाळीत तो पुढे सरकला. मग त्याच्या लक्षात आले, शुक्र ताऱ्याला पाहून नेहमीप्रमाणे त्याच्या मनाने दाद दिली नव्हती.

' हाऊ ब्युटीफुल, हाऊ ब्युटीफुल! तो मोठ्या आवाजात म्हणाला.


रोबो दोन

ऐड्ज्युटंट - टेस्ट जवळ आली आहे. ट्रेनिंग सुरू होऊन नव्वद दिवस.

कॅनव्हास. पण किती प्रदीर्घ काळ!

पण ह्या काळाची स्मृती माझ्या मनात काय आहे?

ह्या दीर्घ काळाचा लांबच लांब कॅनव्हासवर फासलाय

केवळ काळा करडा रंग...ओंगळ.

ड्रिल...पी.टी...फटीग् .ड्रिल...पी.टी...फटीग्.

ह्या काळातील प्रत्येक क्षण.. प्रत्येक क्षणानं माझं अस्तित्व पिळवटून काढलं आहे. प्रत्येक क्षण चिरकालाचं अमर्याद रूप घेऊन माझं पुरं अस्तित्व व्यापून राहिला आहे. प्रत्येक क्षण विश्वाचा बोजा घेऊन माझ्या छातीवर कोसळला आहे. प्रत्येक क्षणानं गुदमरून टाकलं आहे मला.

पण आता, ते दिवस, ते अनेक तास, ते अनंत क्षण

काही नगण्य शब्दांत सांगता येताहेत.

या यातनांचा अर्थ काही शब्दांत वर्णन करता येतोय.

ऐड्जुटंट काळेची नजर गिधाडाची होती. परेड ग्राऊंडच्या किनाऱ्याला येऊन तो उभा राहिला, की सर्व ड्रिल - इन्स्ट्रक्टर्स घाबरून जात. ऐड्जूटंट काळेची जीप येताना दिसताच हवालदार जर्मनसिंगने सेक्शनला उभे केले. सेक्शनसमोर उभे राहून जर्मनसिंग सलामीशस्त्रच्या पोझिशन्स समजावून सांगू लागला. सेक्शन उभा राहून जर्मनसिंगकडे पहात होता. सर्वांनीच ऐड्जूटंटची येणारी जीप पाहिली होती. ऐड्जूटंट काळेचा आवाज कानी आला,

'हवालदार जर्मन, रिअर लाईन नंबर फाईव्ह. क्यौं हिल रहा है? वेक अप् !'

परेड ग्राऊंडच्या दुसऱ्या टोकाला असूनही कॅप्टन काळेच्या नजरेने पांडेला अचूक पकडले होते. डिकीने हळूचे पांडेकडे कटाक्ष टाकला. पांडे थरथर कापत होता.

ऐड्जूटंट काळे गेल्यावर हवालदार जर्मनसिंगने सेक्शनला आराम पोझिशनमधे उभे केले. शरीराचे ताणलेले स्नायू ढिले सोडून सर्व रिलॅक्स झाले.

गेल्या आठ दिवसांपासून जर्मनसिंगने सेक्शनला चांगलेच ताबडले होते. परेड टाइमशिवाय दुपारी तीन-तीन, चार-चार तास ड्रिल घेतली होती.'दाया बाया, दाया बाया.....थंब! ' पाठीवरून घाम ओघळत येऊन बुटांच्या तळात जमा होत असे. जर्मनसिंगचा घसा ओरडून ओरडून शुष्क होत असे. सकाळ-संध्याकाळ तो मिठाच्या गरम पाण्याने गुळण्या करताना दिसत असे.

हवालदार जर्मनसिंगने रुमाल काढून चेहऱ्यावरील घास पुसला. त्याचा गोरा चेहरा लालबुंद झाला होता. काही मिनिटे खाली मान घालून, खांदे ढिले सोडून, आपल्या बुटाकडे नजर लावून तो उभा राहिला. मग परत एकदा त्याचे शरीर उलगडले. मान ताठ करीत तो ओरडला,

'सेक्शन !'

सर्वांचे कणे ताठले, गुडघे आत खेचले गेले, पोट आत खेचले गेले. सर्वांच्या नजरा शून्यात गेल्या. काही क्षण थांबून जर्मनसिंग भुंकला,

'पाडे, फॉल आऊट !'

पांडे ढिल्या पावलांनी बाहेर निघाला. सेक्शनच्या सर्व मुलांचे डोळे त्याच्यावर खिळले होते. पांडेला शक्य असते, तर तो केव्हाच परेड ग्राऊंड सोडून पळून गेला असता. जर्मनसिंगने पांडेकडे नजर टाकीत विचारले,

' पांडेजी... आप कहाँ तक पढे है?'

'जी? जी, मैने बी.ए. पास की है।' पांडे उत्तरला. पांडे आता बराच सावरला होता.

जणू जर्मनसिंगने त्याला 'फॉल आऊट' केले होते, त्याच्याशी चार प्रेमाच्या, जिव्हाळयाच्या गप्पा करण्यासाठी. भोळसटच.

'बी.ए.? अरे, आप तो बहुतही पढे है, पांडेजी!'

पांडेची छाती फुगली होती. तो सेक्शनकडे चमकत्या नजरेने पहात होता.

' अपने रेजिमेंट में भी कोई ग्रॅज्युएट नहीं होगा। है कोई सेक्शन में और ग्रॅज्युएट?'

पांडे ह्या जीवनाला अत्यंत अयोग्य माणूस होता. त्याचे लाडावलेले शरीर, त्याच्या सवयी. ह्या परिस्थितीला तोंड देण्याची ताकद त्याच्यात नव्हती. इथे तो दुबळा होता. ड्रिल असो, पी.टी .असो, पांडे सतत चुका करीत असे. सतत शिव्या खात असे, सतत अपमानित होत असे .पण तो ग्रॅज्युएट होता. आणि ह्या पोकळ आधारावर आपण कधी ना कधी ओफिसर होणार, हा त्याचा विश्वास होता. ह्या खुळचट विश्वासाच्या आधारावर प्रत्येक क्षण व्यापून राहिलेल्या अपयशाबरोबर तो जगत होता. ह्या फसव्या विश्वासाच्या आधाराने एक एक क्षण रेटीत होता, आला क्षण ढकलीत होता.

'कोनसी क्लास में पास की बी.ए. आपने, पांडेजी?' जर्मनसिंगने विचारले.

'सैकंड,जी..'

'सैकंड? बहुत खूब, पांडेजी, सर्टिफिकेट तो होगा आपके पास?'

'हाँ, जी ! है ना, है मेरे पास!' पांडेने उत्साहात उत्तर दिले.

' तो ऐसा करो, पांडेजी - ' जर्मनसिंगने इथे नाटयमय पॉज घेतला, ' सर्टिफिकेट को अच्छी तरह से रोल करो, अपना पाईप रहता है ना वैसे...और..और डाल लो खुद की गांडमें! साले, मादरचोद, ब्लडी फूल !..आ गये आर्मी में, आर्मी को बदनाम करने! दाया बाया नहीं समझता गधों को, और कहते हैं, ' हमने बी.ए. पास की हैं जी! क्या आर्मीने बुलावा भेजा था आपको?'

पांडे कोलमडला. त्याचा चेहरा विस्कटला. तो हुंदके देऊन, मोठयाने टाहो फोडून रडू लागेल की काय, असे त्याचा चेहरा पाहून वाटत होते.

रात्री डिकी जागा झाला, तेव्हा आपण कुठे आहोत, हे त्याच्या लक्षातच येईना. बाहेरून येणाऱ्या अंधूक प्रकाशात पांडेची आकृती घाईघाईने दरवाज्याबाहेर जाताना त्याला दिसली. तो धडपडत उठला. शर्टाची बटणे लावीत बाहेर आला. सेक्शन तीन लाईन्समध्ये उभा होता. तो झटकन् आपल्या जागेवर जाऊन उभा राहिला. थंडी कडाक्याची होती. रात्रीचे दोन वाजले होते.

'क्या हुआ?' त्याने शर्माला विचारले.

'मालूम नहीं...' शर्माने उत्तर दिले.

रात्री दोन वाजता उठणे शर्माला पसंत नसावे. तो फारसा खुष नव्हता.

जर्मनसिंग घाईघाईने खोलीबाहेर आला. त्याच्या अंगावर गुडघ्यांपर्यंत पोचणारा 'ग्रेटकोट' होता.

' गधे, बेवकूफ, ब्लडी फूल्स, रास्कल्स, बोकाचोदा, मादरचोद....!'

जर्मनसिंगच्या जिभेवर सरस्वती नाचत होती.

जर्मनसिंग कश्मिरी डोग्रा. पण त्याला भारतीय भाषांतील आणि इंग्रजीतील शिव्या मुखोद्गत होत्या.

सेक्शनसमोर येताच त्याने ' दाहिने मूड' ची कमांड दिली आणि ' लाईन पोझिशन' तो भुंकला.

डिकी वैतागला .आत, अंथरुणात 'लाईंग पोझिशन' काय चुकीची होती? जमीन, साली, काय थंड आहे ! खडेही टोचताहेत, ह्या भडव्याला झोपेत काय स्वप्न पडले, काय माहीत? लागला रात्री दोन वाजता शिट्ट्या मारायला!

'क्रॉलींग शुरू, बॅरकको चक्कर काटके आओ। पहिले चार आदमी मांगता हूँ। शूट्।'

च्यायला, मध्यरात्री अंथरुणातील ऊब सोडून ह्या थंडीत बाहेर यायचे आणि सेक्शनला असा रगडा द्यायचा. स्वतःचेही हाल आणि आमचेही. जर्मनसिंगला बीबीची याद त्रस्त करत असावी.

कोपरे आणि गुडघे ह्यांची झपाट्याने हालचाल करीत डिकी पुढे सरकत होता. बॅरकला वळसा घालून सर्वजण हवालदार जर्मनसिंगच्च्यया समोर येऊन पोहोचले.

'खडे रहो, दौडके चलो, पहिले चार आदमी मांगता हूँ।'

सर्व मुले पळत सुटली.

त्यानंतर बराच वेळ धावणे, रांगणे, जागच्या जागी उडया मारणे, असे व्यायामाचे विविध प्रकार झाले. मग सर्वांना उभे करून हवालदार जर्मनसिंगने पतर एकदा शिवीपठन केले. अगदी आठवून आठवून उरल्यासुरल्या सर्व शिव्या देऊन संपवल्या .मग काही वेळ काय करावे, हे जर्मनसिंगला समजत नसावे. काही वेळ तो स्तब्ध उभा राहिला. मग परत एकदा तो बेंबीपासून ओरडला,

' लाईंग पोझिशन!'

क्रॉलिंग करीत बॅरकला वळसा घालून, हवालदार जर्मनसिंगच्या नजरेच्या बाहेर गेल्यावर डिकीने पाय पसरले आणि दंडावर डोके ठेवून त्याने डोळे मिटून घेतले.

सर्वात मागून ओणवे होऊन पळत येणाऱ्या शर्माने त्याला डिवचले,

' डिकी, चलो, यार! नही तो तुम्हारे लिये सबको रगडा पडेगा!'

ओणवे होऊन त्याच्याबरोबर धावता धावता डिकी म्हणाला,

' वस्ताद भी साला अजीब आदमी है। फ्रॉग जम्प्स्, क्रॉलिंग... मेंढक बनो, साँप बनो। अरे, अच्छे खासे इन्सान हैं हम। शायद जर्मनसिंग जादूगर बनता चाहता था - आर्मीमे आनेसे पहिले। लेकिन आखिर मामला क्या है? रातको दो बजे ये क्यौं?'

'रात मे किसीने बॅरक मे टट्टी किया है।' शर्मा धापा टाकीत म्हणाला.

डिकी व शर्मा बॅरकला चक्कर मारून सेक्शनमध्ये येऊन मिळाले. जर्मनसिंगची लेक्चरबाजी चालू होती,

' आर्मी की इज्जत कम कर रहे हो तुम लोग। न जाने, कहाँ से कचरा भर दिया हैं! सिव्हिल लाईफ मे कुछ नहीं कर सके, यहाँ आ गये। उधरही रहते, तो कुछ बिगडता था क्या?'

ह्या त्याच्या मताबद्दल कुणाचेही दुमत नव्हते .

बराच वेळ ही रेकॉर्ड चालल्यावर जर्मनसिंग श्वासोच्छ्वास करण्यासाठी थांबला, ह्या संधीचा आणि अंधाराचा फायदा घेऊन कुणी तरी हलक्या आवाजाता सुचविले, ' उस्तादजी, शायद कुत्ता होगा। रात में मैने एक कुत्ता बॅरक से बाहर जाते देखा था...'

मग आणखी काही काळ चर्चा होऊन उस्ताद जर्मनसिंग तज्ज्ञांचे एक पथक घेऊन आत गेला. बॅरकमधील लाईटस् ओन करून बराच वेळ संशोधन झाले, साक्षीपुरावे तपासले गेले. अखेर निर्णय झाला. उस्ताद बाहेर आला.

' अब साडेतीन बज रहे हैं, अब सोओ मत। '

प्रेमळ आणि मौलिक सल्ला देऊन उस्ताद जर्मनसिंग मिठाच्या पाण्याने गुळण्या करण्यास गेला .

थंडी जरी जोरदार होती, तरी डिकीचा घसा तहानेने कोरडा पडला होता. तो नळावरून पाणी पिऊन परत आला, तेव्हा त्याचे पांडेकडे लक्ष गेले. गुडघ्यांत डोके खुपसून तो व्हरांडयात बसला होता. डिकी त्याच्या शेजारी बसला.

' पाडें, हिम्मत ना हारो, यार! जायेंगे, ये भी दिन जायेंगे।' डिकीने त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला.

पांडे त्याच्या खांद्यावर डोके ठेवून मुसमुसू लागला. डिकी काही न बोलता त्याच्या पाटीवरून हात फिरवीत होता.

बलबीरसिंग नळावर जाता जाता थांबला, त्याने पांडेकडे पाहिले आणि हेटाळणीच्या सुरात तो म्हणाला,

' अरे, क्या, पांडेजी? इतनेमें ही हार गये? अभी तो कोसों मील चलना है। अब तो पंछी जाल में फंस गया है, अब रोने से क्या फायदा? आये देशसेवा करने । दे हॅव कॉट अस्, माय् चम ! मान लिया, भाई; मान लिया। देशसेवा, देशके वीर, देशके सपूत, मातृभूमी... बहोत खूब...बहोत खूब... कुछ रास्ता नही, यार, अव! मै बताऊँ, पांडे? बस्, सोचना बंद करो। बस, खाओ, पिओ, जीओ । यू आर नॉट टू क्वेश्चन व्हाट ऐन्ड व्हाय, यू आर बट टू डू ऐंड डाय...'

' यू इडियट, शट् अप्!'

बलबीरसिंग नळावर निघून गेला.

पांडे डिकीच्या खांद्यावर डोके घुसळीत होता, हुंदके देऊन रडत होता. डिकीचा खांदा अवघडला होता. पांडेच्या अश्रूंनी त्याचा शर्ट ओला झाला होता. खांद्यापाशी ओला आणि गार स्पर्श होत होता.

' पांडे, आप ग्रॅज्युएट तो थे ही। कमिशन लेकर ही आना था आर्मी में।'

पांडेचे शरीर गदगदा हालू लागले.

'कुध बात नहीं, यार । अपना ट्रेड तो ओपरेटर है। टेक्निकल ट्रेनिंग सेंटरमें अपना कमाला दिखाना।'

खालची फरशी थंडगार होती .मांडीला तिचा स्पर्श जाणवत होता.

' ओ, डॅम यू, डॅम यू..' डिकी मनाशीच पुटपुटला.

तो सर्व दिवस पांडेचे चित्त ठिकाणावर नव्हते. सर्व दिवस तो सारखा चुका करीत होता आणि सारखा शिव्या खात होता.

दुसऱ्या दिवशी परेडसाठी सेक्शन 'फॉल इन' झाला, पण त्यात पांडे नव्हता. पांडे सिक रिपोर्टवर गेला असावा, अशीच सर्वांची समजूत झाली. पांडे सकाळी कुणाला दिसला नव्हता.

नाश्ता घेण्यासाठी सेक्शन बॅरकमध्ये परत आला, तेव्हा हवालदार जर्मनसिंगने डिकीला बाजूला बोलावले.

'डिकी, जरा इधरही ठैरना। परेडपर जाना नहीं।'

सर्व रिक्रूटस् परेड ग्राऊंडवर निघून गेल्यावर डिकी व हवालदार जर्मनसिग रेजिमेंट ओफिसवर निघाले .ओफिसबाहेरच कॅप्टन काळे उभा होता.

' जवान, पांडेको पहचानते हो?'

' पांडे मेरे ही सेक्शन में है, सर..'

' हाँ, वो तो ठीक हैं, लेकिन तुमसे उसकी खास दोस्ती थी ना?'

' खास दोस्ती? वैसा तो कुछ नहीं था, सर।'

' नहीं कैसे? मैंने तुम्हे कई बार बातें करतें देखा हैं...' जर्मनसिंगने मध्येच प्रश्न केला.

डिकीने काही उत्तर देण्यापूर्वीच कॅप्टन काळे म्हणाला,

' हवालदार जर्मनसिंग, तुम ओफिसमें चलो। हम लोग आ रहे हैं...'

हवालदार जर्मनसिंग ओफिसकडे गेला. तो दूर गेल्यावर कॅप्टनसाहेबांनी डिकीच्या खांद्यावर हात ठेवलाच

' डिकी, तू मुंबईचा ना?'

डिकीने मान हलवली.

'पांडेची आणि तुझी बरीच दोस्ती होती. डिकी, तुला हे नाकारता येणार नाही. अर्थात ह्यात काही वाईट नाही. तुला कुणी दोषही देत नाही.' कॅप्टनसाहेब काही काळ थांबले.

' पांडे रात्रीपासून नाहीसा झाला आहे. तुझ्याशी काही बोलला होता का तो?'

' काल सकाळपासून माझे पांडेशी काहीही बोलणे झालेले नाही, सर.'

'ते ठीक आहे. पण तुझा काही अंदाज असेल ना? कुठे गेलाय पांडे?'

'सर, मला खरंच काही कल्पना नाही... मला खरंच काही माहीत नाही, सर.'

'जर्मनसिंग पांडेला विनाकारण त्रास देत होता का?'

'उस्तादची पांडेशी काही खास दुश्मनी नव्हती, सर.'

*डिकीला प्रथम जाणीव झाली. पांडेबद्दल त्याला काहीच माहिती नव्हती. गेले चार महिने ते बरोबर खात होते, बरोबर झोपत होते, बरोबरच ड्रिल, रायफल ट्रेनिंग, फटीग् ह्यांचा रगडा खात होते. अन् तरीही पांडेबद्दल त्याला काही माहिती नव्हती. पांडे त्याच्याजवळ आला होता आणि तरीही दूर राहिला होता.*

*पांडे कुठे गेला असावा?*

*बराच वेळ उलटसुलट प्रश्न विचारल्यावर कॅप्टनसाहेबांचे समाधान झाले असावे. त्यांनी आपला चेहरा डिकीच्या चेहऱ्याजवळ आणला. त्यांची गिधाडाची नजर त्याच्या चेहऱ्यावर खिळली होती.*

*' डिकी... आज सकाळी रेल्वे ब्रिजखाली पांडेची बॉडी सापडली आहे. तुला आयडेंटीफिकेशनसाठी जावे लागेल...'*

*समोर कॅप्टनसाहेब असतानादेखील डिकीने खिशातून रुमाल काढला आणि कपाळावरील घाम टिपला.*

*पाडें आत आला होता; पणआत राहण्यास तो नालायक होता. इथे तो राहू शकत नव्हता; पण आता इथून माघारीही जाऊ शकत नव्हता. आता तो बाहेरही राहू शकत नव्हता. तो आत आला होता, ही त्याची चूक होती .कदाचित आयुष्यात पहिली आणि अखेरची अशी ही चूक होती, जी सुधारता येणार नव्हती. इट वॉज ऐन ओरिजिनल सिन्. पांडेने आपली सुटका करून घेतली होती. ह्या कोंडीतून सुटण्याचा सर्वात सोपा आणि जवळचा मार्ग पांडेने स्वीकारला होता. पांडेने आपली कुवत बरोबर ओळखली होती.*


रोबो
तीन

टेक्निकल ट्रेनिंग सेंटरमध्यै डिकीला येऊन दोन दिवस झाले. मिलिटरी बेसिक ट्रेनिंग पुर्ण करून तो इथे आला होता.

संध्याकाळी 'रोल कॉल' मधे 'रेजिमेंटल ओर्डर' वाचून दाखवल्यानंतर कंपनी हवालदार मेजरने - सी.एच.एम.ने सांगितले होते,

'जिसे तैरना आता है, वो कल कॅप्टन जनेजासाब को सुबह आठ बजे स्विमिंग टँकपर रिपोर्ट करे।'

टेक्निकल ट्रेनिंग सेंटरचे वातावरण काहीसे वेगळे होते. इथे ड्रिल, पी.टी. ह्यांना विशेष महत्त्व नव्हते. टेक्निकल ट्रेनिंगवरच जास्त भर होता. सर्व्हिसेसमध्ये स्पोर्टमेनची चैन असते, हे डिकीला माहीत होते.

सकाळी तो स्विमिंग टँकवर आला, तेव्हा साठ-सत्तर जवान तेथे आधीच पोचले होते.

कॅप्टन जनेजा दिसायला उंच व नाजूक, नाकाचा शेंडा अपरा, ओठावर बारीक, कोरीव मिशा, आवाजात खेळकरपणा. थोडक्यात व्यक्तिमत्त्व आपलेसे करणारे.

तासभर आरडाओरडा झाल्यावर दहा मुलांची निवड झाली. त्याच्या सेक्शनमधून डिकी एकटाच होता.

कॅप्टन जनेजाने त्यांना स्विमिंग टँकवर एका बाजूला नेले आणि प्रत्येकाशी ओळख करून घेतली.

गेली सात वर्षे स्विमिंग चँपयनशिप शील्ड दुसऱ्या रेजिमेंटकडे जात आहे. सी.ओ. साहेबांची इच्छा आहे, ह्या वर्षी शील्ड आपल्याला मिळाली पाहिजे. मी पर्सनली लक्ष देणार आहे. पहिले दोन पिरिअड्स् तुम्हाला माफ आहेत. पण रोज चार-पाच तास तरी प्रॅक्टीस झाली पाहिजे. आणि इथे मी तुमचा इन्स्ट्रक्टर आहे. नो नॉन्सेन्स ओफ सॅल्युटिंग! '

डिकी कॅप्टन जनेजावर खूष झाला. कुणाही व्यक्तीला केवळ त्याच्या खांद्यावर पितळी बटणे आहेत, म्हणून सॅल्यूट करणे मूर्खपणाचे आहे, असे त्याला वाटत असे, आणि ट्रेनिंग सेंटरमधे तर दिवसातून साठ-सत्तर तरी सॅल्यूटस् द्यावे लागत अर्थात जेव्हा ओफिसरला चुकविणे अशक्य असेल, तेव्हाच. नाही तर बहुतेक वेळा रस्ता वाकडा करून, बिल्डिंगच्या, झाडाच्या आड होऊन तो सॅल्यूट द्यावयाचे टाळत असे.

टेक्निकल ट्रेनिंग सेंटरमधे त्याचे साथीदार बदलले होते. बॅरकमधे त्याच्या एका बाजूस अनिल साहा व दुसऱ्या बाजूस सुधांशू भूषणचंद्र ह्यांच्या खाटा होत्या.

सुधांशू वर्णाने काळा, चेहरा सामान्य, डोळे खोबणीतून बाहेर पडू पाहणारे. त्याच्या डोळयांची आत - बाहेर, आत - बाहेर अशी विचित्र हालचाल होत असे. जणू त्या डोळयांना त्यांचे असे स्वतंत्र अस्तित्व होते. शरीरापासून वेगळे.

*अनिल साहा म्हणजे दुसरे टोक. भलताच नाजूक, बुटका, गोल चेहऱ्याचा, गोल शरीराचा, उतरत्या खांद्यांचा. अनिलचे डोळे टपोरे, चेहऱ्यावर किंचित मुरूम, ओठावर तुरळक लव आणि तीही चेहऱ्याचा नाजूकपणा अधिकच खुलवणारी. केस कुरळे. आसामी भाषा अगोदरच कंगोरे नसलेली. मुलायम. कानांना अवघड लागणाऱ्या व्यंजनांचा वापरच नाही आणि अशी भाषा अनिलच्या किंचित घोगऱ्या व दबत्या आवाजात ऐकावयास फारच नाजूक वाटायची. अनिल हिंदी बोलायचा बराच शुध्द, पण बोलण्याची धाटणी, उच्चार आसामीच. त्याच्या बोलण्याची तऱ्हाच लाडीक. सेक्शन कमांडर हवालदार पिल्लेचे लक्ष अनिलने वेधून घेतले, ह्यात काही नवल नव्हते.*

*हवालदार पिल्ले पेन्शनला डयू झाला होता. त्याचा ट्रेड रेडिओ मेकॅनिक; पण तो उत्कृष्ट ओपरेटर होता. 'मोर्स की' वर त्याचा हात खाली-वर होऊ लागला, की, हेडफोन्समधून मोर्सचे स्वर असे स्पष्ट अन् लयबध्द येत, की लिहिता लिहिता हात थांबवून स्वरच ऐकत राहावे, असे वाटे. हवालदार पिल्ले कृष्णवर्ण, चेहरेपट्टी रेखीव व देखणी. शरीर स्थूल असूनही पिल्ले स्मार्ट दिसे. नजर जरब बसवणारी, पण तिच्यात क्रूरता नव्हती, आवाज करडा.*

*आपला सेक्शन मागे राहू नये, म्हणून त्याची धडपड असे. संध्याकाळी आठ ते दहा तो एक्स्ट्रा अभ्यास घेत असे. 'मोर्स रीडिंग, मोर्स सेंडिंग' मधे कच्ची असलेली मुलं घेऊन तो व्हरांडयात बसत असे. ही नवी पोरं उस्ताद लोकांशी बोलता बोलता आर्मी रूल तोंडावर फेकून त्यांना गप्प करायचा प्रयत्न करीत.*

*ओफिसर्सनाही न घाबरणारी पोरे हवालदार पिल्लेला मात्र वचकून असत. हवालदार पिल्ले फालतू शिस्तीच्या बाबतीत मुलांना तकलीफ देत नसे. आऊट पासशिवाय कुणी युनिट बाहेर सापडले, तर दोन शिव्या देऊन तो सोडून देत असे. मात्र रात्रीच्या क्लासला तो वेताची छडी घेऊन बसत असे. क्लासच्या पहिल्या दिवशीच त्याने सर्वांना बजावले होते,*

*' मैं क्लास में, जहाँ मौका मिला, पीटता हूँ... और मौका ढूँढते रहता हूँ... और ऐसे मारता हूँ, की नानी याद आ जाये। एक छडी टूट गई, दुसरी लाता हूँ... अपने पैसोंसे...'*

*आणि हवालदार पिल्लेकडे दुर्लक्ष करून चालत नसे. त्याच्या विरूध्द तक्रार करूनही काही उपयोग नसे.*

*हवालदार पिल्ले आणि कंपनी कमांडर एकाच वेळी आर्मीत आले. मेजर सुब्बारावला कमिशन मिळाले, हवालदार पिल्ले मात्र हवालदारच राहिला.*

डिकी सकाळ - संध्याकाळ स्विमिंग प्रॅक्टीसला जायचा. संध्याकाळी तो इतका थकून जायचा, की नुसते दूध पिऊन, न जेवता झोपून जायचा. आजूबाजूला मुले वाचीत असायची, पाठांतर करीत असायची, पिल्लेची आरडाओरड चालू असायची. पण त्या गोंगाटातही डिकीला गुंगी येत असे. पिल्ले बरॅकमध्ये चेकिंगसाठी यायचा, तेव्हा डिकीला झोपलेला पाहून वैतागायचा. खाटेवर छडी आपटीत म्हणायचा,

' ये कौन सोया है ब्लडीं फूल? ओ! रेजिमेंट प्लेअर, आर्मीचे जावई.. सोओ, सोओ बरखुरदार!'

डिकी किंचित डोळे उघडून त्याच्याकडे पाहात असे आणि सुस्तावलेले स्मित करून परत डोळे मिटत असे.

शनिवारी संध्याकाळी डिकी जरा लवकरच परत आला. शनिवारी ओफिसर्सच्या बायका-मुलींना दुपारी पाच वाजेपर्यंत स्विमिंग टँक वापरण्याची मुभा देण्यात येत असे. त्या दिवशी डिकी व इतर टँकवर पोचले, तरीही ह्या सभ्य स्त्रिया टँकमधून बाहेर निघावयास तयार नव्हत्या. कॅप्टन जनेजा काठावर उभा राहून त्यांना बाहेर काढण्याचा सौम्य प्रयत्न करीत होता. पण बहुधा ती सबब पुढे करून तो कर्नल गुरुबक्षसिंगच्या पोरीशी बोलण्याचा चान्स घेत असावा. ही पोरगी - कुलवंत कौर 'फ्री स्टाईल' फारच सफाईने पोहत असे. जरी स्पीड नसला, तरी तिच्या स्ट्रोक्समध्ये कमालीची ग्रेस आणि हार्मनी होती. जनेजाची बायको 'ड्रेस रूम' मधून दाणदाण् पावलं टाकीत आली. जनेजाची बायको त्याला बिलकूल शोभणारी नव्हती. थोराड बांध्याच्या, निब्बर चेहऱ्याच्या ह्या बाईचे आणि जनेजाचे संबंध कसे असतील, हे समजायला फारसे कठीण नव्हते. कॅप्टन जनेजा मिसेसबरोबर नाहीसा झाला होता. त्यामुळे सर्वांचीच सुटी झाली होती.

डिकी फारसा थकलेला नव्हता आणि लवकर आला होता. हवालदार पिल्लेच्या क्लासला जाऊन तो बसला. पिल्लेची एन्ट्री अजून व्हायची होती. मुले गप्पा मारीत होती. डिकी अनिलच्याच जवळ बसला होता. अनिल अभ्यासात जरा 'हा'च होता. हवालदार पिल्ले हातात छडी घेऊन खोलीतून बाहेर पडला. छडी बाजूला ठेवून खाली बसता बसता त्याने आजूबाजूला नजर टाकली. डिकी हलक्या आवाजात अनिलशी बोलत होता.

'डिकी, तुम यहाँ क्या कर रहे हो?'

'सर, आज स्विमिंग को छुट्टी है। टाईम है, इसलिए...'

'ठीक है, ठीक है, क्लास में बातचीत नहीं मांगता हूँ...अनिल, चलो, 'की' लेकर यहाँ आओ..'

अनिल मुकाटयाने उठला. ती जागा सोडायचे त्याच्या जिवावर आले होते, असे दिसत होते. वाकडेतिकडे तोंड करीत तो डिकीकडे पाहात हवालदार पिल्लेच्या शेजारी जाऊन बसला. हवालदार पिल्लेने अनिलला 'सेंडिंग' करावयास सांगितले. अनिलच्या हाताला स्टेडीनेस् नव्हता. हाताला कंप सुटल्यामुळे सिग्नल्स तुटक तुटक येत असत. हवालदार पिल्लेने अनिलच्या बोटांवर बोटे ठेवून 'की' ची ग्रिप घेतली. अनिलला मनगट ढिले सोडावयास सांगून त्याने सेंडिंग करावयास सुरुवात केली .स्पष्ट आणि लयबध्द सिग्नल्स येऊ लागले. डिकी भराभर लिहित होता. लिहिता लिहिता दोन सिग्नल्समधील अंतर जरा जास्त येऊ लागले, म्हणून त्याने वर पाहिले. अनिलच्या उजव्या हातावर पिल्लेचा उजवा हात होता. त्यामुळे पिल्ले अनिलला अगदी लगटून बसला होता, हे साहजिकच होते. त्याची मांडी अनिलच्या मांडीला स्पर्श करीत होती. अनिलची आणि त्याची नजरानजर झाली, अनिलने घाईघाईने आपली नजर दुसरीकडे वळवली. त्याच्या नजरेत शरमेची, अपराधाची भावना होती.

मग डिकीच्या लक्षात आले, हवालदार पिल्लेचा हात अनिलच्या पाठीवर फिरत होता. हळूहळू खाली सरकत काही क्षण डिकीच्या नजरेच्या आड जात होता, परत वरती सरकत येत होता. डिकी अस्वस्थ झाला. त्याने आपले लक्ष रीडींगवर केंद्रित करायचा प्रयत्न केला, पण निष्फळ.

डिकीने रोज क्लास अटेन्ड करावयास सुरुवात केली. डिकी रोज अनिलच्या शेजारी बसत असे. पिल्लेला अनिलपासून दूर ठेवणे जणू डिकीची जबाबदारीच होती. पिल्लेने अनिलशी जास्त लगट केली, की डिकीला हटकून खोकला येई अशा वेळी हवालदार पिल्ले त्याच्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकीत असे. पण डिकी संथ नजरेने त्याला उत्तर देत असे.

डिकीचा अभ्यास चांगला होता. कॅप्टन जनेजाशी त्याचे संबंध चांगले होते आणि बॅरक डिसिप्लीनमधे त्याला कुणी टोकू शकणार नव्हते. हवालदार पिल्लेपासून त्याला भीती नव्हती. त्यांच्या रोजच्या संबधांत काही फरक पडणार नव्हता. पण एका अज्ञात पातळीवर हवालदार पिल्ले आणि आपण दोघात शत्रुत्व निर्माण झाले आहे, असे डिकीला कधी कधी वाटत असे.

एके दिवशी दुपारी बाजूच्या बॅरकीतला शिंदे संडासकडून बॅरकच्या दिशेने धावत येताना दिसला. त्याने आपला उजवा हात डाव्या हाताने दाबून धरला होता. उजव्या हातातून भळाभळा रक्त येत होते. आल्या आल्या तो कंपनी हवालदार मेजरच्या - सी.एच.एम.च्या खोलीत शिरला. थोडयाच वेळात सी.एच.एम. व शिंदे मेडिकल रूमकडे गेले.

अनेक जवानांनी हे पहिले होते. सी.एच.एम. च्या रूमजवळ जवान जमा झाले. आपसांत चाललेल्या चर्चेवरून डिकीला समजले, की शिंदे संडासला जात होता. संडास युनिटपासून बरेच लांब होते. रोड ओलांडून दूर जावे लागे. जाताना तो कॅन्टीनमधे गेला होता. कॅन्टीनमध्ये पैसे देताना त्याने खिशातील नोटा बाहेर काढल्या होत्या. कुणी तरी त्या पाहिल्या असणार. संडासजवळ तो पोहोचला, तोच दोन माणसांनी त्याच्यावर हल्ला चढविला. शिंदेने प्रतिकार केला, पण एकाने त्याचे तोंड दाबून धरले आणि दुसऱ्याने चाकूचा वार केला. झालेल्या झटापटीत शिंदेच्या हाताला वार लागला. हाताची बोटे कापली गेली, अन् पैसेही गेले होते. कादचित्, बोटे कायमचीच निकामी होण्याची शक्यता होती.

डिकीला ह्या हकिकतीत काही तरी गोम वाटत होती. शिंदेला तो चांगला ओळखत होता. शिंदेला भीती माहीत नव्हती, अन् त्याच्या अंगात ताकद होती. अगदी पहिल्या दिवसापासून त्यांची ओळख होती. शिंदे नेहमी हसतमुख असायचा. मधल्या 'रो' तो गाईड होता, ठेंगणा, गठलेला बांधा. मार्चिंग करताना त्याच्या मांडयांच्या मसल्सची होणारी हालचाल पॅन्टमधूनही स्पष्ट दिसत असे.

ही गोष्ट संभवनीय वाटत नव्हती. भर दुपारी मिलिटरी एरियामध्ये भुरटे चोर असे धाडस करतील, हे अशक्य वाटत होते.

सकाळी समजले, शिंदेला हॉस्पिटलमध्ये ऐडमिट न करता क्वार्टर गार्डमध्ये, प्रिझन सेलमध्ये ठेवण्यात आले होते.

हळूहळू खरी हकिकत बाहेर आली.

त्या दिवशी दुपारी त्याने संडासजवळ आडबाजूला एक चांगलासा दगड पाहिला. त्याच्यावर उजवा हात उलथा ठेवून त्याने धारदार सुरा आडवा धरला. डाव्या हाताने दुसरया एका दगडाने त्याने त्या सुरीवर घाव घातले. बोटे तोडून टाकण्याचा प्रयत्न होता तो. शिंदेला मा ाहीत होते, की ओपरेटर बोटांशिवाय कामच करू शकणार नव्हता व त्याला डिसचार्ज मिळाला असता.

काय धाडस, किती सहनशक्ती !त्याने सुरी कशी धरली असेल? घाव कसा घातला असेल? सुरी निसटली असेल, सटकली असेल, रक्ताच्या चिळकांडया उडाल्या असतील, वेदना असह्य झाल्या असतील, एखाद्या करवतीखाली हात घालणे ही गोष्ट वेगळी आणि अशा प्रकारे बोटे तोडायचा प्रयत्न करणे म्हणजे, शिंदेला काय म्हणायचे? कोणते लेबल लावायचे त्याला? मिलिटरी लाईफपासून शिंदे पळ काढीत होता. अगदी दोन पायांत शेपूट घालून. इथे तो दुबळा, कमकुवत आणि भेकड ठरला होता. पण त्याची सहनशक्ती, त्याची इच्छाशक्ती दुबळी नव्हती. माणसांचे, पोस्टातील पत्रांसारखे वेगवेगळया 'पिजन होल' मध्ये वाटप करता येत नाही.

काही दिवसांनी शिंदेला डिस्चार्ज मिळाला. त्याची बोटे नीट झाली की नाहीत हे मात्र समजले नाही.

आता स्विमिंग स्पर्धांचा अंतिम दिवस जवळ आला होता, पाच-पाच, सहा-सहा तास पोहून डिकी थकून जात असे, गळून जात असे. काही दिवसांपासून त्याने पिल्ल्च्या क्लासला जाणे बंद केले होते.

त्या दिवशी त्याला यायला जरा उशीरच झाला. प्लेट उचलून तो घाईघाईने मेसमध्ये जेवायला गेला. मेस बंद झाली होती आणि सर्व भांडी पालथी घातलेली होती. त्याने सिव्हिल ड्रेस चढवला आणि तो युनिटमधून बाहेर पडला. मेन गेटमधून बहेर पडताना त्याला सुधांशू भेटला. तो आणि सुधांशू सिटीच्या दिशेने चालू लागले. काही अंतरावर असलेल्या 'कॉफी हाऊस' मधे जेवण घ्यावे, असा त्याचा विचार होता.

तो हॉटेलमधे शिरला, तेव्हा हॉटेलमध्ये गर्दी कमीच होती. मंद मंद प्रकाशाबरोबर पाश्चात्य संगीताच्या लहरी हवेमध्ये तरंगत होत्या. डिकीने कोपऱ्यातील टेबल पाहून बैठक मारली. समोरच्या पदार्थांचा समाचार घेता घेता त्याने लक्ष समोरच्या टेबलापाशी त्याच्याकडे पाठ करून बसलेल्या जोडीकडे गेले. ते दोघे एकमेकांस चिकटून बसले होते. पुरुषाची फिगर डिकीला ओळखीची वाटली. मग त्याच्या लक्षात आले, तो कॅप्टन जनेजा होता. कॅप्टन जनेजा सिव्हिल ड्रेसमध्ये स्मार्ट दिसत होता. कॅप्टन जनेजाचे लक्ष पाठीमागे जाऊ नये, अशी डिकीची मनोमन इच्छा होती. जनेजाला तो घाबरत नव्हता. पण जनेजाने आपल्याला इथे पाहिले, तर जनेजालाच ह्या परिस्थितीत शरमल्यासारखे होईल, हे डिकीला माहीत होते.

सुधांशू बडबड करीत होता. डिकीने सुधांशूला खूण केली. सुधांशूच्या जेव्हा लक्षात आले, तेव्हा तो एकदमच गप्प झाला. ही शांतताच बहुतेक त्या स्त्रीच्या लक्षात आली असावी. तिने मागे बघितले आणि डिकीकडे पाहून ओळखीचे स्मित केले. आता कॅप्टन जनेजानेही मागे वळून पाहिले व हात उंचावून 'हाय' म्हटले. कुलवंत कौर दिसायला इतकी चिकणी आहे हे डिकीच्या लक्षात आले नव्हते. कदाचित ह्या मंद प्रकाशाची ही किमया असावी.

आता तेथे जास्त वेळ थांबण्यात अर्थ नव्हता. जनेजाचा स्वभाव चांगला असला, तरी ह्या अशा वेळी डिकीची हजेरी कॅप्टन जनेजाला फारशी स्वागतार्ह वाटणे शक्य नव्हते.

रस्त्याने सुधांशू बडबड करत होता .

' डिकी, आपण काही तरी केलं पाहिजे. त्या पोरानं अजून जग पाहिलं नाही. सर्व आयुष्य बरबाद होईल त्याचं.'

' हे बघ. सुधांशू, अनिल काही लहान पोर नाही. आज आपण आहोत. उद्या दुसऱ्या युनिटमधे कोण येणार आहे? दुसरा कुणी पिल्ले मात्र जरूर असेल, आणि ह्याच जगात त्याला राह्यचं आहे. त्याला स्वतःलाच मार्ग काढू दे. ह्यातून त्यालाच ठरवू दे, काय

करायचं, ते. आणि अनिलला जर ही गोष्ट पटत असेल तर, तर...'

'डोन्ट टॉक रबिश्! अनिलला तूही ओळखतोस आणि मीही.'

ते युनिटच्या मेन गेटपाशी येऊन पोचले. अनिल व विश्वभरन् तिथेच उभे होते.

'डिकी, अनिलला तुझ्याशी काही बोलायचं आहे'

'अनिल, एकच प्रश्न तुला विचारतो.. पिल्लेची सुब्बारावशी दोस्ती आहे, हे तुला माहीत आहे. आणि आपण त्याच्याविरुध्द तक्रार केली, तर काय होईल, हे तुला समजू शकते. आपण तक्रार करणार नाही. त्यात काही अर्थ नाही. पण प्रकरण वर गेलेच, तर तू शब्दाचा पक्का आहेस ना?'

'डिकी, मला मदत करा, प्लीज्, आज साल्यानं मला लाईट ओफ झाल्यानंतर त्याच्या खोलीत बोलावलं आहे. बोकाचोदा म्हणतो, ' ये ओर्डर है। अगर मानेगा नहीं, तो कहीं का कहीं पँहुंचा दूँगा।'

' ओर्डर? माय् फूट! आय शॅल फक दॅट रास्कल्! ' डिकी संतापला.

'डिकी, मुझे डर लगता है...'

'अनिल, अब सब हमपर छोड दो। लाईट-ओफ झाल्यावर तू ग्यानसिंगच्या जागेवर झोप.'

त्या दिवशी 'रम् डे' होता.हवालदार नक्कीच पिणार होता. डिकीने काही मुलांशी बोलून व्यूह रचला.

रात्रीचे दहा वाजले. लाईट-ओफच्या शिट्ट्या पुंचकल्या गेल्या. सर्व बरॅक्समधील लाईटस् खटाखट् ओफ झाले. नाईट ड्यूटीचा सेंट्री हवालदार पिल्लेला 'ओ.के.' रिपोर्ट देऊन आला. अनिलने जागा बदलली. अनिलच्या बेडवर ग्यानसिंग झोपला .त्याच्या एका बाजूस डिकी, दुसऱ्या बाजूस शर्मा.

पाच मिनिटे गेली.

दहा मिनिटे गेली.

ते सहा जण मच्छरदाण्यांमध्ये अंगावर चादरी घेऊन पडले होते, प्रतीक्षा करीत. आपण जागे आहोत, ह्याची जाणीव होऊ न देता पिल्लेची वाट पाहात होते. पिल्लेच्या पावलांची चाहूल घेत होते. डिकीही वाट पाहात होता.

अर्धा तास झाला. पिल्लेचा पत्ता नव्हता. पिल्ले अजून जागाच होता. खोलीच्या बंद दरवाज्याच्या फटीतून प्रकाशाची तिरीप बाहेर आलेली होती. डिकी वाट पाहून कंटाळला होता. तो थकला होता. आता झोपावे, असे त्याला वाटत होते. त्याने घडयाळ पाहिले. इतर सर्व जागे आहेत, ह्याची त्याला खात्री होती. इतर सर्व पिल्लेवर चिडलेले होते. पिल्लेबद्दल त्यांना खरोखरच संताप, घृणा वाटत होती.

आजचा बेत यशस्वी झाला, तर काय होईल? पिल्ले अधिकच पिसाळेल का?

अनिल भेदरट आहे, थोडीशी दमदाटी दिली, तर तो सर्वांची नावे सांगेल.

त्याला दार उघडल्याचा आवाज आला. पण परत सर्व शांत झाले. त्याचे डोळे मिटू लागले .

अकराचे ठोके पडलेले त्याला ऐकू आले. पण त्याच्या मनावर एक विचित्र गुंगी आली होती. त्या गुंगीतून आपल्याला मोकळे करण्याचा त्याने प्रयत्न केला.

पण आपण जागे राहाण्याचा प्रयत्न का करत आहोत, हेच त्याला आठवेना. त्याने झोपायचे ठरवले.

त्याला अनिलची पाठ दिसली. पाठीवरून हात वरखाली सरकत होता. पिल्लेचा हात वरखाली सरकत होता. चाचपडत, धुंडाळीत.

डिकीने डोळे सताड उघडले. ही विशड् दॅट ड्रीम टू कंटिन्यू . त्याने परत डोळे मिटले. अन् त्याला शेजारच्या बेडवर धडपड ऐकू आली. ग्यानसिंग जोरजोरात 'चोर,चोर ' ओरडत होता. मच्छरदाणीत गुरफटलेली पिल्लेची धडपडणारी आकृती त्याला दिसली. एका झटक्यात तो मच्छरदाणीबाहेर पडला. तोपर्यंत पिल्ले चारपाईपासून दूर सरकला होता. तो दरवाज्याकडे सरकत होता. हाताशी आलेला बडा बूट डिकीने चपळाईने पिल्लेच्या डोक्याच्या दिशेने फेकला. घाव वर्मी लागला असावा, कारण पिल्लेच्या तोंडून काही तरी शिवी बाहेर पडली. डिकी पुढे धावला. गनसिंगने पिल्लेला गाठले होते. शर्माने पिल्लेच्या डोक्यावर कंबल टाकले होते. पिल्ले आत धडपडत होता. डिकीने पिल्लेच्या पोटात ठोसा मारला. पिल्ले धडपडला. मग काय गोंधळ झाला, कुणालाच समजले नाही. पाच-सहा जण 'चोर चोर ' बोंब मारत अनिलच्या खाटेकडे धावले. लाईट लावायला आत आलेल्या सेंट्रीलाही कुणीतरी बडवले होते. काहीजण बाहेर धावले. लाईटस् लावायचे नाहीत, असे अगोदरच ठरले होते .

जेव्हा बॅरकमधील लाईटस् लागले, तेव्हा पिल्लेचा पत्ता नव्हता. अनिल आपल्या चारपाईवर येऊन बसला होता .चारपाया अस्ताव्यस्त झाल्या होत्या .बूट इतस्तत : पसरले होते .विश्वंभरनच्या गुडघ्याला चांगलाच मार बसला होता. सी.एच.एम. धावत धावत बॅरकमध्ये शिरला. आजूबाजूच्या बॅरकमधील मुलं जमा होऊ लागली. अनिल तयारच होता. त्याने रिपोर्ट दिला .माझ्या खाटेजवळ कुणी तरी खडबड करीत होते. मला जाग आली. कुणी तरी प्रौढ माणूस लुंगीमध्ये होता. सी.एच.एम. व्हरांडयात आला. त्याने पिल्लेच्या खोलीचा बंद दरवाजा पाहिला. इतका गोंधळ होऊनही हवालदार पिल्ले बाहेर आला नव्हता. काय झाले असावे, ह्याचा सी.एच.एम. ला अंदाज आला असावा. त्याने 'कल देखेंगे, अभी चलो, सो जाओ ..चलो, अपनी अपनी बॅरक' असे म्हणून सर्व पोरांना हाकलून लावले .परत सर्वत्र अंधार पसरला. डिकी बेडवर जाऊन पडला. अनिल आणि इतर मात्र बराच वेळ हळूहळू कुजबुजत होते. ते खूष होते.

हवालदार पिल्ले दुसऱ्या दिवशी कुणालाच दिसला नव्हता. त्याच्या जागी दुसरा हवालदार आला. पिल्लेला रिटायर्ड केल्याची बातमी समजली. मात्र एकूण प्रकाराबाबत काहीही चौकशी झाली नाही. अनिलला कोणी शब्दानेही विचारले नाही. सब तेरी भी चूप, मेरी भी चूप.

महिना-दीड महिन्यानंतर डिकी संध्याकाळी कॉफी हाऊसच्या दिशेने जात होता. पोलीस खात्याची एक जीप त्याच्याजवळ येऊन थांबली. हवालदार पिल्ले जीपमध्ये बसला होता. त्याच्या अंगावर सिव्हिलिअनचा ड्रेस होता. पण तो ओफिसरच्या पोस्टवर असावा. कारण ड्रायव्हर त्याच्याशी अत्यंत अदबीने वागत होता.

' क्यौं डिकी, कैसा चल रहा है?'

पिल्ले खूषीत दिसत होता.

थोडा वेळ गप्पा मारल्यानंतर निघता निघता पिल्ले म्हणाला,

'अच्छा, डिकी, सो लाँग. पास्ट इज पास्ट. मैने तुम लोगोंको माफ कर दिया है!'

'माफ कर दिया? लेकिन आपने माफ करने का सवाल ही नही आता है। आपने गलती की है, आपको शरमिंदा होना चाहिये। अखिर मोरॅलिटी ऐसी कुछ चीज है या नहीं?'

हवालदार पिल्ले काही क्षण डिकीकडे पाहात राहिला. त्याच्या चेहऱ्यावर हास्य होते. त्याने किंचित खांदे उडवले,

'जैसा तुम चाहो... मगर, डिकी, डोन्ट डिसीव्ह युवरसेल्फ. आय नो. यू डॅम केअर अबाऊट मोरॅलिटी. यू ...यू वेअर जेलस.'

जीप निघून गेली.

डिकी काही क्षण तिथेच उभा होता .तो जेव्हा पुढे निघाला, तेव्हा तो पुटपुटत होता,

' पिल्ले इज रिअली व्हेरी क्रूड - वरना ऐसा होगा, ऐसे मामलो में सटलिटी लीडस् यू नो व्हेअर...'


रोबो
चार

ट्रेनिंगचा पीरियड संपला होता. डिकी आता सिग्नलमन झाला होता.

नव्या युनिटला तो दुपारी येऊन पोहोचला, नवे युनिट कसे मिळते, ह्याबाबत तो साशंकच होता.

सेक्शनला निरोप देताना कंपनी कमांडर सुब्बारावने सांगितले होते,

' देखो, जवानो, आज आप ट्रेनिंग सेंटरसे ओपरेटर बने जा रहे हैं, लेकिन आपका असली ट्रेनिंग यहींसे शुरू हो रहा है। यहाँ जो कुछ पढा है, कम्युनिकेशन की प्रोसीजर पढी है, उससे सिग्नल सेंटरकी प्रोसीजर अलगही होगी। वहाँकी डिसिप्लिन कुछ और होगी। अगर युनिट ठीक हो, तो तुम्हे अपने ट्रेडका काम मिल जायेगा, नहीं तो क्वार्टर गार्ड डयूटी, ड्रिल, परेड करते रहोगे। कोशिश करो, अपने ट्रेडमे फन्ने रहो और इज्जतसे सर्व्हिस करो।'

डिकी लकी ठरला होता. ज्या युनिटमधे त्याचे पोस्टिंग झाले होते, तिची एक कंपनी बॉर्डरवर होती आणि राहिलेल्या दोन कंपन्या सिग्नल सेंटर डयूटीवर होत्या. आल्या दिवशीच रात्री तो डयूटीवर हजर झाला.

सिग्नल सेंटर म्हणजे मिलिटरीतील पोस्ट ओफिस. चोवीस तास खुले. आर्मीचा पसारा अवाढव्य. असंख्य युनिटस्. ह्या असंख्य युनिटसमध्ये कम्युनिकेशन राखणे हे सिग्नल कोअरचे काम .आर्मी हेडक्वार्टर, आणि सीमेवर, देशात पसरलेल्या हजारो युनिटस् ह्यांमध्ये होणारी लाखो शब्दांची देवाण-घेवाण. हजारो पत्रे, टेलिग्राम्स, ट्रंककॉल्स, मेसेजेस्.

त्या दिवशी रविवार होता.सकाळी आठ वाजण्याची वेळ.रेजिमेंट ओफिससाठी अर्जंट मेसेज होता. डिकी ओफिसकडे निघाला. रस्त्यावर कंपनी सुभेदार मणी व सुभेदार संगतराम ह्यांचे क्वार्टर्स होते. दोघे बाहेर अंगणात उभे होते. सुभेदार मणी लुंगी गुंडाळून, ब्रश तोंडात चघळीत उभा होता. त्यांना सॅल्यूट करणे डिकीच्या जिवावर आले होते. पण आल्या आल्याच झंझट नको, म्हणून जवळून पास होताना त्याने ' मॉर्निंग, सर' म्हणून सलामी दिली. सुभेदार मंगतरामने त्याला 'मॉर्निंग' म्हणून जबाब दिला.

डिकी पुढे सरकला, तोच मागून आवाज आला,

'जवान, इधर आओ।'

डिकी मागे वळून सुभेदार मणीसमोर उभा राहिला.

'तुमने सॅल्यूट क्यौं नहीं किया?'

'साब, मैंने आपको गुड मॉर्निंग विश किया है, सर।'

' लेकिन, जवान, मैं पुछ रहा हूँ, तुमने सॅल्यूट क्यौं नहीं किया?'

डिकी चूप राहिला.

'कब आये इस युनिट में?'

'दो दिन हुए, सर...'

'और दो दिनोंमें ये हालत? ट्रेनिंग सेंटरमें यही सिखाया गया है क्या? पास आऊट हो के आये? या उस्तादका बूट पॉलिश करते रहे...? मैं पुछता हूँ, तुमने सॅल्यूट क्यौं नही किया?'

'ट्रेनिंग सेंटर में यही सिखाया गया, सल्यूट फ्लॅग को दिया जाता है, किसी व्यक्ती को नहीं, सल्यूट ओफिसर के कंधेपर लगे स्टार को दिया जाता है, आदमी को नही...अगर सॅल्यूट देनेवाला या सॅल्यूट लेनेवाला इनमेंसे कोई भी युनिफॉर्म मे न हो, तो सॅल्यूट देना जरूरी नहीं है...'

'यू शट् अप्! बकवास मत करो! मुझे आर्मी रूल सिखा रहे हो? तीस सालसे नोकरी करते आया हूँ यहाँ। गोरों के जमाने में सर्वीस की और तुम कलके छोकरे सिखाने आये आर्मी रूल? ब्लडी फूल,याद रखो। आर्मी रूल्स किताबों में रहते है। यहाँ सिनिअर्सका रूल चलता है। मैं यहाँ ओफिसर हूँ और तुम सिपाही, ओ.आर. समझे? सिनिअर्सकी ओर्डर को ओबे करना ये एकही रूल है आर्मीका। देख लिया, सुभेदारसाब?'

सुभेदार मणी काही क्षण थांबला, मग तो डिकीकडे वळून भुंकला,

'सावधान!'

डिकी सावधान पोझिशनमधे आला.

'सल्यूट!'

डिकीने सॅल्यूट केला.

'डाउन'

डिकीने झटक्यात हात खाली घेतला.

सुभेदार मणीने डिकीला पाच वेळा सॅल्यूट करावयास लावले.

सुभेदारसाब परत लेक्चर सुरू करणार होते; पण डिकीने मध्येच खिशातून पाकीट बाहेर काढले आणि ते दाखवीत तो म्हणाला,

' सर, ओ.सी.साबके लिये ओ.पी. मेसेज है।'

सुभेदार मणी अधिकच गरम झाला. पण पाकिटाकडे पाहात त्याने राग गिळला.

'ठीक है, जल्दी जाओ। और सी.एच.एम. से कहो, वो तुम्हे चार्जशीटपर ले आये कल सुबह.'

सकाळी नऊ वाजण्यापूर्वीच डिकीची बरॅकपासून मिरवणूक निघाली. सी.एच.एम. फारच दूरदर्शी. डिकीच्या मागे सकाळपासून एक गार्ड डिटेल्ड झाला होता. सी.एच.एम. पुढे, डिकी मध्ये व मागे गार्ड अशी वरात रेजिमेंट ओफिसपाशी पोचली.

झाल्या प्रसंगाला तोंड दिलेच पाहिजे.

मी निरपराधी आहे, माझी काहीही चूक नाही.

मला सजा मिळण्याची शक्यता नाही.

पण सजा मिळालीच, तर मी काही करू शकत नाही.

अपराधी, निरपराधी ह्याला फारसा अर्थ नाही.

सी.एच.एम. ने डिकीला कमरेचा बेल्ट काढायला सांगितले. कॅप आणि बेल्ट म्हणजे सैनिकाचे मानचिन्ह. बेल्ट व कॅप उतरवणे म्हणजे सैनिकाची बेईज्जती. सी.एच.एम. प्यारेलाल सुभेदार मेजरच्या ओफिसमध्ये गेला. काही वेळानंतर तो बाहेर आला. त्याचा चेहरा वैतागलेला दिसत होता. त्याने डिकीला आत जाण्याची खूण केली. लक्षणे ठीक दिसत होती. चार्जशीट तयार असते, तर सी.एच.एम. नेच त्याला मार्च करीत आत नेले असते. डिकी सुभेदार मेजरच्या ओफिस दरवाजाजवळ गेला.

'मे आय् कम् इन, सर?'

' कम् इन्. '

डिकी शिस्तीत पावले टाकीत आत शिरला. टेबलापासून पाच-सहा फूट अंतरावर पोचताच त्याने रुबाबशीर 'थंब' करून सुभेदार मेजरला सलामी दिली.

'गुड मॉर्निंग सर!'

'मॉर्निंग, मॉर्निंग..सिग्नलमन डिकी.'

सुभेदार मेजरच्या सफेद दाढी-मिश्यांमधून हास्य चमकले. सुभेदार मेजरच्या अंगावरील युनिफॉर्म स्वच्छ होता. पण विशेष कडक नव्हता. डोळयांत मिस्कील हास्य होते.

' तो, जवान, युनिट में आये एक हप्ता भी नही हुआ और तुम मेरे सामने आये हो। ये ठीक नहीं है....बिलकूल ठीक नहीं है.. कहाँके रहनेवाले हो?'

'बम्बई, सर..'

'बम्बई ! बम्बई में कहाँ?'

ग्रॅन्टरोड, सर..'

सुभेदार मेजरने आपल्या सफेद दाढीवरून हात फिरवला,

'ग्रॅन्टरोड.. वीस साल पहिले कुलाबा में था मैं.. मैं और जगजीत, कंपाऊंड वॉलसे कुदकर निकल जाते थे । सिपाही था मैं तब..' सुभेदार मेजरच्या नजरेसमोर भूतकाळ तरंगत असावा.

'ग्रॅन्टरोड, कहाँ आया ये?'

डिकी दोन पावले पुढे सरकला. टेबलावर बोटाने आकृती काढत म्हणाला,

'ये है कुलाबा, ये व्ही.टी...ये वेस्टर्न रेल्वे और ये दादर... ग्रॅन्टरोड इसके बीच।'

बोटाने तो पोझिशन्स दाखवत होता. सुभेदार मेजर नीट लक्ष देऊन पाहात होता. 'इसका मतलब दादर ग्रॅन्टरोड की उत्तर मे है?'

'सर, बम्बईमें तो कभी नजर उठाके आसमानके तरफ देखा ही नही। कौनसी पूरब और कौनसी उत्तर! लगता है, जैसे बम्बई में आसमान है ही नही..'

सुभेदार मेजर खदखदून हसला.

' हाँ भैय्या, उँची उँची बिल्डिंगे जो है स्टेशनके पास. खब्बे हात्थ जो बिल्डिंग है ना, वहीं हम लोग रहते थे और वहींसे...'

सुभेदार मेजर वर्तमानात आला .त्याने आपली नजर उंचावून डिकीकडे पाहिले. डिकी मागे सरकला व ताठ उभा राहिला.

'ऐ मुंडे, मैं बोलता ही रहा... किसलिए आये थे तुम यहाँ?'

'सर..'

'यस् ! देखो जवान... जरा बडे लोगों की इज्जत रखना चाहिए.. आर्मी रूल्स तो है ही । हम आर्मीमेन तो है ही, लेकिन पहले हम इन्सान है... ठीक है ना? देखो, दुबारा ऐसा नही होना चाहिए। ये फर्स्ट वॉर्निंग है...जाओ, सी.एच.एम. को अंदर भेज दो।'

डिकी बाहेर आला. तो सी.एच.एम. जवळ गेला.

'मेजरजी, आपको अंदर बुलाया है।'

त्याच्या हातात बेल्ट व कॅप देऊन सी.एच.एम. आता गेला. बेल्ट लावता लावता प्रश्नार्थक मुद्रा करून उभ्या असलेल्या गार्डला डिकी म्हणाला,

'चलो, उस्ताद, तुम्हारी छुट्टी हुई।'

'क्यौं, क्या हुआ।'

'अपना उस्ताद कहता था, 'जवान, आर्मी में इज्जतसे नोकरी करनी है, तो एक पाँव बॅरकमें रखो, दुसरा पाँव क्वार्टर गार्ड सेल में..। इज्त्तसे सर्वीस करनी है, तो बेइज्जतीसे डरो मत।'

डिकी स्वत:शीच हसत बॅरककडे निघाला.

सकाळपासून जोरदार तयारी चालू होती. सर्व जवानांनी आपले खास ठेवणीतले युनिफॉर्म्स काढले होते. नऊ वाजता सालाबादप्रमाणे 'कसम परेड' चा कार्यक्रम होता. सेक्शन कमांडर्सनी आपल्या सेक्शनमधील प्रत्येक जवानाचे चेकिंग केले .युनिफॉर्म, बटणे, बेल्टची बकल्स, कॅप, कॅपवरील बॅच, बूट, बुटाचे पॉलिश, बुटाच्या लेसेस, दाढी, कटिंग ..डिकीने मशीन कटिंग केली नव्हती. त्याला मागील लाईनमध्ये लोटले गेले.

चेकिंग संपल्यावर सर्व सेक्शन कमांडर्सनी सेक्शन्सना 'सावधान' पोझिशन्समध्ये उभे करून सी.एच.एम. ला ओके रिपोर्ट दिला.

सुभेदार मेजरने रेजिमेंटला 'सावधान' केले. त्यानं एकवार आपली नजर सर्व जवानांवर फिरवली. मग तो एकदम जोरात ओरडला,

'कौन हिल रहा है? हिलो मत उधर । नायक तेजसिंग, चेक अप्. क्यौं हिल रहे हो? हिलो..मत!'

काही क्षण शांतता. मग सुभेदार मेजरला ऐकू जाईल, इतक्या मोठ्या आवाजात कुणी तरी कुजबुजले,

'साब, नायक तेजसिंग छुट्टी गया है, साब !'

सर्व युनिट दबत्या आवाजात हसले; पण सुभेदार मेजरच्या चेहऱ्यावरील एकही रेषा विस्कटली नाही. तो गुरकावून ओरडला,

'फिकर नहीं, नायक तेजसिंग.... हिलो मत!'

सुभेदार मेजरने पीछे मुड करून ऐडजुटंटला रिपोर्ट दिला. सुभेदार मेजरने आर्मीमधे आपली जिंदगी संपवली होती, त्याला माहीत होते, ओफिसर आपली ओर्डर कधी मागे घेत नसतो. इथे एकदा ओर्डर दिली गेली, की ती कॅन्सल होत नसते. ओर्डर कॅन्सल करणे चुकीच्या निर्णयाचे द्योतक असते.आर्मीमध्ये चुकीचे निर्णय घेतले जात नाहीत, मिलिटरीमधे ओर्डर इज काउंटरमांडेड, ऐन्ड नेव्हर कॅन्सल्ड.

मग ऐडजूटंटने सी.ओ.ला रेजिमेंट कसम परेडसाठी तयार असल्याचा रिपोर्ट दिला.

हा दरसाल कसम खाण्याचा सोहळा डिकीला खरोखर विनोदी वाटत असे. दरसाल रोगप्रतिबंधक लस टोचण्यासारखाच हा प्रकार होता .कसम खाल्ली, म्हणजे सैन्यात वर्षभर कुणीही भेकड, स्वार्थी, देशद्रोही निर्माण होणार नाही, अशी खात्री, जालीम, प्रतिबंधक उपाय.

त्या दिवशीची परेडची तयारी दोन दिवसांपासून करण्यात आली होती. ग्राऊंडवर लाऊडस्पीकर लावले होते. सी.ओ.साहेब माईकसमोर उभे राहिले, त्यांनी बोलावयास सुरुवात केली,

'मैं पढते जाऊँगा... मेरे पढनेके बाद सब एक साथ एक आवाजमे दोहरायेंगे। ..शुरू...मैं ....' सी.ओ. साहेब किंचित थांबले.

'मैं' सर्व जवान एका आवाजात म्हणाले. त्यानंतर प्रत्येकाने आपला नंबर व नाव उच्चारायचे होते. त्याची गुणगुण काही वेळ चालू राहिली.

सी.ओ. साहेबांचे ओठ हलले. पुढच्या रांगेतील लोकांना सी.ओ.साहेबांच्या ओठांची हालचाल दिसली. काही जणांना शब्दही ऐकू आले. पाठीमागील लोकांना काही दिसत नव्हते, काही ऐकूही आले नाही. लाऊडस्पीकर ऐन नाजूक क्षणाला बंद पडला होता. स्पीकर बंद पडल्याचे सी.ओ.साहेबांच्या लक्षात आले नाही. सर्व युनिट आपल्याकडे पाहात मुखस्तंभासारखे उभे आहे, हे पाहून त्यांच्या भुवया चढल्या. ऐडजटूंट, सुभेदार मेजर ह्यांच्या लक्षात आले असावे. पण परेड सी,ओ. साहेबांच्या कमांडमधे होती. त्यांनी मेकॅनिकला खाणाखुणा केल्या. पहिल्या सी.ओ.साहेब अस्वस्थ झालेले पाहिले. ज्यांनी सी.ओ.साहेबांचे शेवटचे शब्द अस्पष्ट ऐकले होते, त्यांनी ते शब्द म्हणावयास सुरुवात केली, मग आपल्याबरोबर मागचे लोक म्हणत नाहीत, हे लक्षात आल्यावर ते मध्येच गप्प झाले. सर्व गोंधळून गेले होते. काय झाले, ते सर्वांना समजले होते. पण ह्या परिस्थितीची कोंडी कशी फोडावी, हे समजत नव्हते. सर्व मशिनरी बंद पडली होती, लाऊडस्पीकर बंद पडल्याचे सी.ओ. साहेबांच्या लक्षात आले असावे, त्यांनी आवाज चढवला, पहिल्या ओळीचा पुनरुच्चार करावयास सुरूवात केली. मधल्या काळात मेकॅनिकही ऐम्प्लीफायरपाशी पोहोचला होता. त्याने लूज कॉक्टॅक्टपाशी टॅप केले. हमेशा करूँगा' हे शब्द मोठया आवाजात सर्वांना ऐकू आले. पुढील काही रांगांनी सर्व ओळ व्यवस्थित ऐकली होती. त्यांनी ती संपूर्ण म्हणावयास सुरुवात केली. मागील जवानांनी केवळ लाऊडस्पीकरवरील 'हमेशा करूँगा'हेच शब्द ऐकले होते, त्यांनी त्याचा पुनरुच्चार केला. सर्वच गोंधळ झाला. त्या जवानांतून वेगवेगळया वेळी, वेगवेगळया सुरांत, वेगळाल्या आवाजांत 'हमेशा करूँगा...हमेशा करूँगा' असे ध्वनी निनादत राहिले.

डिकीला हसू आवरत नव्हते. हसू दाबण्याच्या प्रयत्नात त्याचा चेहरा वाकडातिकडा झाला होता. पण त्या गडबडीचा फायदा घेऊन 'हमेशा हसूँगा, हमेशा हसूँगा' अशी कसम त्याने दोन-तीनदा घेतली. तो गोंधळ पाहून सी.ओ. साहेबांनी त्वरित निर्णय घेतला. त्यांनी ऐडजूटंटला रेजिमेंटची कमांड घेण्यास सांगितले आणि तेथून काढता पाय घेतला.

अडजूटंटने रेजिमेंटला एकदोनदा सावधान-विश्राम केले. पण आता परेडचे काय करावयाचे, ह्याबाबत सी.ओ.साहेबांनी काही ओर्डर दिलेली नाही, हे त्याच्या लक्षात आले. ऐडजूटंटने सुभेदार मेजरच्या ताब्यात रेजिमेंट दिली आणि तो घाईघाईने सी ओ. साहेबांमागे धावला.

सुभेदार मेजर अनुभवी होते. त्यांनी रेजिमेंटला 'आराम' पोझिशनमध्ये उभे केले, रेजिमेंट 'रेजिमेंटल  हवालदार मेजर'च्या ताब्यात सोपवली, आणि तेही पाठोपाठ पळाले.

रेजिमेंटल हवालदार मेजरने रेजिमेंटला सावधान पोझिशनमध्येआणले, मग 'विश्राम' पोझिशनमध्ये आणले आणि त्याने रेडिओ मेकॅनिकला फायर करायला सुरूवात केली.

उतरत्या क्रमाने हा कमांड सोपविण्याचा, खालच्या माणसाला खो द्यायचा प्रकार तर शिस्तीत पार पडला होता. पण आता काय? कसम परेड पुढे सुरू करायची काय? का पुरी झाली, असे समजून डिस्पर्स करावयाची? सी.ओ.साहेब परत  येणार आहेत का? ह्या प्रश्नांची उत्तरे कुणालाच माहीत नव्हती. प्रत्येकाने सबॉर्डिनेटच्या हातात सत्ता सोपवून जबाबदारीतून सूटका करून घेतली होती.

आता साडेअकरा वाजत आले होते. साडेसात वाजेपासून जवान तेथे उन्हात उभे होते.

---


रोबो पाच

स्कीम सुरू झाली. तो उत्साहात होता. त्याचे साथीदार नाखूष होते. आता दिवसरात्र काम, प्रवास, खाण्यापिण्याचे हाल, हे सर्व होणार होते. पण रुटीन बदलणार, म्हणून तो खूष होता.

त्याची डिव्हिजन हळूहळू सरकत सरकत मूळ ठिकाणापासून शंभर-दीडशे मैल दूर आली होती. युध्दची रंगीत तालीम सुरू झाली होती. जवळच काही मैलांवर दुसऱ्या डिव्हिजनची एरिया सुरु होत होती. ती शत्रूची डिव्हिजन होती. हायर लेव्हलवर प्रत्येक युनिटची मुव्ह प्लॅन केली जात होती. एकमेकांच्या हालचालींची खबर मिळवली जात होती. एकमेकांस शह द्यायचा प्रयत्न चालू होता आणि ह्या दोन्ही डिव्हिजन्सच्या हालचालींवर आर्मी हेडक्वार्टरची नजर होती.

अनेक कंपन्या, सेक्शन्स, प्लॅटून्स, वीस-वीस, तीस-तीस मैल प्रवास करून आपल्या लोकेशन्स बदलत होत्या. मोबाईल वॉरफेअरमधील अडचणी, त्या त्या प्रदेशाची वैशिष्टये, त्या त्या भागाचे स्ट्रॅटेजिकल महत्त्व, अशा अनेक छोटया छोटया गोष्टींची नोंद घेतली जात होती. कुठे तरी नकाशावर बटणे हलवून युनिटस्च्या भविष्यातील हालचाली ठरवल्या जात होत्या.

त्यांच्या कंपनीने गेले काही दिवस त्या शेतात मुक्काम ठोकला होती. आल्याबरोबर दोन दिवस सर्व ओपरेटर्स सतत खोदण्याचे काम करत होती. ओफिसर्स आरडाओरड करत होते, दमदाटी करत होते, चुचकारत होते. सिग्नल सेंटर संपूर्ण अंडरग्राऊंड करण्यात आले. खणून खणून त्याचे खांदे व कमर दुखू लागली होती. सिग्नल सेंटर लपले होते तीस फूट बाय दहा फूट बाय आठ फुटाच्या खोल खड्ड्यात. दिवसा असे श्रम करून रात्री नाईट सेंट्री डयूटी द्यावी लागेच. डिकीला कामाचा कंटाळा नव्हता. कामचुकारपणा व लांगूलचालन करणारी मंडळी इथेही आराम करत होती. दोनशे अडीचशे यार्डांवर ओ.आर.स् चे टेन्टस् होते. अलीकडे ओफिसर्सचे टेन्टस् होते. टेन्टस् समोर काही टेबले आणि बऱ्याचशा खर्च्या.

त्याच्या रेजिमेंटच्या मूळ स्थानापासून ही जागा ऐंशी-नव्वद मैल दूर होती. इथे आता फील्ड एरीयातील हेड-क्वार्टरच उभा झाला होता. सिमला एक्स्चेंजशी तचे एक्स्चेंज संलग्नीत करण्यात आले होते.

स्कीम सुरू झाल्याबरोबर तो इथे आला होता.

पहिल्याच दिवशी त्याला ह्या स्पॉटवर पाठवण्यात आले होते. जीपमध्ये ट्रान्समीटर घेऊन तो इथे पोचले होते. त्याच्याबरोबर दोन ओपरेटर्स व एक ड्रायव्हर होता. अगदी ठरलेल्या वेळात ते इथे येऊन पोचले होती. त्याचे सहकारी ओपरेटर्स त्यांच्या कामात हुशार होते.

ड्रायव्हर रूडसिंग आणि डिकीची दोस्ती होती. जीप उभी केल्याबरोबर झपाटयाने त्यांनी तीस फूटी एरीयल मास्ट उभा केला व सेट ओन केला. त्यांचे नशीब चांगले होते. ताबडतोब त्याला कंट्रोल स्टेशनशी संपर्क प्रस्थापित करता आला. काही क्षणातच ऐंशी मैलांवरील कंट्रोल स्टेशनला त्याने आपण योग्य ठिकाणी पोचलो असल्याचा रिपोर्ट केला. त्याचे सिग्नल्स कंट्रोलला मोठ्या आणि स्पष्ट (लाऊड ऐन्ड क्लीअर) आवाजात पोचत होते. मात्र त्याला मिळणारे सिग्नल्स काहीसे वीक होते. पण ते साहाजिकच होते. मध्ये काही मैलांवर एलेव्हन के.व्ही.ची हायटेन्शन लाईन आडवी जात होती. रिपोर्ट दिल्यावर द्याने कंट्रोलवरील नायडूला इतरांची हालचाल विचारली. 'मोर्स की'वर त्याचा हात जलद चालू होता.

डा..डीट्..डा....डा..डा..डा.....डीट्..डीट्..डा.....डीट्..डा..डीट्.

एक दीड मैलावरून जाणाऱ्या रोडवर मिलिटरी ट्रक्सचे तांडे त्यांना अधूनमधून दिसत.

दुसऱ्याच दिवशी पांढरे निशाण फडफडवीत एक जीप त्यांच्याजवळ येऊन उभी राहिली. त्यातून दंडाला पांढरा पट्टा बांधलेले एक मेजरसाहेब बाहेर पडले. दोन्ही डिव्हिजन्समधील शिस्त, त्यांची कार्यपध्दती, त्यांच्या हालचाली ह्यावर प्रत्यक्ष देखरेख ठेवणाऱ्या अम्पायर स्क्वॉडमधील एक ओफिसर. त्याने डिकीला बरेच सतावले . कोडनेम्सबद्दल चौकशी केली. ट्रान्स्मीटर सेट, बॅटरीज्, स्टेशनरी, एरीयल मास्ट, डेली रेकॉर्ड आणि इतर डाक्यूमेंटस्, बारीक बारीक गोष्टी त्याने तपासल्या. त्याने तंबूकडे मोर्चा वळवला. तंबूभोवती खणलेल्य स्नेक ट्रेंचची खोली कमी होती. आतील जमीन साफ नव्हती. 'फर्स्ट एड', 'डिसिप्लिन' ह्यावर एक छोटेसे, तरीही कंटाळवाणे भाषण ठोकून, सॅल्यूटस घेऊन धूळ उडवत जीप निघून गेली.

दोन दिवस शांत गेले.

तिसऱ्या दिवशी मात्र त्याच्या जीपपासून काही अंतरावर काही थ्री टनर्स आल्या. गाडयांमधून आलेले सैनिक कामाला लागले. भराभर टेन्टस् उभे झाले. एका बाजूला आर्मी मेडिकल कोअरची मेडिकल रूम तयार झाली. आणखीही वेगवेगळया कोअर्सचे सैनिक आले, त्यांनी आपापले डेरे उभारले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत त्यांच्या आजूबाजूस तीस-चाळीस तंबू उभे राहिले.

जवळच असलेल्या इन्फंट्री युनिटच्या कर्नलने त्यांच्या सिग्नल डिटॅचमेंटला भेट देऊन काही मेसेजेस देऊ केले. सकाळी पाच वाजता उठून ट्रान्समीटर ओन करून कंट्रोल स्टेशनशी संबंध प्रस्थापित करावा लागत असे. मग सर्व दिवस दोन दोन तासांनी कॉल चालू राहात. मेसेजेस् येत होते, जात होते. एक गोष्ट चांगली होती, काम भरपूर असले तरी युनिफॉर्मची इस्त्री कुणी चेक करत नव्हते. ना बुटाचे पॉलीश, ना बकल्सची चमक. दाढीचे खुंट वाढले होते. पण कुणाची तक्रार नव्हती.

पाचव्या दिवशी संध्याकाळी आठ वाजता डिकीने कंट्रोल स्टेशनला शेवटचा मेसेज  पास केला. रोजचे सर्व रुटीन रेकॉर्ड तयार केले. त्याने कंट्रोलजवळ नऊ वाजताचा कॉल अटेण्ड न करण्याची परवानगी मागितली. कंट्रोल स्टेशनने त्याला सकाळी पाच वाजण्याचा नेक्स्ट कॉल देऊन 'गुड नाईट' केले.

डिकीने रूडसिंगला आवाज दिला. त्याने व रूडसिंगने जल्दीने ट्रान्समीटर सेट जीपमधून काढला. बॅटरीज् काढल्या. सर्व सामान काढून जीपची मागची बाजू रिकामी केली. डिकीचे दोघे साथीदार झोपण्याच्या तयारीत होते. त्यांना हा बेत पसंत नव्हता. पण नाराजी दाखवण्याशिवाय ते काही करू शकत नव्हते. तो सीनियर होता. त्यांना भीती वाटणे साहजिक होते. काही लफडे झाले, तर त्यांनाही त्रास होणार होता. हा मूर्खपणा आहे, हे डिकीला समजत होते. जर पकडले गेले, तर त्याला चौदा किंवा एकवीस दिवसांची सजा मिळणार होती. रूडसिंगलाही सजा होईल; पण अखेर सेटची संपूर्ण जबाबदारी डिकीवरच होती.

रात्रीच्या अंधारात ढकलत ढकलत त्यांनी जीप रोडवर आणली. रूडसिंगचे गाव तेथून अवघ्या वीस मैलांवर होते. मुख्य रोडपासून गाव जरा बाजूला होते. पण रस्ता चांगला होता. मुख्य अडचण अशी होती की, ते गाव प्रतिस्पर्धी डिव्हिजनच्या प्रदेशात होते. सरळ रोडने जाणे धोक्याचे होते. चक्कर घेऊनच जावे लागणार होते. रूडसिंग घरी जायला उतावळा झाला होता. त्याचे लग्न झाले आणि सुट्टी कॅन्सल होऊन त्याला परत यावे लागले होते, ह्या लुटूपुटीच्या लढाईसाठी.

त्यांनी जीप ढकलीत ढकलीत बरीच दूर आणली. आजूबाजूचे टेन्टस् मागे पडले होते. रूडसिंगने जीप सुरू केली.

रूडसिंगच्या गावात पोचायला त्यांना साडेअकरा वाजले.

डिकीने रूडसिंगला बजावले,

'देखो,याद रखो! किसी भी हालत में तीन बजे जीप यहाँसे चलनी चाहिए। '

रूडसिंग त्याला घरात येण्याचा आग्रह करीत होता. पण डिकीने त्याला सरळ नकार दिला. रूडसिंगला केवळ साडेतीन तासांचा अवधी मिळणार होता. ह्या वेळात घरच्या लोकांना उठवणार कधी, आईबापांशी, भावाबहिणींशी बोलणार काय आणि बायकोला बाजूला घेऊन तिच्याबरोबर झोपणार तरी किती वेळ?

स्टीअरिंग व्हीलवर डोके टेकून त्याने डोळे मिटून घेतले. ग्रेटकोट अंगावर घेऊन त्याला आरामात झोपता आले असते. पण रूडसिंगवर भरवसा ठेवण्याची त्याची तयारी नव्हती. अधूनमधून जाग आल्यावर तो घडयाळात बघत होता.

त्याला जाग आली.

चंद्र पश्चिमेकडे झुकला होता. पावणेतीन वाजत आले होते. पहाटेचे थंड वारे हल लागले होते.

खाली उतरून त्याने कानोसा घेतला. दुरून कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज ऐकू येत होता. त्याने गल्लीच्या कोपऱ्यापर्यंत रमत गमत चक्कर टाकली. मग रूडसिंगच्या अंगणाच्या दरवाज्याशी येऊन तो उभा राहिला.

पाच मिनिटे गेली, दहा गेली, मिनिट-काटा बारावर सरकला. तीन वाजले होते. त्याने अस्वस्थपणे ह्या पायावरचा भार त्या पायावर घेतला.

'आय हेट टू डू इट! माझ्या हातात असते तर, बेटा, मी तुला दिवस उजाडेपर्यंत तकलीफ दिली नसती. पण...ओके, पाच मिनिटं ग्रेस.'

त्याला थंडी वाजत होती. त्याने हळूच दरवाजा उघडला. दरवाजा करकरला, त्याने डोके आत खुपसले आणि हलक्या आवाजात हाक मारली,

'रूडसिंग.. रू..डसिंग..'

त्याला प्रत्युत्तर मिळाले नाही. व्हरांडयाच्या उजव्या बाजूच्या खोलीतून कुजबूज ऐकल्यासारखे त्याला वाटले,

' रूडसिंग, चलो, भई। तीन बजे हैं,जल्दी चलो।'

तो बाहेर आला. भिंतीला पाठ लावून वाट पाहात राहिला.

आणखी पाच मिनिटे गेली. तो वैतागला. दुसऱ्याच्या नाजूक भावनांना जपायची ही वेळ नव्हती. तो झपाटयात उठला, दरवाज्यातून आत घुसला. तो अगदी घराजवळ गेला, आणि भिंतीजवळ तोंड नेऊन म्हणाला,

'रूडसिंगके बच्चे, ब्लडी फूल! जल्दी चलो। बेवकुफी मत करो।'

रूडसिंगचा दबता आवाज आतून आला,

' सिर्फ दस मिनिट, उस्ताद, प्लीज ।'

दरवाज्यामागील कुजबूज आणि हालचाल त्याला स्पष्ट जाणवली. तो झपाटयाने दूर झाला. दरवाजावर हात ठेवून पाहात राहिला. मग तो खाड् खाड् बुट वाजवीत व्हरांडयात शिरला, खिडकीजवळ तोंड नेऊन तो तीव्र स्वरात म्हणाला,

' भाभी, भगवानके लिये उस सुव्वरको बाहर फेको। अभ्भी, इस वक्त।'

तो बाहेर येऊन जीपमध्ये बसला.

पाच मिनिटे गेली.

रूडसिंग बाहेर आला. त्याच्याबरोबर त्याची बायको होती. पहाटेच्या धूसर प्रकाशात त्यांच्या आकृत्या दिसत होत्या. दरवाज्याजवळ तिने त्याच्या खांद्याला घट्ट पकडले आणि त्याच्या खांद्यावर डोके ठेवून ती त्याला घट्ट चिकटली. ती हुंदके देत होती, आणि त्याच वेळी हुंदके दाबण्याच्या प्रयत्नात तिचे शरीर थरथरत होते. रूडसिंग तिची समजूत घालत होता.

रूडसिंगने तिला हलकेच दूर केले. क्षणभर ती दूर झाली. पण परत आवेगाने त्याला चिकटली. वयाने ती अगदीच पोरगेली दिसत होती. रूडसिंगने असहायतेने डिकीच्या दिशेने पाहिले. तिच्या पाठीवरून हात फिरवीत कुजबुजत्या आवाजात तो तिला समजावू लागला.

डिकीने घडयाळात पाहिले .पावणेचार वाजत आले होते, आणि साडेचार वाजता सर्व जवान खंदकात शिरणार होते. डिकीने आपली नजर विरूध्द दिशेला वळवली आणि स्टीअरिंग व्हीलच्या मध्यावर त्याने आपल्या हाताची मूठ दाबली...पों... हॉर्न वाजला. रूडसिंग शेजारी येऊन बसल्याचे त्याला जाणवले, तेव्हा तो म्हणाला,

' आय ऐम सॉरी.'

रूडसिंगने गाडी स्टार्ट केली. त्याची नजर समोर होती.

परत आलो, त्याच रस्त्याने जायचे, म्हणजे साडेपाच वाजणार. सर्व सैनिक खंदकात असणार. अम्पायर्स फिरत असणार. मिलिटरी पोलीस आहेतच. ह्या रस्त्याने जाणे, म्हणजे पकडले जाण्याची खात्रीच. कोणत्याही परिस्थितीत लवकर तर पोचायला पाहिजेच. डिकीने निर्णय घेतला,

'रूडसिंग, चीप सिधे, मेनरोडसे ले लो।'

जीप वेगाने धावू लागली. पाहता पाहता ती मेन रोडला लागली. वळणावर थोडे आत 'चेक पोस्ट' दिसत होते. कंदिलाच्या प्रकाशात सेंट्रीची छाया दिसत होती. 'स्पीड बढाओ।' त्याने बाजूस झुकून हॉर्न दाबला. सेन्ट्रीला काय होत आहे, हे लक्षात येण्याआधीच जीप पुढे गेली होती.

डिकीने सुटकेचा निःश्वास टाकला .पण खरा धोका अजून पुढेच होता. अजून एनिमी एरिया चालूच होती. मुख्य सरहद्दीवर शत्रुपक्षाचे व आपले दोन्ही बाजूचे चेक पोस्ट असणार. ह्या रस्त्याने येण्यात आपण चूक केली काय? त्या कडाक्याच्या थंडीतही डिकीच्या कपाळावर घामाचे थेंब उभे राहिले.

रोडने वळण घेतले आणि समोर दूर रस्त्यावर उभ्या असलेल्या जीपची आकृती त्यांना दिसली. 'खेल खतम्!' ही जीप अम्पायर स्क्वाडशिवाय कुणाची असणे शक्यच नव्हते. रोडच्या एका बाजूस खांबावर कंदील दिसत होता. त्याच्या हातात अंधूक प्रकाशात हातात संगीन असलेली बंदूक घेऊन उभा असलेला सेंट्री दिसत होता. तो त्यांच्याच जीपकडे बघत होता. बहुधा बऱ्याच दूरपासून त्याने जीपचा आवाज ऐकला असणार. सेंट्री जागेवरच उभा होता, त्याअर्थी पुढच्या जीपमध्ये कुणी नसावेत. रस्त्यावर आडवा घातलेला बांबू वर उचललेला होता, त्याच्या मध्यभागी लावलेला कंदील अधांतरी तरंगत होता. सेंट्री आता रोडच्या मध्यभागी आला होता. डिकीने रूडसिंगकडे पाहिले, त्या अंधारातही त्याला जाणवले, रूडसिंग घामाघूम झाला आहे. डिकीने त्याचा खांदा थोपटल्यासारखे केले. 'इंजीन बंद नही करना' त्याचा आवाज घोगरा झाला होता. आता जीप हळू हळू गती कमी करीत पुढच्या जीपच्या मागे उभी राहात होती. पुढची गाडी अम्पायर्सची नसावी. ती रिकामी होती. सेंट्रीने जागा सोडली. तो जीपकडे येत होता. डिकी झटक्यात मागे वळला. मागे पडलेल्या स्टेशनरीतील मेसेज पॅड त्याने खेचले. हातात धरून पाने उलटवीत तो पुढे झाला. त्याच्या अंगात ग्रेटकोट होता त्यामुळे त्याचे सर्व कपडे झाकले गेले होते. आणि त्याची बॅरट कॅप ओफिसर टाईप वन् पीस होती. जीपपासून सात-आठ फुटांवर त्याने सेंट्रीला गाठले. रायफल आडवी धरून तानशस्त्र करून सेंट्री त्याला चॅलेंज करणार, तोच डिकी त्याच्या अंगावर खेकसला,

'सेंट्री ये जीप रस्तेमें क्यौं खडी है, बेवकूफ? कौन है तुम्हाला गार्ड कमांडर? बुलाओ उसे यहाँ। बोलो, मेजरसाब बुलाता है। दौडो, क्विक!'

सेंट्री क्षणभर घोटाळला, त्याने जीपकडे पाहिले, डिकीकडे पाहिले. तो टेन्टच्या दिशेने धावत निघाला. डिकी मागे वळला,

'रूडसिंग !'

क्षणार्धात जीप पुढे आली आणि रस्त्याने धावत सुटली.

सेंट्रीच्या 'गार्ड कमांडर...गार्ड कमांडर...' अशा आरोळया ऐकू आल्या. पण रूडसिंगने जीप बुलेटसारखी बाहेर काढली होती. त्यांच्या लोकशनच्या दोन फर्लांग अलीकडेच रूडसिंगने जीप थांबवली.

डिकी आणि रूडसिंग दोघांच्याही अंगांतून घामाच्या धारा वाहात होत्या. डिकी मागे धावला. रूडसिंग एका हाताने स्टीअरिंग सांभाळीत गाडी ढकलू लागला.

चार वाजून वीस मिनिटे झाली होती. सर्व जवान आता बूट चढवीत असणार. ह्या क्षणी त्यांच्याकडे कुणाचेही लक्ष जाण्याची शक्यता नव्हती.

आणखी दहा मिनिटांत शिट्टी वाजणार होती. त्या कॅम्पमधील प्रत्येक सैनिक खंदकात येणार होता. ते जोरजोरात धापा टाकीत होते. आपली छाती फुटते, की काय, असे डिकीला वाटत होते. त्याचे पाय थरथरत होते; पण एक एक क्षण मोलाचा होता. जीप एरियल मास्टपाशी आली. त्याचे साथीदार तंबूच्या बाहेर उभे होते, ते तंबूकडे धावले, ट्रान्समीटर घेऊन जीपकडे धावत आले. कर्कश शिट्टी अंधार फाडीत गेली. रूडसिंग धावत तंबूत शिरला. तिन्ही रायफल्स घेऊन तो खंदकाकडे धावला. डिकीने घाईघाईने एरियल ट्रान्समीटरला जोडली. डिकीच्या साथीदारांनी बॅटरी जीपमध्ये पटकली आणि ते खंदकाकडे धावले. डिकीने सेट ओन केला. काही वेळातच कंट्रोल स्टेशनचे ओळखीचे सिग्नल्स त्याला ऐकू आले. आपला फ्रीक्वेन्सी मीटर त्याने टयून केला. त्याची बोटे 'की'वर खाली वर होऊ लागली. डाव्या हाताने त्याने रूडसिंगची हॅवरसॅक उघडली, आतून रम्ची बाटली बाहेर काढली, दातांनीच त्याने सील तोडले, कोऱ्या रमचा घोट त्याच्या घशाला जाळीत जाळीत पोटात उतरला.

त्यनंतर दोन-तीन दिवसांतच, त्याच्या युनिटमधून एक कंपनीच तेथे हजर झाली. कॅप्टन भारद्वाजही बरोबर होता. कॅप्टन भारद्वाजने आल्यावर सर्व ओपरेटर्सना कामाला लावले. अंडरग्राऊंड सेंटर तयार झाले. तो आता सर्व ओपरेटर्सबरोबर त्या अंडरग्राऊंड सिग्नल सेंटरमध्येच काम करू लागला.

स्कीम संपून त्याची कंपनी जेव्हा परत फिरली, तेव्हा कॅप्टन भारद्वाज मेजर झाला. त्याच्या कंपनीने उत्कृष्ट कम्युनिकेशन मेन्टेन केले होते. दिवसरात्र डयूटी करून ओपरेटर्सचे चेहरे पांढरे पडले होते. अंगावर मातीची पुटे चढली होती. कित्येक दिवसात अंगावरील कपडे उतरवण्याची संधी मिळाली नव्हती. रात्री झोपतांना पायांत बडाबूटच घालून झोपावे लागे.

एक चांगले होते, सॅल्यूटिंग, फालतू डिसिप्लिन ह्याबाबत ओफिसर्स विशेष चौकस नव्हते. तरीही वेळ काढून कॅप्टन भारद्वाज रोज अर्धा तास भाषण झोडीत असेच.

स्कीम सुरू झाल्यानंतर दोन नवीन लेफ्टनंटस् आले. कॅप्टन भारद्वाजने त्यांना वाटेल तसे ताबडले. बिचारे बावचळून गेले होते. बावरल्यासारखे इकडे तिकडे वावरायचे. ओ.आर.शी आदबीने वागायचे.

एके दिवशी कॅप्टन भारद्वाजने त्यांना आपल्या तंबूबाहेर ऐटेन्शनमध्ये उभे केले. सकाळी आठ वाजेपासून अकरा वाजेपर्यंत ते उन्हात एकाच जागी उभे होते. डिकीला त्यांची दया आली; पण प्रथम काही दिवस इतरांशी माणसांप्रमाणे वागणारे ते लवकरच चौकटीत बसून गेले आणि ओफिसर्सच्या ताठ्यात फिरू लागले.

शेवटच्या दिवशी सर्व तंबू गोळा केले गेले. कॅम्पची वस्ती दर्शवणाऱ्या सर्व खाणाखुणा नष्ट झाल्या. अंडरग्राऊंड सिग्नल सेंटरचा खड्डा पूर्णपणे परत भरण्यात आला. भरलेल्या खड्ड्यावरील जमीन इतर जमिनीपेक्षा वेगळी दिसू नये, म्हणून तिच्यावर गवतही पसरण्यात आले. कागदाचे लहान लहान कपटे उचलण्यात आले. सिगारेटची थोटके उचलली गेली. कॅप्टन भारद्वाजने स्वत उभे राहून अगदी बारकाईने सर्व सफाई करवली. मग युध्दमध्ये अशा प्रकारे घ्यावयाची काळजी व गुप्ततेचे महत्त्व ह्यावर लेक्चर मारले. सर्व सामान थ्री टनर्समध्ये भरण्यात आले.

डिकी सहज फिरत फिरत ओफिसर्सच्या तंबूंच्या बाजूस आला. तंबूंची जागा ओळखता येणे कठीण होते. कॅप्टन भारद्वाजचा तंबू जेथे होता, त्या जागेपासून जवळच शेताच्या बांधाला लागून बीअरच्या बाटल्यांचा तीन-चार फूट उँचीचा ढीग उन्हात चमकत होता.

सर्व दुपार व रात्र त्यांच्या गाडया हळूहळू धावत होत्या. सकाळी बाथरूममध्ये त्याने अंगावरचे सर्व कपडे उतरवले. शर्ट व पँट निकामी झाले होते. नळाच्या धारेखाली डोके धरले, तेव्हा गटारातून तांबडया पाण्याचा लोट वाहू लागला. इतर सर्वच बाथरूम्समधून जवान थंड पाण्याच्या धारांखाली गेल्या दीड महिन्यात जमा झालेली धूळ, घाम आणि श्रांतता धुऊन काढत होते.

युनिटला दोन दिवस सुट्टी होती.

कॅप्टन भारद्वाज मेसमध्ये व्हिस्की पीत असणार, कारण स्कीम यशस्वी झाली होती आणि कॅप्टन भारद्वाज मेजर भारद्वाज झाला होता.

पाठीमागे हात नेऊन डिकी कमरेवरील मळाची पुटे खरवडण्याचा प्रयत्न करीत होता.

---


रोबो सहा

त्या शीख इन्फंट्री रेजिमेंटमध्ये टेंपररी डयूटीवर येऊन डिकीला दोन महिने होत आले होते.

येथील वातावरणात डिकी खूष होता. ह्या युनिटमधे सर्व ओफिसर्स आणि ओ.आर.स् देखील अनेक वर्षांपासून होते. त्यामुळे सर्व रेजिमेंटमध्ये आपलेपणाचे वातावरण होते.

रेजिमेंट कमांडर कर्नल फिलिप्सशी झालेली पहिली ओळख - फारच मजेदार.

डिकी आपल्या वन टनर स्टेशन वॅगनमध्ये ट्रान्समीटरच्या पुढयात बसला होता. मोबाईल कम्युनिकेशनसाठी बनविण्यात आलेली ही खास गाडी. गेले तीन तास तो कंट्रोल - स्टेशनशी संबंध जोडायचा प्रयत्न करत होता. आदल्या दिवशीही त्याचा मिलाप होऊ शकला नव्हता. कालपासून आभाळ ढगांनी ओथंबलेले होते. सकाळपासून डायल फिरवून कंट्रोल स्टेशनचे सिग्नल्स शोधण्यात व 'मोर्स की ' वर कंट्रोल स्टेशनची कॉल साईन पाठवून तो कंटाळला होता. कानांवरील हेडफोन्समधील आवाजाने त्याचे कान बधिर झाले होते. ह्या गडबडीत त्याचा सकाळचा नाश्ताही राहिला होता. पण आता वेळ टळून गेली होती. सतत मोर्स की वर काम केल्याने त्याचे हात दुखू लागले होते.

कोणत्याही क्षणी कंट्रोल स्टेशनकडून डयूटी सिग्नल ओफिसरचा जाब विचारणारा ट्रंककॉल येण्याची शक्यता होती. त्याने वैतागून सेट ओफ केला.कानांवरील हेडफोन बाजूला ठेवले. बाजूला पडलेल्या हॅवरसॅकमधून त्याने मूँगफलीच्या शेंगा काढल्या, व तो शेंगदाणे खाऊ लागला. त्याच्या पाठीमागे कुणी तरी आल्याचे त्याला जाणवले. त्याच्या नजरेच्या कक्षेत हा पॅन्टखाली दिसणाऱ्या मजबूत मांडया व घाटदार पोटऱ्या दिसल्या.

'क्यौं उस्ताद, कंट्रोलसे मिलाप हो गया क्या?' पाठोपाठ आवाज आला.

' नहीं, यार... साला, बहनचोद कहाँ मर गया है? मालूम नहीं, कबसे दिमाग खराब कर रहा हूँ । आओ, मुँगफली खाओ... आज ब्रेकफास्ट तो...'

डिकीला काही तरी चुकत असल्याचे जाणवले, त्याने मागे बघितले.

हा पँटमध्य शर्ट इन् करून लालबुंद चेहऱ्याचा कर्नल फिलिप्स उभा होता. तो शांत नजरेने डिकीकडे पाहात होता. डिकी धडपडत उठला. त्याचे डोके गाडीच्या टपाला आदळले, डोक्यावर हात धरून तो खाली बसला.

' सॉरी, सर, मै समझा...'

कर्नल फिलिप्सने त्याला पुढे बोलू दिले नाही.

' दॅटस् ओके । कोशिश जारी रखो और मिलाप होतेही मुझे खबर करो । और ओर्डलीसे नाश्ता यहीं मँगवाते जाओ कलसे । मैं मेस कमांडरसे बात करता हूँ..'

त्यानंतर डिकीने कर्नल फिलिप्सला अनेकदा ग्राऊंडवर पाहिले होते. ग्राऊंडच्या ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत हातात रायफल्स घेऊन क्रॉलिंग करताना त्याने जवानांना अनेक वेळा पाहिले होते. दरवेळी कर्नल सर्वांपुढे क्रॉलिंग करताना दिसत असे.

कर्नल फिलिप्स हा खरा ओफिसर होता. तो प्रथम नेता होता, मग अधिकारी. बाकी सारे अधिकारी म्हणजे अधिकारीच.

सर्व जवान त्याच्या दृष्टीने सारखेच. एकसारखाच दुसरा. सर्वांशी वागणूक एकच .अधिकारयुक्त. पण फिलिप्स हा प्रत्येक जवानाला माणूस म्हणून ओळखत होता .

डिकीला शेखूची आठवण झाली. ओफिसर्सबद्दल बोलायला लागले, की शेखू चिडून जाई. तो म्हणे,

' ब्रिटिशांच्या जमान्यात हे सर्व ठीक होते. सर्व ओफिसर्स हे हुकमत गाजवणारे होते. सत्ताधारी देशाचे ते प्रतिनिधी होते, आणि सर्व जवान एका गुलाम देशाचे प्रतिनिधी होते. ओफिसर्स हे प्रथम ब्रिटिश होते. जवान भारतीय होते. ह्या संबंधांतच त्यांचे नाते निश्चित झाले होते. दोघांमधील भीतीचे अस्तित्व वाजवी होते. भीतीचे आणि भिंतीचेही. राज्यकर्त्यांना तिची गरज होती. स्वातंत्र्यानंतर ही भिंत तोडावयास पाहिजे होती. फोडावयास पाहिजे होती. हे बहुसंख्य ओफिसर्सच्या लक्षातही येत नाही. अपेक्षित बदल घडवून आणायला कुणी तयार नाही. अजूनही ब्रिटिश ओफिसर्सच्या तोऱ्यात हे लोक वागतात.'

शेखूचे म्हणणे बऱ्याच अंशी खरे होते. पण कर्नल फिलिप्ससारखी माणसे त्याला अपवाद. स्वतःच्या कर्तृत्वाने ही माणसे ही भिंत तोडून टाकण्यासाठी धडपडत होती. कळत, नकळत. पण ह्या भिंतीच्या प्रचंडत्वापुढे त्यांचे प्रयत्न अपुरे होते. नगण्य होते. कर्नल फिलिप्सबद्दल सर्वच जवानांच्या मनात आदर होता, प्रेम होते.

काही दिवसांनी लान्स नायक शेखू त्या शीख रेजिमेंटला आला. शेखूची अन् डिकीची दोस्ती चांगलीच गहरी होती. त्या युनिटला पोस्टिंग झाल्यावर काही दिवसांतच त्यांची जोडी जमली होती. शेखू चांगला हॉकीप्लेअरही होता.

उन्हाळयाच्या दिवसांत सर्व दिवस गरम गरम हवा वाहात राही. सिग्नल सेंटरमध्ये ते जाड ओलिव्ह ग्रीन रंगाचे कपडे घालून काम करणे केवळ अशक्य होत असे. रात्रीदेखील दोन-अडीच वाजेपर्यंत गरम 'लू' चालूच राही. त्यातून मच्छरदाणी वांधण्याची सक्ती. डिकीला मच्छरदाणीच्या आत गुदमरल्यासारखे होई. तो नियमाप्रमाणे 'रोल कॉल' च्या अगोदर सहा वाजता मच्छरदाणी लावून ठेवीत असे आणि रात्री झोपताना लाईट ओफ झाल्यावर मच्छरदाणीबाहेर डोके काढून झोपत असे.

इतक्या उष्णतेत डासांची वीण वाढणे अशक्यच होते. 'मलेरिया प्रिकॉशन' हा एक भयानक प्रकार .संध्याकाळी सूर्य मावळल्यानंतर उघडया अंगाने राहण्यास सक्त मनाई होती. पायात सॉक्स व फुल स्लीव्हजचा शर्ट,शर्टाची बटणे गळयापर्यंत लावलेली, डोक्यावर टोपी. ह्या नियमांचा भंग करणे, नियमांच्या योग्यायोग्यतेबद्दल शंका घेणे म्हणजे देखील गुन्हाच .शिस्तभंग.

सुभेदारसाब कधी तरी अचानक 'रोल कॉल'च्या वेळेस हजर राहात. मग सर्वांना पॅन्टस् उचलून सॉक्स दाखवावे लागत. ज्यांच्या पायांत सॉस्क नसतील किंवा ज्यांनी हा स्लीव्हजचा शर्ट घातला असेल, त्यांना दुसऱ्या दिवशी ओफिसमध्ये हजर व्हावे लागे. तरीदेखील रात्री लाईट ओफ झाल्यावर व कंपनी हवालदारचा फेरा येऊन गेल्यावर डिकी व शेखू आपल्या खाटा उचलून बरॅकजवळील हॉकी ग्राऊंडवर झोपायला जात असत.

शेखू बोलायला लागला, की डिकीला बलबरसिंगची आठवण येत असे.

'लडाई में शहीद होने का मुझे शौक नही है। 'शेखू बेडवर पडल्या पडल्या बोलू लागे, आणि बोलता बोलता तो उठून बसे.

सरदारजी असूनही तो दाढी कापत असे, केसही कापत असे.

' मी नैसर्गिक जन्म घेतलाय. अगदी पूर्ण दिवस आईच्या पोटात राहून. मला नैसर्गिकच मरण हवे. मी म्हातारा होऊन मरणार. युध्दतून पळून जाण्यात मला शरम वाटणार नाही. सद्सद्विवेकबुध्दीची टोचणी मला सतावणार नाही.'

' अखेर फौजी जवान जगतो, लढतो, मरतो कशासाठी रे? यांच्या अस्तित्वावर गदा आली की, ह्यांना आपली आठवण येणार. सरहद्दीवर शस्त्रास्त्रांची जमवाजमव सुरू झाली, म्हणजे रेडिओवर हे जवानांची स्तुतिस्त्रोत्रे गाऊ लागणार. वर्तमानपत्रात, मासिकांमध्ये वीररसामध्ये थबथबून ओथंबलेली गीते प्रसवू लागणार. ह्यांच्यासाठी, ह्या किडयांसाठी, आम्ही आमचं जीवन बरबाद करतोच आहोत आणि मरायचंही ह्यांच्यासाठी! नहीं, डिकी, नहीं! मै ये कभी मानूँगा नहीं। अरे, ह्यांचं माणूसपण टिकावं, म्हणून आमचं माणूसपण नष्ट करतात. जनावरं बनवतात आम्हाला. '

यू आर् नॉट टू क्वेशन व्हाय!'

आपण चेंगीझखानाचे वंशज, समोर येणाऱ्या माणसांच्या पोटात संगिनी खुपसून आतडी बाहेर काढणार, अन् ह्या आतडयांमध्ये वीरचक्र ओवून गळयात लटकवून मिरवणार! नाही, डिकी, नाही। मी माणसासाठी मरायला तयार आहे, ह्या पशूंसाठी नाही!'

डिकी गोंधळून जात असे .आपल्या रोजच्या रुटीनमध्ये काटेकोर शिस्तीने वागणारा, आपला टर्न आऊट, किट ले आऊट, सॅल्यूटिंग ह्या सर्वांमध्ये अत्यंत व्यवस्थित असलेला शेखू आणि त्याचे हे विचार ह्यांचा मेळ त्याला घालता येत नसे.

एका पायावर भार टाकून कधी आकाशाकडे तर कधी जमिनीकडे पाहात डिकी उभा होता. सी.एच.एम. 'डेली ओर्डर' वाचून दाखवत होता. कंपनी हवालदारचा हा फतवा ऐकणे खरोखरच बोअरिंग प्रकार होता .त्यातून आज ओर्डरमध्ये एरिया कमांडरच्या भावी भेटीची सूचना होती. सब् एरिया कमांडर चौदा दिवसांनंतर युनिटला भेट देणार होता. ओर्डर वाचून संपविल्यानंतर सी.एच.एम. ने आपले भाष्य सुरू केले.

सब् एरिया कमांडरसाबके इन्स्पेक्शनके दिन स्पेशल परेड होगी। सब जवान, चाहे सिग्नल सेंटर शिफ्ट मे हो या और किसी डयूटी मे, चाहे नाईट डयूटी, चाहे डयूटी ओफ, हरेक जवान परेड मे होगा। आजसेही ड्रिल प्रक्टिस शुरू होगी। हरेक जवान रोज सुबह, दोपहर, परेड ग्राऊंडपर हाजिर होगा। किसी भी जवान को इससे छुट्टी नहीं, समझे? कोई डाऊट? आगे, सब् एरिया कमांडरसाबके व्हिजिटके दिन 'किट ले आऊट' होगा। हर जवान किट ले आऊट करेगा। किसी के पास कुछ ऐटम इश्यूड् नहीं है, वो आजही क्वार्टर मास्टरसे ले ले। आगे, बरॅककी सफाई... ओफ शिफ्ट के जवान, ओफ टाईम में बरॅक की सफाई करेंगे। बरॅककी अंदरसे, बाहरसे, युनिट के इर्दगीर्द, दायें बायें, सब चकाचक माँगता हूँ। कलसे गेम परेड बंद. सिर्फ फटीग चलेगी, सिर्फ सफाई। '

डिकी विचारात पडला.स्पेशल ड्रिल म्हणजे रोज सकाळ-संध्याकाळ 'दाया बाया..दाया बाया'. रात्री सिग्नल सेंटर शिफ्ट आणि ओफ टाईममध्ये ही सफाई. आणि किट ले आऊट. सैनिकांना 'इश्यू' झालेल्या सर्व वस्तूंचे प्रदर्शन भरवायचे. पँट, शर्ट, सॉक्स, मच्छरदाणी, ब्लँकेटस्, सतरंजी, बूटस्, दोरी, सोपकेस - अनेक वस्तू, सर्व कपडयांच्या ठरावीक साईझमधील घडया, बुटांना पॉलिश, बेल्टची बकल्स् चमकविलेली आणि सर्वांवर आर्मी नंबर घालायचा. आणि हा प्रकार महिन्यांतून कमीत कमी एकदा तरी निश्चित. त्यामुळे सतरंजी, मच्छरदाणीपासून सर्व वस्तूंचा एक सेट सतत कोरा, घडीबंद ठेवावा लागे. ह्या प्रकाराचा उद्देश त्याला कधीच पटला नव्हता.

दुसऱ्या दिवशी डिकी सकाळी सिग्नल सेंटरमध्ये जायच्या तयारीत होता. नायक जोशी बरॅकमध्ये शिरला,

'अरे, भई, कोई खून देनेके लिये तय्यार है? सख्त जरूरत है।'

डिकीने प्रथम त्याच्याकडे लक्ष दिले नाही. शेकडो सिव्हिलीयन्स हल्ली रक्तदान करून देशसेवेचे पुण्य पदरी पाडून घेत होते .दहा-वीस रूपयांसाठी आपले रक्त विकणाऱ्या, आपले शरीर विकणाऱ्या लोकांची इथे कमतरता नाही.शिवाय मिलिटरी हॉस्पिटलमधून रक्ताचा काळाबाजार होतो, ह्या काही लोकांच्या आरोपावर त्याचा पूर्ण विश्वास होता. त्याला सब् एरिया कमांडरच्या भावी व्हिजीटची आठवण झाली. तो नायक जोशीच्या मागे धावला.

' ओ, उस्ताद ! उस्तादजी, अपना 'ओ' ग्रुप है, चलेगा क्या ?'

दहा वाजण्याच्या सुमारास तो एम .एच. मधे हजर झाला. रक्त काढले जात असताना त्याने सुभेदारसाबशीं गप्पा मारायला सुरूवात केली.

सुभेदार गपिष्ट होता. आता रिटायरमेंटला आला होता. गेली तीस वर्षे मेडिकल कोअरमध्ये सर्व्हिस केली होती; पण आता ह्या वयात बाहेर नोकरी कोण देणार? आणि काम काय करणार? आणि पेन्शनमध्ये मुलांचे शिक्षण कसे करायचे, ही चिंता होतीच .दोन-चार वर्षे आणखी एक्स्टेंशन मिळाले, तर ठीक .नाहीतर मुश्कीलच.

टेबलावर पडल्या पडल्या त्याने श्रोत्याचे काम बजावल्यामुळे दोघांच्या गप्पा चांगल्याच रंगल्या. सुभेदारसाबने टेबलाखाली बघितले, अर्धी बाटली भरल्यावर त्याने डिकीला उठावयास सांगितले. त्याला तीन दिवसांची कॅटॅगिरी 'सी' मिळाली आणि सात दिवस 'बी'. म्हणजे तीन बेड रेस्ट, सात दिवस लाइट डयूटी .आणि सुभेदारने वर आश्वासनही दिले.

'अगर दस दिनोंके बाद भी कुछ थकावट महसूस हुई, तो मेरे पास आओ. और सात दिन 'बी' दुँगा।'

सुभेदारसाब मूडमध्ये दिसत होते, त्याचवेळी एक तरुण नर्स व्हरांडयातून टप टप टाचा वाजवित दरवाज्यासमोरून गेली.

डिकीच्या नजरेने तिचा पाठलाग केला.

सुभेदारसाबच्या ते लक्षात आले.

' तुम्हारी ही गाववाली है। बडी कामकी छोकरी। और हैं भी चटक। बंबईकी है ना। क्या नाम हैं? कुछ प्रभा या कुछ ऐसाही...'

सुभेदारला सॅल्यूट ठोकून डिकी घाईघाईने बाहेर आला. प्रभा एका वॉर्डकडून दुसऱ्या वॉर्डकडे चालली होती. डिकीने झपाटयाने चालत जाऊन तिला गाठण्याचा प्रयत्न केला. ती वॉर्डमध्ये शिरण्याच्या आधी डिकीला तिचा क्लोज अप् घेता आला. तिने त्याच्याकडे एक ओझरता दृष्टिक्षेप टाकला. तिचा बांधा आकर्षक होता. तो तसाच पुढे सरकला. त्याने युनिटचा रस्ता धरला.

नर्सेसपर लाईन मारना अपने बसका काम नहीं ।
च्यायला, अनेक ओफिसर्स लाईन मारत असतात ह्यांच्यावर.
साला, ओ .आर.स ना विचारतो कोण?
- आणि ह्या भानगडी करायला वेळ कुणाला आहे?
डे-शिफ्ट, नाईट-शिफ्ट करता करता
आपल्यासारख्यांना परवडणारा धंदा नाही हा.
पण पोरगी तशी छान आहे!

ते तीन दिवस त्याला डयूटीज् माफ होत्या. दुपारी काही उद्योग नव्हता. इतर जवान बॅरक साफ करत होते. सिग्नल सेंटर सुपरिटेडंटला त्याने नाईट-शिफ्टला यायचे कबूल केले होते. त्याच्या शिफ्टमधे ओपरेटर्स आधीच कमी होते. त्याने सिव्हिल ड्रेस चढविला. तो मागच्या बाजूने कम्पाऊंडच्या तारांमध्ये घुसून बाहेर निघाला.

युनिटमधून बाहेर जायचे, तर नियमांप्रमाणे 'आऊट पास' घेऊन बाहेर जावे लागे. बाहर मिलिटरी पोलीस शिकारीच्या शोधात हिंडत राहात. 'आऊट पास' शिवाय जवान बाहेर पकडला गेला, तर सजा होत असे. 'आऊट पास' मिळवण्यासाठी रविवारच्या तीन दिवस आधी नावे द्यावी लागत, कारण दाखवावे लागे .मग आऊट पास च्या दिवशी क्वार्टर गार्ड मधून तो घ्यायचा .युनिटमध्ये परत आल्याबरोबर आऊट पास परत करायचा; क्वार्टर गार्डमध्ये परत आल्याबद्दल रिपोर्ट करायचा. शिवाय बाहेर जाताना फुल मिलिटरी ड्रेस किंवा पांढरी पँट,पांढरा शर्ट व काळी गोल टोपी असा विनोदी पोषाख घालायचा.

डिकीला हे कधीच जमले नव्हते. आतापर्यंत त्याने कधीही आऊट पास काढला नव्हता. मिलिटरी पोलिसांना चकविण्यासाठी त्याच्यापाशी साधी युक्ती होती. बाहेर जाताना तो हातात एक-दोन पुस्तके ठेवत असे आणि आपली चाल बदलत असे.

तो बस स्टँडजवळ पोचला, तेव्हा सिटीमधे जाणारी बस निघण्याच्या तयारीत होती. सर्व प्रवासी आत घुसले होते. तो धावत जाऊन आत शिरला. काही लोक अगोदरच उभे होते. त्याने बसमधील लोकांवरून नजर फिरवली. सिग्नल सेंटरमधे, टेलिफोन एक्स्चेंजमध्ये काम करणाऱ्या सिव्हिलियन पोरी परतत होत्या.

त्याने सुरजित कौरकडे पाहून स्मित केले. मग त्याचे लक्ष प्रभाकडे गेले. उजव्या बाजूस ती बसली होती. आता ती साडीमध्ये होती, दोन वेण्या पाठीवर सोडल्या होत्या. मॅचिंग एकदम कडक! त्याच्या तोंडून नकळत वूल्फ व्हिसल बाहेर पडली. तिने तिरप्या नजरेने मागे बघितले व शेजारी बसलेल्या तरुणाशी ती बोलू लागली. तो तरुण पंजाबी असावा, कुठेतरी ओफिसर. ती दोघे हिंदीत बोलत होती. बसच्या धक्क्यांनी त्यांचे खांदे एकमेकास घासत होते. तो तरुण काहीतरी सांगून सतत तिला हसविण्याचा प्रयत्न करत होता.

डिकी पुढे सरकला. त्यांच्या सीटजवळ आल्यानंतर तो खाली झुकला. पंजाबसारख्या ठिकाणी तो मराठी आहे, एवढे कारण तिच्याशी ओळख करून घ्यावयास पुरेसे होते.

तो पंजाबी तरुण बोलतच होता. त्याच्या खांद्यावर बोटांनी टॅप करीत डिकी म्हणाला,

'एक्स्यूज मी..'

मग प्रभाकडे वळून म्हणाला,

'तुम्ही मराठी ना?'

मग तिला उत्तर देण्याची संधी न देताच तो पुढे म्हणाला,

'तुमच्या वेषावरून आणि कपडयाच्या मॅचिंगवरून ओळखता येतंय्... तुम्ही पुण्याच्या.'

तिचा प्रथम त्रासिक झालेला चेहरा खुलला,

'मी पुण्याची नाही. मुंबईची.' ती म्हणाली.

' मग जमलंच की! आपण एकाच ठिकाणचे.'

काही वेळातच ती दोघे बरीच जुनी ओळख असल्यासारखी गप्पा मारू लागली. आपण पंजाबमध्ये असून जालंदर शहराकडे जात आहोत, हे दोघेही विसरले आणि मुंबईच्या आठवणींत रमले. बस गावाजवळ पोचत आल्याचे लक्षात आले, तेव्हा तिने त्या पंजाबी तरुणाची ओळख करून दिली.

'आप है कॅप्टन ओमप्रकाश शर्मा. आर्मी मेडिकल कोअर मे डॉक्टर, और आप है डिकी - मेरेही गावके रहनेवाले, टेलिफोन ओपरेटर..'

डिकीने प्रभाला आपण सिग्नल कोअरमध्ये सिग्नलमन आहोत,हे सांगितले होते. पण ओळख करून देताना तिने सफाईने ते सांगण्याचे टाळले होते. डिकी क्षणभर विचारात पडला, मग म्हणाला,

' आय ऐम इन् सिग्नल कोअर, सर, सिग्नलमन डिकी...'

त्याचवेळी हस्तांदोलनासाठी त्याने हात पुढे केला.

कॅप्टन शर्मा काही क्षण घोटाळला. एखाद्या सिव्हिलियन टेलिफोन ओपरेटरशी हात मिळवणे ठीक आहे. पण एका ओ.आर.शी? पण अखेर त्याने आपला हात पुढे केला.

डिकीन प्रभाकडे पाहिले .ती काहीशी नाराज दिसत होती.

'वेल, आय ऐॅम प्राऊड ओफ बीईंग अ सोल्जर...' तो तिच्याकडे पाहात म्हणाला.

ती खिडकीतून बाहेर बघावयास लागली.

' मुझे यहीं उतरना हैं, ओ के, सर बाय्!' तो झपाटयात बाहेर पडला.

कॅप्टन शर्माच्या चेहऱ्यावर पसरलेले समाधान त्याला दिसले...

'दॅट बास्टर्ड इज प्लीजड्..'

खाली उतरल्यावर तो लस्सी हाऊसमध्ये शिरला. थंडगार लस्सी पोटात गेली, तेर्हा त्याचे मस्तक जरा शांत झाले. तो उठला आणि बाहेर आला. जवळच्याच टॉकीजमध्ये जाऊन त्याने तिकीट काढले. पायऱ्यांवरून उडया मारीत तो वरच्या मजल्यावर गेला. आत शिरता शिरताच त्याला मागील लाईनमध्ये कॅप्टन शर्मा आणि प्रभा बसलेले दिसले. त्याने डोके खाली झुकवले, तिकिटावरील नंबर पाहल्यासारखे केले आणि खर्च्यांवरील नंबर पाहात तो त्यांच्या दिशेने निघाला. त्याला माहीत होते, ह्या ओड दिवशी पिक्चरला गर्दी कमी असणार. तो कुठेही बसला, तरी काही बिघडणार नव्हते. अगदी त्यांच्याजवळ पोचल्यावर त्याने मान वर केली. त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य होते.

'सो वुई मीट अगेन, ... हॅलो, सर..' त्याने तिच्या शेजारच्या खुर्चीत बैठक मारताना कॅप्टन शर्माला म्हटले.

कॅप्टन शर्माने त्याच्याकडे पाहून स्मित केले. पण त्याचे डोळे आग ओकत होते.

'टू हेल यु गो!'

डिकीन तिच्याकडे पाहिले. तिने अस्पष्ट स्मित केले.

त्यानं तिच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले.

खरे तर डिकी आता शांत झाला होता. त्याने आपले पाय समोरील खुर्चीच्या पाठीला लावले आणि किंचित खाली घसरून तो आरामात मागे रेलला. काही क्षण त्याची नजर सीलिंगवरून, लाईट्सवरून, पड्द्यावरून, प्रेक्षकांवरून फिरत राहिली अन् त्याने झटक्यात मान फिरवली.

ती त्याच्या चेहऱ्याकडेच पाहात होती. क्षणभर तिची नजर खाली झुकली, परत त्याच्य नजरेला भिडली. त्याची नजर धीम्या गतीने तिच्या ओठांवरून,गालांवरून, केसांवरून, खांद्यावरून, छातीवरून, तिच्या पुढयातील हातांवर स्थिर झाली.

परत त्याने तिच्या चेहऱ्याकडे पाहिले. ओठाला मूरड घालून दीर्घ उसासा सोडला आणि मान हलवीत त्याने समोरच्या पडद्याकडे नजर लावली. अंधार झाला, सिनेमा सुरू झाला. तिच्या हाताचा स्पर्श त्याच्या हाताला अधूनमधून होत होता. कॅप्टन शर्माने आपला हात तिच्या पाठीवर सरकवल्याचेही त्याच्या लक्षात आले, पण त्यानंतर त्याचे लक्ष शेजारी काय चालले आहे, ह्याकडे गेले नाही.

हे काम खरोखरच बोअरिंग होत असावे तिला. रात्रपाळी, सतत कण्हणारे पेशंट्स, आरडाओरड, रडारड, मृत्यूच्या ओंगळ रूपाचे सतत दर्शन आणि वर हे मिलिटरी डॉक्टर्स!

- आणि तसा विचार केला, तर त्याला तिच्याबद्दल काही खास आकर्षण वाटत नव्हते, ना शर्माबद्दल असूया. लेट देम एन्जॉय. इथून गेले, की आहेतच ते वॉर्डस.

पडद्यावरील साधनाचे क्लोज अप्स पाहण्यात तो गुंग झाला होता.

इंटरव्हलला कॅप्टन शर्मा बाहेर गेला. ती एक-दोनदा त्याच्याकडे झुकली, तो सरळ पडद्याकडे पाहात राहिला. मग ती एकदम त्याला म्हणाली,

' माझ्या मनात तसे काही नव्हते. तू उगीचच तापलास.'

तिच्या 'तू' म्हणण्याने तो सुखावला.तिच्याकडे वळून तो हसला.

'फरगेट इट. ओके? मुंबईला केव्हा जाणार आता?'

कॅप्टन शर्मा परत आला, तेव्हा ती दोघे गप्पा मारण्यात रंगून गेली होती.

ते दहा दिवस डिकीने मजेत काढले. त्या दिवसांत त्याला सिग्नल सेंटरशिवाय काही काम नव्हते. म्हणूनच त्या आठ-दहा दिवसांत तो दोन-तीन वेळा एम.एच.मधे जाऊन प्रभाला भेटला होता. तिला नेहमी वॉर्डमधे भेटत असे. तो येऊन वॉर्डच्या बाहेर उभा राहिला, की ती काही वेळासाठी बाहेर येई. ते दोघे कॅन्टीनमध्ये कॉफी पिता पिता गप्पा मारीत बसत. संधी मिळेल, तेव्हा तो तिच्या सौंदर्याची स्तुती करत असे. त्यांच्या संबंधांत खूप मोकळेपणा आला होता. पण त्या संबंधांना गहिरा रंग आणण्याचा प्रयत्न त्याने कधी केला नाही. रविवारी वा ओफ डयूटीला तिचा काय प्रोग्रॅम आहे, ह्याबाबत त्याने कधी चौकशी केली नाही. आपल्या पूर्वायुष्याबाबात ती दोघेही मोकळेपणी बोलत, पण एकमेकांच्या वर्तमान आयुष्यात डोकावण्याचा प्रयत्न करावयाचा नाही असा जणू त्यांच्यांत अलिखित करार झाला होता. कधी कधी ती त्याला आपल्या नोकरीतील अनुभव सांगत असे, पण त्याबाबतीत त्याने कधी उत्सुकता दाखवली नाही.

एकदा सिटीमध्ये फिरताना त्याला दुरून प्रभा व कॅप्टन शर्मा येताना दिसले, तो रस्ता बदलून गल्लीत शिरला .प्रथम एक-दोन भेटीत तिने त्याला बाहेर भेटण्याच्या हिन्टस् दिल्या होत्या. पण त्याने दुर्लक्ष केले होते. तिच्या होस्टेलवर मात्र तो कधी कधी जात असे. त्यांचे संबंध एका अशा पातळीवर आले होते, की आपले विचार आडपडदा न ठेवता ते एकमेकाजवळ बोलू शकत असत.

ती त्याला एकदा म्हणाली होती,

'डिकी, तुझ्याशी गप्पा मारायला छान वाटते, रे. तुझ्याशी बोलताना मनावर बिलकूल ताण येत नाही, आपण काय बोलतो आहोत, त्याचा अर्थ काय घेतला जाईल, ह्याची मनाला काळजी नसते.'

तो म्हणाला होता,

'प्रभा, आपल्यातील संबंधांची चिरफाड करून आपल्या मैत्रीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करू नकोस. आपण जिथे पोहचलो आहोत, तिथेच ठीक आहोत. कधी कधी वाटतं, ओ, डॅम इट! सामान्य संकेतांप्रमाणे प्रियाराधन करणं मला शक्य नाही. ज्यांना भरपूर रिकामा वेळ आहे, त्यांनाच ते परवडते. पीपल लाईक मी कॅन नॉट अफोर्ड इट'

ती त्याचा हात थोपटत म्हणाली होती,

'यु डोन्ट नीड टू डू इट, डिकी.'

तिला भेटण्याची अनावर इच्छा त्याला कधी होत नसे, पण तरीही काही दिवस तिची भेट झाली नाही, की त्याला चुकल्यासारखे वाटत असे. तो तिला बऱ्याच दिवसांत भेटला नाही, तर तीही फोन करून त्याची चौकशी करत असे.

---

# रोबो सात



रंगीया स्टेशनला त्याने गाडी बदलली. जुन्या युनिटहून त्याची बदली नव्या युनिटला झाली होती. वेस्टर्न कमांडला. जुन्या युनिटमध्ये त्याने जेमतेम दीड वर्ष काढले होते. आणि एवढयातच त्याची ट्रान्सफर झाली होती. पण त्याच अनपेक्षित काहीच नव्हते. ही एक नेहमीचीच पध्दत. आर्मीच्या अवाढव्य पसार्यात नको असलेल्या, त्रासदायक होत असलेल्या कोणत्याही माणसाची, कुठेही, केव्हाही बदली करता येते.

आर्मीमधून डिसचार्ज मिळावा म्हणून त्याने अर्ज केला होता. कमांडिंग ओफिसरने त्याला इंटरव्हयूला बोलावले होते. त्याचे म्हणणे ऐकून घेतले होते. त्याला उपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्या आणि आठ दिवसांच्या आतच त्याच्या हातात पोस्टिंग ओर्डर दिली. डिकीने आपले किट पाठीवर टाकले, रायफल खांद्याला अडकवून तो आता नव्या युनिटच्या वाटेवर होता.

गाडी अत्यंत संथ गतीने 'पुढे' सरकत होती. सुधारलेल्या सिव्हिलाईझड् जगापासून तो दूर चालला होता. वातावरणाला कसला तरी मादक गंध होता. दूरवर क्षितिजापर्यंत सुपारीच्या बागा, भाताची खाचरे, छोटी छोटी तळी ह्यांनी तो भूभाग व्यापला होता. क्षितिजाशी डोंगरांची शिखरे डोकावीत होती. मधूनमधून छोटी छोटी गावे त्या भूभागावर शिंपडलेली दिसत होती. तो उल्हसित झाला होता.

त्या स्टेशनला गाडी थांबल्याबरोबर चार-पाच स्त्रियांचा घोळका आत शिरला. त्या मिलिटरी डब्यात फारसे लोक नव्हते. त्याच्या शेजारीच बसलेल्या बॉर्डस् रोडस् डिपार्टमेंटमधील माणसाने तो वाचीत असलेले पत्र खाली करून त्या स्त्रियांकडे पाहिले.

तो माणूस उतरत्या वयाचा होता. गेला अर्धा तास तो ते पत्र नजरेसमोर धरून विचारात गुंगला होता. बहुधा ते त्याच्या घरचे पत्र असावे आणि त्या पत्राच्या ओळींमधून डोकावणाऱ्या आठवणींमध्ये तो रमला असावा.

त्या स्त्रियांमधील दोन पोरी संडासजवळील मोकळया जागेत गाणे म्हणत नाचू लागल्या. त्या माणसाने ते पत्र खिशात कोंबले. तो त्या पोरींकडे पाहात होता. त्यांच्यातील एका पोरीने आल्याबरोबर बाकावर बैठक मारली होती. तिच्या मांडीवरील पेटीवर तिची बोटे सराईतपणे फिरत होती. कोणत्या तरी आसामी लोकगीताची धून ती वाजवित होती.

त्यांच्यातील जरा प्रौढ व निबर चेहऱ्याची स्त्री त्या माणसाच्या शेजारी बसली, अगदी त्याला बिलगून बसली.इतर मुली म्हणत असलेल्या गाण्याला ती अधून मधून साथ देत होती. त्या माणसाने तिच्या अंगाभोवती आपला हात गुंडाळला होता. त्याची बोटे तिच्या स्तनावर चाचपडत होती. त्याने तिला काही तरी विचारले, तिने त्याला उत्तर दिले. पण पेटीच्या सुरात आणि इतर मुलींच्या गाण्याच्या आवाजात डिकीला काह ऐकू आले नाही. पण ऐकण्याची गरजही नव्हती

त्या माणसाच्या ओठांवरून ओघळणाऱ्या हास्यामधून, त्याच्या नजरेमधून सर्व काही स्पष्ट होत होते. त्याने खिशात हात घातला. बराच वेळ खिशात चाचपले.खिशातून एक पावली काढून त्याने तिच्या हातात दाबली. पावली काढताना मघाशी खिशात कोंबलेले ते पत्र बाकावरून घसरत जाऊन त्याच्या पायाशी पडले. तिने थोडीशी नाराजी दाखवली; पण पावली कमरेला लावीत ती उठली व त्या माणसाच्या समोर बसलेल्या माणसाकडे सरकली. डिकीने घाईघाईने खिशातून एक रुपयाची नोट काढून समोरील बाकावर ठेवली. त्याने आपल्या सहप्रवाशांकडे पाहिले. समोरच्या बाकावरील दोघे सैनिक हसत होते. एकटक त्या पोरींकडे पाहाणाऱ्या त्यांच्या डोळयांत वखवखलेली भूक होती. त्या पोरींनी आता दुसऱ्या माणसांचा ताबा घेतला होता. दोघी त्याच्याशी लाडीगोडी करत होत्या. त्याच्या खिशाकडे त्यांचे लक्ष होते.

डिकी कोपऱ्यात सरकला, त्याने आपले अंग आक्रसून घेतले होते. त्यांच्यातील एक पोरगी त्याच्याजवळ आली. त्याने बोटानेच बाकावरील नोट तिला दाखवली, ओठावर स्मित आणण्याचा त्याने प्रयत्न केला. आपल्या डोळयांतील घृणा, किळस तिला दिसू नये, असे त्याला वाटत होते. त्या पोरींना कोण नाचावयास लावते, त्यांना रस्त्यावर येण्यास भाग का पडते, हे त्याला समजू शकत होते.

ती पोरगी क्षणभर घोटाळली, त्याच्या चेहऱ्याकडे पाहात राहिली, मग झटकन् तिने ती नोट कपाळाला टेकवून, किंचित खाली झुकून तिने त्याला सलाम केला आणि ती मागे वळली.

मिसामारी स्टेशनवर पाच सहा नग्न मुले आरडाओरड करीत डब्यात शिरली व दुसऱ्या दरवाजाने बाहेर पडली. त्याने बाहेर पाहिले. गाडी स्टेशनच्या बाहेर उभी होती. समोरच एका शेतातील झोपडीबाहेर एक स्त्री कमरेवर पोरीला घेऊन उभी होती. नजर शून्यात लावून, अविचल, स्तब्ध. गाडी चालू झाली, तरी ती स्त्री तशीच उभी होती. खिडकीतून डोके बाहेर काढून तिच्या पुसट होणाऱ्या, अंधारात वितळत जाणाऱ्या आकृतीकडे पाहात राहिला. तिच्या कमरेवर बसलेल्या त्या पोरीचे भवितव्य काय आहे? कदाचित दहा बारा वर्षांनंतरती पोर मोठी होऊन पेटीच्या सुरावर अशीच रेल्वेच्या डब्यात त्याच्यापुढे येईल!

चीनने दिलेल्या धक्क्याच्या खाणाखुणा जरी नष्ट झाल्यासारख्या वाटत असल्या, तरी सैनिक तो प्रसंग अजून विसरले नव्हते. अजूनही गप्पा मारताना जुने लोक एकेका स्थळाशी, रस्त्यावरील मैलांच्या दगडाशी निगडित असलेल्या आठवणी सांगत होते. पंजाब सरहद्दीवर, सरहद्दीपलीकडील माणसांबद्दल असणारा द्वेष, चीड, संताप त्याला अनेकदा जाणवला होता. पण इथे त्याचा अभाव होता. खरे म्हणजे तो प्रसंग एका पराभवाची, एका न लढलेल्या युध्दची कहाणी होती. तरी पण सैनिकांच्या आठवणींना शरम, अपमान, दुःख यांची झिलई नव्हती.

शहरापासून त्याचे युनिट दोन, अडीच मैल लांब होते. रेल्वे लाईनला लागूनच जाणारा रस्ता गावात पोचत होता .गाव छोटेसेच, टुमदार बंगले, बंगल्याभोवती बांबूची विणलेली कंपाऊंडस्, बागेत फुलणारी सुगंधी फुले, आसामी स्त्रिया, ठेंगणा बांधा, रंग सावळाच, पण कांती सतेज, केस लांबसडक, कपडे साधेच .ओठांवर सतत प्रसन्न स्मित.

त्या युनिटमध्ये वेगवेगळ्या कोअर्सची माणसे एकत्र आलेली होती. नेफा एरियामध्ये रोड बांधण्यासाठी शेकडो माणसे दिवसरात्र त्या पावसात, थंडीत, बर्फात राबत होती. त्यांच्या अनेक ब्रँचेसमध्ये एकसूत्रीपणा आणण्याचे, त्यांना आवश्यक अशा सर्वच वस्तूंचा पुरवठा करण्याचे काम त्याच्या युनिटचे होते. त्यामुळे त्या युनिटमध्ये सप्लाय कोअरची माणसे जास्त होती. इथे पी.टी., ड्रिल, परेड सर्व बंद होते. ओफ टाईममध्ये कुणीही सिव्हिल ड्रेस चढवून शहरात जाऊ शकत होते. युनिफॉर्मच घालून बाहेर गेले पाहिजे अथवा भोंगळ, बेढब पांढरा मुफ्तीड्रेसच घालून गेले पाहिजे, असा दंडक नव्हता. त्यामुळे डिकी खूष होता .क्षणाक्षणाला बंदिस्तपणाची जामीव करून देणारी परिस्थिती इथे काहीशी बदलली होती.

त्याच्या सब स्टेशनला असलेले सर्व ओपरेटर्स अनुभवी होते. कामही प्रमाणात होते. मुख्य म्हणजे सिग्नल सेंटरचे काम सोडले, तर फालतू त्रास काही नव्हता. त्यामुळे सिग्नल कम्युनिकेशनचे स्टँडर्ड चांगले होते. बहुतेक ओफिसर्स गावातच घरे घेऊन राहात होते .त्यामुळे ओ.आर. मेसमधील जेवण अत्यंत खराब असे. ओ.आर्सना मिळणाऱ्या राशनमध्ये ओफिसर्सच्या बायकापोरांचा हिस्सा असणे ह्यात गैर काहीच नव्हते. रूल्सप्रमाणे फील्ड एरियामधील ओफिसर्सना फॅमिली घेऊन राहाता येत नसे. म्हणजेच त्यांना क्वार्टर्स मिळत नसत .सिव्हिलियन्सकडून जागा भाड्याने घ्याव्या लागत. ह्या महागाईच्या दिवसांत घरभाडे, घराचा खर्च करून वर ओफिसर्सच्या प्रेस्टीजने राहाणे सोपे नव्हते. त्यामुळे ओफिसर्सच्या मेसमधूनही राशनचा थोडाफार हिस्सा ओफिसर्ससाठी, त्यांच्या बायकापोरांसाठी उपयोगात आणला गेला, तर त्यात गैर काय होते?

कॅम्प कमांडर मेजर पडगीकर गावातच राहात होते. रोज सकाळी एक जवान जीपमधून दुधाचे भरलेले भांडे घेऊन मेजरसाहेबांच्या बंगल्यात जात असे. मिलिटरी कॅन्टीनमध्ये नेहमीच खचाखच माल भरलेला असे. बाजारभावापेक्षा इथे सर्वच वस्तू अत्यंत स्वस्त भावात मिळत असत. पण ओ.आर्सना कॅन्टीनमधून बुट पॉलिशची डबी व ब्रश सोडून काही घ्यावयाचे, तर मेजर पडगीकर किंवा क्वार्टर मास्टरची सही आणावी लागत असे.

दर महिन्याला रेल्वेने, वॅगनने माल येत असे आणि योग्य जागी पोचत असे. ह्या शहरापासून चाळीस-पन्नास मैल अंतरापर्यंत पसरलेल्या युनिट्समधील अनेक ओफिसर्सच्या फॅमिलीज् गावात राहात असत .आठवडयातून मन मानेल तितक्या वेळा हे ओफिसर्स घरी चकरा मारीत असत. त्यांच्यासाठी आर्मी जीप्स होत्याच.

दिब्रुगढला टेम्परररी डयूटीवर जाण्याकरता त्याचा नंबर लागला, तेव्हा डिकी खूष झाला. गावापासून दूर ट्रान्झीट् कॅम्पमध्ये त्याचे ओफिस होते. एका खोलीत ट्रान्समीटर व दुसऱ्या खोलीत दोघां ओपरेटर्सची राहाण्याची सोय होती. झोपडीच्या दरवाज्यातून दिसणारे ब्रह्मपुत्रेचे विशाल पात्र. पाऊस सुरू झाला, की त्यांच्या झोपडीत गुडघा गुडघा पाणी जमत असे.

त्याचा साथीदार नायर एकदम शांत स्वभावाचा माणूस. ना कुणाच्या अध्यात, ना कुणाच्या मध्यात .ट्रान्समीटर सेटवर काम करणे, जेवणे, झोपणे, क्वचित लायब्ररीत जाऊन न्यूजपेपर्स वाचणे, रेडिओ संगीत ऐकणे ह्याशिवाय नायरलाकाही शौक नव्हता.

कंपाऊंडबाहेर पडले, की नदीच्या काठाकाठाने जाणाऱ्या 25-30 फूट उंच बंडवरून गावाकडे जाता येत असे .ब्रह्मपुत्रेने येथे वळण घेतले होते. मुख्य प्रवाह त्यामुळे इथे काठावर येत होता. नेहमीच येणाऱ्या पुरांपासून गावाचे संरक्षण करण्यासाठी नदीला घालण्यात आलेला,नदीला समांतर धावणारा हा बंड माथ्याला दहा-बारा फुट रुंद होता. ह्याशिवाय पात्रातही आडव्या भिंती घालून प्रवाहाचा वेग कमी करण्याचा प्रयत्न केला होता. ह्या भिंतींच्या आधाराने मोठमोठाले दगड पाण्यात सोडायचे काम सतत चाललेले असायचे. दगड सोडीत बांध तयार करायचा, पाण्याने तो वाहून न्यायचा.ही सततची लढाई. मानव व निसर्ग ह्यांचा सततचा संघर्ष.

बंडिंगच्या पायथ्याशी अनेक झोपडयांनी गर्दी केली होती. त्यात राहाणारे बहुसंख्य बंगाली मुस्लीम होते. पूर्व पाकिस्थानातून हे लोक कामाच्या शोधात येत असत. अन्नाच्या शोधात भटकणाऱ्या ह्या माणसांना देशांच्या सीमारेषांचे बंधन नव्हते. बंडवरून जाताना डिकीला ब्रह्मपुत्रेच्या पात्रात वाहणारे गढूल तांबडे पाणी व दूसऱ्या बाजूला ह्या झोपडया व त्यातून राहाणारे अर्धनग्न स्त्रीपुरुष दिसत असत. झोपडयांच्या मागे काही अंतरावर नदीला समांतर जाणारा रोड होता. त्याच्या दोन्ही कडांना टुमदार बंगले होते. अंगणातील सुपारी, नारळ ह्या झाडांमुळे ते बंगले झाकले गेले होते. ह्या बंगल्यापासून झोपडया बऱ्याच लांब होत्या.

डिकीच्या मनात येई, ह्या नदीच्या पाण्याने, ह्या झोपडीतील माणसाने आपली मर्यादा सोडली, तर ह्या बंगल्यांचे काय होईल? ब्रह्मपुत्रा दरसाल पात्र सोडून बाहेर येत असेच; पण ते बंगले तिच्या आवाक्याबाहेर होते. खोलगट भागात वसलेल्या शेकडो झोपडया मात्र वाहत्या पाण्यात नाहीशा होत असत. झोपडयांमधून अल्पकाळासाठी स्थिरावलेले हे शेकडो लोक मग आपली पोटे पाठीशी बांधून परत अन्नाच्या शोधात भटकत निघत. जीवनभर एकच शोध - अन्न .एकच ध्यास - अन्न . जीवन म्हणजे अन्नाचा, निवाऱ्याचा शोध .सत्याचा शोध, आत्म्याचा शोध, परमात्म्याचा शोध. आपली अधू दृष्टी वर उचलून इतक्या दूर बघायची शक्ती त्यांच्यात नव्हती. आपले काटकुळे, भेगाळलेले हात उंचावून इतक्या दूर पोचयाची आस त्यांना नव्हती. शरीराला कसेबसे वाहून नेणाऱ्या त्यांच्या लटलटणाऱ्या पायांमध्ये इतक्या दूर चालायची ताकद नव्हती. जगण्यासाठी पोट भरण्याची धडपड आणि पोट भरण्यासाठी जगणे....एवढेच त्यांना माहीत होते.

रोज रात्री डिकी गावात फिरावयास जात असे. वातावरणात रातराणीचा सुगंध पसरलेला असे. लहक्या फुलक्या सिनेसंगीताच्या लहरी अधूनमधून कानांवर पडत. क्वचित आतून येणारा हास्याचा मंजुळ आवाज त्याच्या पावलांची गती कमी करत असे. त्या अंधाऱ्या रस्त्यावरून सावकाश पावले टाकीत, त्या धुंद वातावरणात स्वतःला हरविण्याच प्रयत्न करणाऱ्या डिकीच्या मनात विचार चालूच राहात.

येथील माणसाला आम्हा सैनिकांबद्दल आदर नाही.
उलट, ह्या माणसाला आपली भीती वाटते, तिटकारा वाटतो.
छोटया प्रसंगांतून ही भीती, हा तिटकारा प्रकट होतो.
येथील आदिवासींमधे आपल्याबद्दल ही चीड का? ही घृणा का?
पण ही घृणा सैनिकाबद्दल आहे,
ह्या सिव्हिलाईझ्ड माणसांबद्दल आहे,
का सिव्हिलाईझ्ड जगाबद्दल आहे?

नाही तरी आम्ही सिव्हिलाईझ्ड माणसांनी ह्यांना काय दिले?
सिफिलीस, गनोरिया? टंचाई, गरिबी? युध्द, रक्तपात?
स्पर्धा, असमाधान?

मिलिटरी म्हणजे सिव्हिलाईझ्ड जगाच्या कराल दाढा .
खायचे दात.

या आदिवासींचे शतकानुशतकांचे जीवन बदलले जात होते.
हजारो नव्हे, लाखो रुपये ओतून,
हजारो माणसांचा घाम, नव्हे रक्त देऊन,
दुर्गम अशा दऱ्याखोऱ्यांतून,
पर्वतशिखरांवरून रस्ते बांधण्यात येत आहेत.
हे रस्ते बांधण्यासाठी, चांगल्या स्थितीत राखण्यासाठी,
ज्यांनी आयुष्यात कधी हिमवर्षाव पाहिला देखील नव्हता,
अशी दक्षिण भारताच्या टोकाकडील शेकडो माणसे
ह्या रक्त गोठवणाऱ्या थंडीवाऱ्यात दिवसरात्र राबत आहेत.
पण येथील माणसाला त्याबद्दल कृतज्ञता तर सोडाच,
सहानुभूतीही वाटत नाही.
हिरव्या जीप्स जाताना दिसल्याबरोबर ही माणसे,
बिचकलेल्या श्वापदासारखी जंगल, दऱ्याखोऱ्याच्या आश्रयाला पळतात.

पण ह्यात त्यांचा दोष काय?
गावापासून दोन मैलांवरून रस्ता जात आहे.
दिवसरात्र जीप्स धावत आहेत.
पण गावात परिस्थिती काय आहे?
गावात अजून तीच परिस्थिती आहे. शतकांपूर्वीची.
जो फरक झालाय, तो अपायकारकच.

देशाचे स्वातंत्र्य दिल्लीच्या लाल किल्ल्यावर फडफडत आहे.
ह्या माणसाला गांधी माहीत नाही.
समाजवाद किस चिडीयांका नाम!
त्यांच्या रोजच्या जीवनावर जोपर्यंत काही परिणाम होणार नाही,
तोपर्यंत या माणसाला.
त्याच्यावर कुणाची राज्यसत्ता आहे, लोकशाही की हुकूमशाही
ह्यांचं सोयर सुतक का असावं?
आणि ह्याच माणसाचं रक्षण करण्यासाटी 'मी' इथे आलो आहे काय?
रक्षण कुणापासून, आणि कुणाचं?
ब्रह्मपुत्रेच्या पुरापासून, उपासमारीपासून?
रोगराईपासून, अज्ञानापासून?
ह्या माणसाचा आणि ह्या देशाचा संबंध काय? नाते काय?

*थोडेसे बाहेर गेले, म्हणजे रोडच्या दोन्ही साईडसना लांबचलांब पसरलेले चहाचे मळे दिसत. शेकडो एकरांचे, हजारो मजूर राबत असलेले ते मळे. त्या मळयांमध्ये टी इस्टेटस्च्या मालकांचे बंगले झगमगताना दिसत. गावामध्ये शिरताना मारवाडयांची दहा बारा घरे. बाहेरून छोटी व कळकट दिसणारी ही घरे; पण आत लाखो रुपयांचा माल खचाखच भरलेला. संपूर्ण नेफा एरियाला, त्या हजारो चौरस भूभागाला वर्षभर रोजच्या गरजेच्या वस्तू पुरवणारी ही बाजारपेठ. ब्रह्मपुत्रेच्या हया काठावरून त्या काठाला माल पोचला, की दाम दुप्पट.*

*कधी कधी सात-सात, आठ-आठ दिवस सतत पाऊस पडत राही .दरवाज्यातून ब्रह्मपुत्रेचे खळाळत जाणारे लाल पाणी दिसत असे. रात्रीच्या वेळी प्रवाहाचा घनगंभीर आवाज येत असे. पलिकडील काठावर दिसणाऱ्या टेकडया ढगांआड झाकल्या जात. त्या क्षितिजावर दिसणारी पर्वतांची अस्पष्ट, अंधूक रेखा पाहून डिकी भयंकर अस्वस्थ होई. पाठीवर सामान घेऊन आता बाहेर पडावे आणि त्या डोंगरदऱ्यांमध्ये, त्या धूसर क्षितिजामध्ये हरवून जावे, असे त्याला वाटत असे .*
*अशा वेळी उगाचच तो ट्रान्समीटर ओन करून 'मोर्स की'वर काही तरी सिग्नल्स पाठवीत राही, उगाचच 'की'शी चाळा करीत राही. समोर 2-3 मेसेजेस पडलेले असत. कुणा ओफिसरची सुटी सॅक्शन झाल्याची सूचना, एखाद्या कर्नलसाबना ट्रान्स्पोर्ट पुरविण्याची सूचना, रंगीया स्टेशनला लिकरच्या खोक्यांची वॅगन आल्याची सूचना, कुणाच्या घरची, आई आजारी असल्याची तार - डिकी त्या मेसेजेसकडे पाहात राही.*

---


रोबो आठ

दिब्रुगढहून परत येऊन डिकीला दोन आठवडे झाले होते.

शो सुटून बाहेर निघताना त्याने घडयाळात पाहिले. साडेबारा वाजत होते. रविवार आणि दुपारची वेळ असूनही रस्ता जवळजवळ निर्मनुष्य होता. आज सिनेमालाही काहीच गर्दी नव्हती. त्याच्याबरोबर टॉकीजमधून केवळ चाळीस-पन्नास माणसे बाहेर पडली. ती माणसे दोन-दोन, तीन-तीनच्या गटांत विभागली गेली आणि वेगवेगळया दिशांनी चालू लागली. त्यांची चाल जलद होती. त्याला वाटले, उगाचच ती मोठ्याने बोलत आहेत. जणू ही निर्मनुष्य शांतता, ही छाती दडपविणारी पोकळी त्यांना असह्य होत होती, आणि ही शांतता नाहीशी करण्यासाठी हे लोक प्रयत्न करत आहेत. त्यांच्या बोलण्यात-हसण्यात काही तरी अनैसर्गिक होते, कृत्रिम होते. पऱ्यावरून वळताना कॉफी हाऊसच्या मालकाकडे पाहून त्याने हात उंचावला आणि ओरडून विचारले,

'एनी न्यूज?'

'नथिंग न्यू!' मालकाने उत्तर दिले.

आपण वाजवीपेक्षा जास्त जोरात ओरडलो, असे वाटून त्याने घाईघाईने नजर फिरवली व तो पुढे चालू लागला. 'नथिंग न्यू! ' तो स्वतःशीच पुटपुटला. खिशातून रुमाल काढून त्याने हाताचे तळवे व बोटे नीट पुसली.

त्याने आकाशात नजर टाकली. काही पांढरे ढग डुलत-डुलत क्षितिजाकडे चालले होते. डॉ. रॉयच्या बंगल्यामधून रवीन्द्र संगीताचे मंद मंद सूर पाझरत होते.

आजचा दुसरा दिवस!

न्यूजपेपर स्टॉल बंद झाला होता. परत मागे वळून, कॉफीहाऊसमध्ये एक कडक कॉफी प्यावी, असे त्याला वाटले. गेल्या वर्षात तो अनेकवेळा आपल्या साथीदारांबरोबर किंवा एकटाच त्या कॉफीहाऊसमध्ये येऊन बसला होता. मालक त्याला चांगलाच ओळखत होता. त्याला वाटले, मालकाच्या चेहऱ्यावरील अस्पष्ट, बोचरे, कडवट स्मित त्याला बोटकारल्याशिवाय राहाणार नाही. तो आर्मीमन होता आणि चीनने दिलेल्या अल्टीमेटमला जणू तोच जबाबदार होता.

पुलावरून जाताना त्याने खाली बघितले. जसुदाच्या झोपडीबाहेर नायक विजयकुमार अस्ताव्यस्त पसरला होता. जवळच बाटली आडवी पसरली होती.

डिकीला वाटले, खाली उतरावे, विजयकुमारला उचलून रिक्शामधून युनिटला न्यावे. ह्यापूर्वीही त्याने दोन-तीन वेळा विजयकुमारला उचलून नेले होते.

' ओ,व्हॉट डिफरन्स डझ इट मेक!'

तो पुढे सरकला. 'तेजपूर बुकस्टॉल' च्या शोकेसमधील 'रेड स्टार ओव्हर चायना' च्या कव्हरने त्याचे लक्ष वेधून घेतले. चीन खरोखरच काही हालचाल करेल काय? चीनने पाकिस्तानच्या पाठीशी का उभे राहावे? त्याच्या या प्रश्नाचे उत्तर त्याला सापडत नव्हते, आणि जी उत्तरे पुरवली जात होती, त्यांनी त्याचे समाधान होत नव्हते. देशाभिमानी चिनी माओने क्रांतिकारी तत्त्वज्ञ माओला गिळले आहे काय?

तलावाला वळसा घालून तो पुढे निघाला. रस्ता हळूहळू अरुंद होत वरती चढत होता. त्या उंच टेकडीवर एक छोटीशी बाग होती, 'पद्मा पार्क'. पार्कच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर तो काही काळ थबकला .मग सर्वात उंच जागी असलेल्या वॉटर टँकपाशी जाऊन तो खाली पाहात राहिला.

नदीच्या पात्रावरून वाहात येणाऱ्या थंड वाऱ्याने तचा चेहरा धुऊन निघाला. पायांशी पसरलेल्या ब्रह्मपुत्रेच्या विस्तीर्ण पात्रावर त्याची नजर संथपणे फिरत होती. टेकडीच्या पायथ्याशी एक लंब वर्तुळाकार जलाशय, मग रेतीच्या लाटा, दूरवर चमकणाऱ्या, पाण्यापर्यंत पोचणाऱ्या. गावाच्या दिशेला काठापासून बऱ्याच दूर,काही होडया, संथ, मंद डौलदार हेलकावे घेत नदीच्या मध्यप्रवाहाकडे, क्षितिजाकडे सरकत होत्या. किनाऱ्यापासून रेतीच्या लाटांवरून चढत, उतरत काही स्त्रिया पाण्याच्या दिशेने जात होत्या.

टेकडीच्या काठाशी तो बसला .त्याने पाय पसरले. क्षितिजे धुंडाळून त्याची नजर परत तळाशी असलेल्य जलाशयावर स्थिरावली .दोन-तीन गिधाडे पाण्यामध्ये आपले पंख पसरून बुचकळया मारत होती. पाठी भिजवल्यावर त्यातील दोन गिधाडे पाण्याबाहेर निघाली व जवळच त्यांनी आपल्या लाल छात्या रेतीमध्ये खुपसल्या आणि आपले प्रचंड पंख संपूर्णपणे उघडून, अंग ढिले सोडून, ती विसावली.

आणखीन् दोन गिधाडे त्याच्या नजरेच्या टप्प्यात आली. आकाशात घिरटया घालीत त्यांनी खालील परिस्थिती नीट न्याहाळली. डिकीला वाटले, आपण हात लांबवला, तर त्यांना स्पर्श करू शकू. पंखांची किंचितही हालचाल न करता ती दोन्ही गिधाडे पाण्याच्या दिशेने झेपावली.

त्याच्याबरोबर पात्रातील कुठल्या तरी झाडावर बसलेले आणखी एक गिधाड खाली उतरले.

पाण्यात शिरून त्या गिधाडांनी आपली शरीरे भिजवली व पहिल्या दोन गिधाडांजवळ जाऊन त्यांनी आपले पंख पसरले.

त्याने आपली नजर वर उचलली. आकाशात आणखी काही गिधाडे घिरटया घालीत होती. काही हळूहळू खाली उतरत होती. त्याच्या पाठीमागून, त्याच्या नजरेच्या टप्प्यापलीकडून आणखी काही गिधाडांनी त्याच्या नजरेच्या कक्षेत प्रवेश केला. त्याने मान उंचावून पाहिले. गावाच्या पलिकडून, नदीच्या किनाऱ्याकिनाऱ्याने काही गिधाडे येत होती. मधूनच काही एखाद्या झाडावर स्थिरावत होती. परत पुढे झेपावत होती . टेकडीवरून तीन-चार मैलांचा परिसर दिसत होता. संथपणे, वेगाने, भराऱ्या मारीत, आकाशात रिंगणे कोरीत, चहूबाजूंनी गिधाडे, अनेक गिधाडे त्याच्या दिशेने येत होती.

ओ हेवन्स !व्हाट इट इज इन् देअर माईंडस्?

त्याची नजर खाली वळली. शेकडो, हजारो असंख्य गिधाडे त्या रेतीच्या मैदानात आपले पंख पसरून सुस्तावली होती. मध्येच काही गिधाडे पाण्यात जाऊन आपले अंग भिजवून येत होती, आणि परत रेतीवर आपले अंग ढिले सोडून बसत होती.

अजूनही गिधाडे येत होती, क्षणाक्षणाला वाढत होती. त्या दुपारच्या गुदमरविणाऱ्या शांतीचा भंग न करता ते हजारों पक्षी तेथे जमा झाले होते. असंख्य पक्षी, असंख्य पंख, असंख्य चोची, कोणत्या निःशब्द, मूक संदेशाने त्यांना एकत्र आणले होते? कोणता शोकदिन, कोणता काळा दिवस पाळण्यासाठी ही गिधाडे एकत्र आली होती? का आपल्या तिक्ष्ण नजरांनी त्यांनी भविष्याचा चाहूल घेतली होती? असंख्य पंख, असंख्य चोची, बाकदार, तीक्ष्ण नखे, व्हाट आर दे प्लॅनिंग? त्यांचा आवाज ऐकण्याचा त्याने प्रयत्न केला. सर्व आसमंत शांत होता .अनैसर्गिक स्तब्धता . विस्तीर्ण रंगमंचावर मूक नाटय घडत होते. काय चालले आहे? व्हॉट अ स्ट्रेंज रिच्युअल!

त्याचा मेंदू बधीर झाल्यासारखे त्याला वाटले. काल रात्रीचा हँगओव्हर अजूनही शिल्लक आहे काय? दिब्रुगढहून सहा महिन्यांनी तो परत आला होता. तेथून यायची त्याची इच्छा नव्हती. पण रिलीव्हरच येऊन हजर झाल्यामुळे प्रश्नच नव्हता. जुन्या सहकाऱ्यांची भेट झाली होती. हवालदार डावऱ्यांनी जमवून ठेवलेली अर्धी बाटली काढली होती. त्यांच्याबरोबर पाच पेग्ज घेऊन तो उठला, पण त्यानंतर दुसऱ्या ग्रुपमध्ये बसलेल्या गीलने त्याला बोलावले होते. त्याने दोन पेग्ज् रिचवले. मग तिसऱ्या ग्रुपने आरडाओरड करून त्याला पाचारण केले. नववा पेग घशातून जाळीत खाली उतरलेला त्याल आठवत होते. त्यानंतरचे सर्व धुंद होते .एकूण चित्र धूसर झाले होते. गेल्या सहा महिन्यांत त्याला पिण्याची इच्छाच झाली नव्हती. काल मात्र त्याने बेलगाम झोकली होती.

त्याला जेव्हा शुध्द आली, तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते. बरॅकच्या व्हरांडयात सतरंजीवर तो एकटाच उघडा पडला होता .चांगलीच थंडी पडली होती. त्याचे अंग अगदी थंडगार पडले होते.

नदीच्या पात्रात अजूनही ते हजारो पक्षी तसेच होते. अजूनही अधूनमधून त्यांच्यांत नवागतांची भर पडतच होती. त्याने आजूबाजूला पाहिले. पाठीमागे वॉटर टँकच्या पलीकडे बागेतील माळी पत्र्याच्या शेडच्या दरवाज्याशी बसला होता, आतील कुणाशी तरी बोलत होता. मुख्य दरवाजाशी काही मुले खेळात रंगली होती. उजव्या बाजूच्या बाकावर एक लठ्ठ स्त्री एक पाय वर घेऊन, अंग ढिलावून बसली होती. तिच्या डोळयांवरील चष्म्याच्या जाड काचा उन्हात चमकत होत्या. त्यामुळे तिचे डोळे उघडे आहेत, की मिटलेले, ते समजणे कठीण होते.

- आणि इथे काही तरी अगम्य घडत होते. काही तरी भयानक, अनाकलनीय. तळपत्या सूर्यप्रकाशात काही तरी घडत होते, आणि कुणाचेच ह्याकडे लक्ष नाही. सर्व माणसे जणू आपापल्या कोषात शिरली आहेत. या बाहेरच्या जगाशी संबंधच नकोय ह्यांना! ह्या भीतीदायक, अज्ञात वास्तवाला नाकारू पाहाताहेत. जणू मनाची,ज्ञानेंद्रियांची कवाडे बंद केल्याने वास्तव 'आहे' चे नाही होणार आहे, विरघळणार आहे. त्याला वाटले, मोठ्याने ओरडून सांगावे,

'अरे, मूढांनो ! अरे, झोपला का आहात? आता तरी डोळे उघडा, वास्तवाकडे पाठ फिरवून 'आहे'चे नाही होणार नाही रे ! मूर्खांनो, तुम्ही नाहीसे व्हाल. जागो.. .जागो !'

विलक्षण खेद आणि संताप ह्यांनी त्याचे मन भरून आले .

'डॅम यू, फूल्स!'

तो कुणावर चिडला होता? का चिडला होता? हे त्यालाच समजत नव्हते.

त्याची नजर परत एकदा त्या गिधाडांकडे गेली. त्या असंख्य गिधाडांना त्याच्या अस्तित्वाची दखलही नसावी. त्याच्या हाताची बोटे जमिनीवर चाचपडत होती. एखादा दगड शोधत होती. त्याने कितीही मोठा दगड फेकला, तरी त्या गिधाडांमध्ये काहीही हालचाल होणार नाही, ह्याची त्याला खात्री होती.

अस्वस्थतेची, अनामिक भीतीचीएक लहर त्याच्या शरीरातून पसरत गेली. आपली दृष्टी त्या दृश्यापासून ओरबाडून काढून बाजूला वळवण्याचा त्याने प्रयत्न केला.हप्नॉटाईझ झाल्याप्रमाणे त्याची नजर त्या निश्चल, निःशब्द घोळक्यावर खिळून राहिली होती. एकटक तो पाहात होता.

आणि झटक्यात त्याने मान फिरवली.

त्याच वेळी तिची नजर त्याच्याकडे वळत होती. तिचे टपोरे डोळे, लहानखोर, प्रमाणबध्द बांधा, लेमन कलरची साडी, आणि मोकळे सोडलेले लांब केस ....तिच्या चेहऱ्यावर अस्पष्ट स्मित डोकावले. काही क्षण रेंगाळले आणि डोळयांत जाऊन दडले.

त्याला जाणीव झाली. तो टक लावून तिच्याकडे पाहात होता.

तिने आपली हनुवटी किंचित उचलून खालच्या दृश्याकडे इशारा केला. त्याने खाली नजर टाकली आणि परत तिच्याकडे पाहिले. तिच्या नजरेत भीती होती. खांदे उचलून त्याने डोके हलवले.

ह्यापूर्वी त्याने तिला पाहिले होते. कदाचित डॉ. रायच्या बंगल्यापाशी. जेव्हा त्यांची परत नजरभेट झाली, तेव्हा त्याने स्मित केले. त्या मोहिनीतून तो मुक्त झाला होता. आपल्या छातीवरील प्रचंड ओझे दूर झाले आहे व आपण मोकळेपणी श्वासोच्छ्वास करू शकतो आहोत, हे त्याच्या लक्षात आले. तो उडी मारूनच उठला. दोन ढांगांत तिच्या शेजारी येऊन बसला. ती त्याच्याकडेच बघत होती.

'की दारूण!'

'यस्, फिअरसम, बट् स्ट्रेंजली फसिनेटींग!' तो म्हणाला.

दुसऱ्या दिवशी दुपारी तो मेसमध्ये गेला. दरवाज्यातून आत जाताच मुगाच्या वरणाचा उग्र वासाने त्याला मागे लोटले. त्याला जाणवले, त्याची भूक नाहीशी झाली आहे. परत वळून तो बॅरकमधे आला. डिश व मग् त्याने खाटेखाली ठेवून दिले.

तो गावाकडे निघाला.

स्वच्छ ऊन पडले होते. बांबूच्या रांगा उन्हात चमचमत होत्या. पावसाने आकाश साफ धुवून निघाले होते. त्यामुळे निळाईला अजूनही गारवा होता. झोपडयांमागे असणारे छोटे छोटे तलाव चमकत होते. पारव्यांचे 'गुटूर्..गुटूर..' संगीत अखंड चालू होते.

युनिटला चक्कर मारून तो रोडवर आला. मेन गेटपाशी दोन सेंट्रीज् बसलेले त्याला दिसले. ह्या दरवाज्यात त्याने पूर्वी कधीही सेंट्रीज् पाहिले नव्हते. बॅरक्सच्या कोपऱ्यांवर खड्डे खणले जात होते.

रस्त्यावरून एक आर्मी मेसेंजर वेगाने मोटर सायकलवरून गेला. थोडयाच वेळात त्याच्या पाठोपाठ आर्मी मोटर्सचा एक मोठा ताफा पास झाला. हे दृश्य खरे पाहता तसे नेहमीचेच होते. पण आज त्याला विशेष अर्थ प्राप्त झाला होता.

बाकी सर्व शांत होते. पेट्रोलपंपावर निळा युनिफॉर्म घातलेला पोरगा काचेच्या खिडकीवर हात टेकवून उभा होता. नितळ हवा असूनही आपल्याला श्वासोच्छवास करणे त्रासाचं होत आहे, असे त्याला वाटले.

क्षितिजावरील हिरव्या टेकडयांना जास्त गहिरेपणा आला होता.

निसर्गाचा मानवाशी काही संबंध नाही.
उद्या बॉम्बर्सचा ताफा घरघरत ह्या गावावरून जाईल,
ह्या बरॅक्सवरून जाईल,
ह्या सुपारीच्या झाडांआड दडलेल्या झोपडयांवरून जाईल .
धुराचे लोट हवेत उठतील.स्फोटांचे आवाज.
भडकत्या ज्वाळा, किंचाळया, आरडाओरड,
कण्हणे, हुंदके अन् आक्रोश.हाका आणि आक्रंदन.
रक्त आणि निर्जीव शरीरे.
आकाशाच्या निळाईवर
धुराचे पट्टे काही वेळ रेंगाळत राहतील.
मग सर्व तसेच पूर्ववत.
हिरव्या रंगाने न्हालेला हा निसर्ग
असाच उगवत्या सूर्याच्या उबदार मिठीत सुखावेल.

दोन सायकलस्वार समोरून आले, आणि त्याच्या विरोधी दिशेला गेले. ते संथपणे पॅडल्स हलवत न बोलता जात होते. टेलिफोनच्या तारेवर असंख्य काळया चिमण्या बसल्या होत्या. रोजच्याप्रमाणेच त्यांचा चिवचिवाट, गोंगाट चालू होता.

ह्या क्षणाला ह्या तारांमधून काय संदेश जात असतील? कदाचित ह्या क्षणाला येथील, नेफाच्या पर्वतराजीतील हजारो अज्ञात लोकांचे जीवन बदलण्यास कारणीभूत होईल, असा शेकडो मैलांवर घेण्यात आलेला निर्णय सरहद्दीवर पसरवला जात असेल. येथील माणसांचे,वृध्दंचे, तरुणांचे, लहानग्या पोरांचे, न जन्मलेल्या अर्भकांचे भविष्य बदलविणारा निर्णय शेकडो मैलांवर, एका दगडी इमारतीत, कॉफीचे घुटके घेता घेता, सिगारेटची राख टाकता टाकता काही माणसांनी घेतला असेल. आणि येथील माणसाला ह्या अज्ञात शक्तीची किंचितही जाणीव नाही.

तो गावात शिरला. गावातील सर्व दुकाने उघडली होती. पण रस्त्यावर गर्दी नव्हती. क्वचित एखादा माणूस न्यूज पेपर घेऊन जाताना दिसत होता. कॉफीहाऊसमधे शिरून त्याने कॉफी मागवली. रोजच्याप्रमाणे वेटरशी तो दोन शब्द बोलला नाही. टेबलावर कपडा मारताना त्याच्याकडे पाहून नेहमीचे ओळखीचे हास्य केले नाही.

कॉफी पिऊन तो बाहेर पडला.  त्याची पावले गावाबाहेरच्या दिशेने वळली. एखाद्या बेडकाला काडीने डिवचल्यावर, तो जसा शरीर फुगवून स्तब्ध बसून राहातो, तसे ते शहर अंग चोरून बसले आहे, आघात व्हायची वाट पाहात, असे त्याला वाटले. चौकातून वळताना पलिकडील चौकातून त्याला आरडाओरड ऐकू आली. पन्नास-साठ लोकांचा घोळका दिसला. तो तसाच पुढे जाणार होता, पण क्षणभर थबकून तो घोळक्याकडे वळला.

गर्दीच्या मध्यभागी एक माणूस गुडघ्यात डोके खुपसून बसला होता. त्याचे सर्व शरीर थरथरत होते .तो हुंदके देत होता. कण्हत होता, त्याच्या पायांशी आजूबाजूला रक्ताचे थेंब पडलेले दिसत होते. हुंदके देता देता तो काही तरी म्हणत होता .तेचे तेच शब्द उच्चारत होता. त्या शब्दांचा अर्थ डिकीला समजत नव्हता. त्याच्या अंगावरील कपडयांच्या चिंध्या चिंध्या झाल्या होत्या. स्टेशनच्या बाहेर असलेल्या झोपडपट्टीतील मजुरांपैकी तो असावा.

डिकीने त्या घोळक्यावर नजर टाकली. एका तरुणाने त्या मजुराचा खांदा गच्च धरून ठेवला होता. आणखी दोन-तीन माणसे त्याला वेढून होती. त्यांच्या चेहऱ्यावर काही तरी शुरत्वाचे, विरत्वाचे कृत्य केल्याचा अभिमान दिसत होता, कृतकृत्य झाल्याचे समाधान होते. त्यांच्यातील एकजण शर्टाच्या बाह्या वर सरकवीत, मोठया आवाजात जमावाला काय झाले, ते सांगत होता. त्याच्या वाक्यावाक्यात शिव्या होत्या, घृणेचा दर्प होता. बोलताना तो वारंवार गुडघ्यात डोके खुपसून बसलेल्या त्या माणसाकडे तिरस्काराने बघत होता. ऐकणाऱ्या माणसांच्या चेहऱ्यांवर विस्मय होता, घृणा होती आणि एक प्रकारचा आसुरी आनंद होता.

बोलता बोलता त्या माणसाने मजुराला लाथ घातली. बसल्या बसल्याच तो माणूस पाठीवर कोलमडला. त्याची नजर जमावावरून फिरली. त्या नजरेत एकच भाव होता, टेरर ! भयानक भीती. एखाद्या सापळयात सापडलेल्या प्राण्यासारखा तो भेदरलेला होता. त्याच्या ओठांतून रक्त येत होते. त्याचा ओठ फाटलेला होता. त्याच्या फाटक्या, घाणेरडया कपडयांवर रक्ताची धार ओघळत होती.

शिव्या देता देता त्या तरुणाने हात उगारला. तो माणूस गडबडा लोळून त्या लोकांची विनवणी करू लागला. त्याच्याभोवती पसरलेला तो घोळका, ती माणसे आसुरी आनदाने हसू लागली, माणसे अधिकच जवळ सरकली.

तो माणूस पूर्व बंगालमधून आला होता. पोटासाठी. तो मुस्लीम होता. अन् भारत आणि पाकिस्तान यांचे युध्द चालू होते. या देशाभिमानी व्यक्तींनी, या घोळक्याने त्याला गाठले होते.

'तो हेर होता. पाकिस्तानी हेर. कबूल करत नाही म्हणजे काय? पीटो सालेको. मारो सुव्वरको! साले नमकहराम!'

तो ओरडत होता. बोंबलत होता. लोकांजवळ दयेची भीक मागत होता.

डिकीला माहीत होते,डिकीची खात्री होती, तो निरपराध होता.

पण हे लोक असे का वागत आहेत? व्हाय् डोन्ट दे सी द आब्व्हीयस? दे आर् टेरिफाईड. प्रचंड भीतीच्या दडपणाखाली ते गुदमरत आहेत.ह्या भीतीच्या, ह्या असुरक्षितेच्या भावनेतून त्यांना सुटका हवी आहे. ते भ्यालेले आहेत आणि स्वतःला सामोरे जाण्याचे धैर्य त्यांच्यात नाही.

स्वतःच्या भेकडपणाला, स्वतःच्या नामर्दपणाला, स्वतःला वाटणाऱ्या भीतीला ते भीत आहेत. आपण भेदरट नाही, आपण डरपोक नाही, आपण शूर आहोत हे स्वतःशीच सिध्द करायचं आहे त्यांना, म्हणून ह्या दुबळया माणसाला त्यांनी गाठले आहे.

' नो! नो! ही कॅन नॉट बी अ स्पाय्!' त्याच्या रक्षणासाठी आपण पुढे व्हावे, लोकांना समजावून सांगावे, असे त्याला वाटले. पण त्याचा उपयोगा होणार नाही, हे त्याला माहीत होते. ह्या जमावाच्या विरोधात उभे राहण्याची त्याची हिंमत नव्हती. त्याला स्वतःची घृणा वाटू लागली.

आय् मस्ट नॉट हेट् मायसेल्फ,
स्वतःबद्दल घृणा....कीव!
ही विषवल्ली माझ्या मनात वाढू देता कामा नये.
इट इज व्हेरी रॅशनल - व्हाट आय् ऐम डुईंग.
मी काय करू शकतो?
कॅन आय् टॉक रीझन विथ दीज् मेन?
ह्यांची बुध्दी नष्ट झाली आहे.
ह्यांची विचारशक्ती भ्रष्ट झाली आहे.
आंधळया संतापाने ह्यांना वेढून टाकले आहे.
खोल खोल भूस्तरामध्ये गाडलेला पशू जागा झाला आहे.
संस्कृतीचा, मानवतेचा कातळ फोडून
हे गाडलेले भूत बाहेर पडले आहे.
माणसातील हा राक्षस,
कॅन आय् फाईट अगेन्स्ट इट्?

त्याने आजूबाजूला पाहिले. ती तेथे उभी होती. जमावापासून दूर. जणू जमावापासून दूर पळून जाण्याच्या तयारीत.

तो तिच्याजवळ सरकला. तो जवळ आला. तरी तिचे त्याच्याकडे लक्ष गेले नाही. ती त्या माणसाकडे पाहात होती. तिच्या चेहऱ्यावर भीती आणि वेदना ह्यांचे भाव होते. त्याच्या लक्षात आले, तिचा श्वासोच्छ्वास जोरजोरात होत आहे कपाळावर घामाचे थेंब उभे आहेत. तिचे डोळे भारल्यासारखे त्या घोळक्याकडे पाहात आहेत. तिचे ओठ थरथरत होते. ती कमालीची घाबरली होती.

त्याने हळूच तिच्या दंडाला स्पर्श केला, ती इतकी दचकली, की त्याला वाडले, ती किंचाळणार .काही क्षण तिच्या चेहऱ्यावर काही भाव उमटलेच नाहीत. त्यानंतर ती पुटपुटली,

'चलो, यहाँसे दूर चलो, जल्दी!'

तिच्या आवाजात कंप होता. त्याने काही उत्तर देण्यापूर्वीच तिने चालायला सुरुवात केली. झपाटयाने पावले टाकीत त्याने तिला गाठले. ती दोघे बरोबर चालू लागली.

गावाबाहेर निघाल्यावर त्यांनी रोडपासून दूर जाणाऱ्या एका पाऊलवाटेने जाण्यास सुरूवात केली. पाऊलवाटेत एक उभा खडक वर्षानुवर्षे लोकांच्या जाण्यायेण्यामुळे गुळगुळीत झाला होता.

डिकी उडी मारून त्यावरून खाली उतरला. त्याने हात पुढे केला. तिने त्याच्या हातात हात दिला. हातात हात धरून ते खाली उतरले. तिच्या हाताला अजूनही कंप होता.

तळाला पोचल्यावर ते जंगलाकडे जाणाऱ्या दिशेने वळले. त्याने तिच्याकडे पाहिले, मृदू स्वरात त्याने विचारले,

'तुम इतनी डरी क्यौं हो?'

बोलण्यापूर्वी तिने कपाळावरून हात फिरवला.

' वो आदमी पूर्व बंगाल का था... मैं भी पुर्वबंगालसे आयी हूँ।'

तो काहीच बोलला नाही, त्याने तिचा हात हातात घेतला.

काही वेळाने त्याने विचारले,

'माझं नाव डिकी. तुझे?'

'सुनीता' ती उत्तरली.

मग दोघांनी एकदम एकमेकांकडे बघितले आणि ती दोघेही हसली.

पाऊलवाट बराच वेळ जंगलाच्या कडेकडेने जात होती. बांबूच्या जंगलाभोवती वळसा घेऊन ती एका हिरवळीपाशी येऊन हिरवळीत नाहिशी होत होती. जंगलाच्या मधे तो लंबवर्तुळाकार मोकळा भाग होता. कदाचित पूर्वी तेथे तळे असावे. पण आजूबाजूच्या भागातून वाहून आलेल्या गाळाने ते भरून गेले असावे, पाचूच्या हिरव्यागार हिरवळीने तो भाग आता झाकला गेला होता. पलीकडे सुपारीची बाग दिसत होती.

मऊ,लुसलुशीत हिरवळीवर त्यांची पावले पडत होती .मधूनच त्या हिरव्या थराखाली असलेल्या पाण्यामध्ये त्यांच्या टाचा ओल्या होत होत्या.

जंगलाच्या कडेकडेने ते सुपारीच्या बागेकडे निघाले. त्याने आता तिच्या दंडाला धरले होते. एकही शब्द न बोलता ती दोघे शेजारून चालत होती. त्या सुपारीच्या बागेत आल्यावर डिकीला झाडांच्या बुंध्यापाशी आडवे पडलेले दगडी खांब दिसले. बहुधा तेथे पूर्वी मंदिर असावे. आता तेथे त्याचे अवशेष अस्ताव्यस्त पडले होते. काही जमिनीत अर्धवट गाडले गेले होते.

ती दोघे एका दगडावर बसली. समोरील हिरव्या गालिच्याच्या चोहोकडांना बांबूचे जंगल होते. त्या जंगलाने पलिकडील विश्व झाकून टाकेल होते, वरती निळया आकाशाची छत्री दिसत होती. दुरून कुठून तरी येणाऱ्या ढोलांच्या सतत ध्वनीमुळे ते छोटे जग तालामध्ये थरथरत होते.

ती दोघं शेजारी बसली होती. तिचा उजवा हात हातात घेऊन तिच्या तळहातावरील रेषांचा आपल्या बोटाने तो मागोवा घेत होता. दुरून येणाऱ्या विमानाची अस्पष्ट घरघर कानांवर आली, तेव्हा तो वर बघू लागला. आवाज वाढत गेला. त्यांच्या डोक्यावरून प्रचंड आवाज करीत ते विमान क्षितिजापार गेले.

ती त्याच्याजवळ सरकली. त्याने आपला हात तिच्या पाठीवरून घेऊन तिच्य खांद्यावर थोपटल्यासारखे केले. तिला धीर देणारे, हिंमत देणारे, काही शब्द त्याला बोलायचे होते, पण त्याला शब्द सुचेनात. तिचे डोके त्याच्या खांद्यावर झुकले होते, आणि नजर समोरील हिरव्या लाटांमध्ये हरवली होती.

सुनीता !
ही सुनीता कोण?
ही अनोळखी पोर आपल्या खांद्यावर मस्तक ठेवून
इतक्या विश्वासाने कशी बिलगली आहे?
आणि आपण तिच्या सहवासात इतके शांत, निर्विकार कसे?
आपल्या मनात तिच्याबद्दल विचार का नाहीत?
ह्यापूर्वी काय, कशाबाबत विचार करत होतो आपण?

तिच्या केसांतील मंद मंद सुगंध त्याला सुखावत होता.

आपण इथे किती वेळ थांबणार आहोत?
ही शांती, हा सहवास, हा एकांत,
एक तासानंतर, एक महिन्यानंतर, भविष्यात कसा आकार घेणार आहे?
आपल्या मनात काय आहे?
डू आय वॉन्ट टू सिडयूस धिस वुमन?

तिच्या हाताच्या पालथ्या पंजावर त्याची करंगळी अलगद फिरत होती. त्या विमानाची घरघर अजूनही त्याच्या कानांत घुमत होती. ह्या परिस्थितीसमोर आपण लाचार आहोत. पण ह्या परिस्थितीला जबाबदार कोण होते? ह्या परिस्थितीचा निर्माता कोण होते? माणूस!

असहायपणे त्याने आकाशावरून नजर फिरवली. आता जर ते विमान आले आणि आग ओकत गेले, तर तो काय करणार होता? मरणारा तो भीत होता काय?

आपली असहायता, लाचारी नपुंसकत्व याची त्याला चीड आली.

तिच्या हाताची कातडी मऊ आणि गुलाबी होती. त्याच्या पंज्यामध्ये तिचा हात लहान मुलाच्या हातासारखा दिसत होता. तिच्या मनगटावरील काचेच्या बांगडयांवर त्याने हळूच टिचकी मारली. त्यांची किणकिण मधुर होती. त्याने परत टिचकी मारली. परत मारली.

त्याच्या लक्षात आले, त्याच्या मनाने तिच्याबद्दल विचार करणे थांबवले होते.

मान वळवून त्याने तिच्याकडे पाहिले. ती त्याच्याकडे पहात होती. तिचे डोळे मंद स्मित करत होते. ते स्मित तिच्या ओठावर उमटले, तेव्हा तिचा खालचा ओठ किंचित बाहेर निघाला. तिने आपली हनुवटी त्याच्या खांद्यावर घासल्यासारखी केले. तिचा हात सोडून त्याने आपल्या हाताची बोटे तिच्या केसांमध्ये खुपसली. बोटे फैलावून त्याने तिचे डोके पकडले आणि हलवले. तिच्या ओठावरील हास्य अधिकच उमलले.

काहीसे वळून त्याने तिच्या डोळयांत पहिले, खोल..खोल. त्याने तिच्या खांद्याला स्पर्श केला. तिने आपले शरीर वळविले आणि ती त्याला सामोरी झाली. त्याने आपले ओठ तिच्या पापण्यांवर अलगद टेकवले.

तो संध्याकाळी परत आला, तेव्हा त्याचे मन अगम्य अशा तरल अवस्थेत होते. त्याच्या मनावरील दडपण नाहीसे झाले होते. चिंतेचे सावट दूर झाले होते. एकमेकांमा मिठीत घेऊन ते दोघे किती तरी वेळ त्या अवस्थेत बसले होते. त्या मिठीत मस्ती नव्हती, आवेग नव्हता, घाई नव्हती. तिच्या केसांत तोंड खुपसताना तिच्या कानाला, गालाला त्याच्या ओठांचा पुसटता स्पर्श झाला होता. तिच्या केसांच्या जाळीमधून त्याला सुपारीची झाडे एकापाठोपाठ उभी असलेली दिसत होती. ढोलाचा मंद आवाज सतत त्याच्या नसांमध्ये घुमत होता. मानेवर व खांद्यावर पावसाचे तुषार पडू लागले. तेव्हाच ती दोघे उठली .आकाशात ढग जमा झाले होते.

'चला जाऊ या...' ती म्हणाली.

परत त्या हिरवळीवर पावले बुडवीत ती दोघे पाऊलवाटेच्या मुखाशी आली. ती दोघे एकाच वेळी थांबली.

'सुनीता'

त्याने तिच्या खांद्याला धरून जवळ खेचले, तिच्या चेहऱ्याजवळ त्याचे ओठ पोचले, तेव्हा त्याचे डोळे मिटलेले होते. आंधळे ओठ तिच्या ओठांचा शोध घेत घेत चाचपडत फिरले, गालावर, हनुवटीवर.

पाऊस जोरात पडू लागला. तो घाईघाईने दूर झाला. रस्त्याकडे वळत वळत म्हणाला,

'दुपारी'

हा अनुभव कुणाला तरी सांगावा, या आनंदात कुणाला तरी सहभागी करावे, असे त्याला वाटले. पण त्याला लाभलेल्या समाधानाची, आनंदाची भावना यांचे यथार्थ वर्णन तो करू शकणार नव्हता. त्याचा अनुभव त्यांना समजू शकणार नव्हता.

सावंत म्हणणार होता,

'शेवटी आसामी पोरगीच गटवलीस हं, साल्या!'

गील हळहळणार होता,

'बेवकूफ, मौका खो दिया! बुद्दू, मजा कर लेना था!'

डाकर्‍यांनी म्हटले असते,

' अखेर आसामी पोरीनंच पटवलं तुला! कुणाची मुलगी आहे? कुठे राहाते?'

तो कुणाचेच समाधान करू शकणार नव्हता, त्या काही तासांच्या दरम्यान त्याने भविष्याचा विचार केला नव्हता, ना भूतकाळाबद्दल, ना तिच्या पूर्वायुष्याबद्दल चौकशी केली होती. आणि तरीही एकमेकांच्या सहवासातील प्रत्येक क्षण त्यांना हवासा वाटला होता. सुखावह वाटला होता. भविष्यात त्यांच्यामध्ये अधिक घट्ट, दृढ नाते निर्माण होणार होते काय? भविष्याची चिंता तो करणार नव्हता...

पाण्याच्या काठाला ते विसावले होते. भोवतालच्या अंधारात पायांजवळील पाणी मधूनच चमकत होते. गार पाण्याचा स्पर्श त्यांच्या पावलांना आल्हाददायक वाटत होता. पैलतीरावर दोन तीन झाडे एकमेकात मिसळून त्यांची एक छायाकृती आकाशाच्या पार्श्वभूमीवर दिसत होती. एखादा अजस्त्र प्राणी आपल्या सावजावर दबा धरून बसल्यासारखी .त्याच्या खांद्यावर डोके ठेवून ती त्याला बिलगली होती. कुजबुजत्या आवाजात ती काही तरी सांगत होती. पण त्याचे तिच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते. त्याला माहीत होते, ती अस्वस्थ झाली आहे. आपल्या अस्वस्थतेला लपविण्यासाठी ती नेहमीच अशी काही तरी बडबड करत असे. तिच्या बोलण्यात सहजता नव्हती. काही तरी निसटत चालले आहे, निसटू पाहात आहे, ह्याची जाणीव तिलाही झाली आहे, हे त्याच्या लक्षात आले होते. पण हा बदल तिला अमान्य होता. त्यांच्या संबंधात होणारा हा बदल तिला अगदीच अनपेक्षित नसणार. पण तरीही वास्तवाला नाकारण्याची तिची धडपड चालली होती. तिच्या मनात काय विचार चालले असावेत? या संबंधांचा शेवट होईल, तेव्हा तिच्यावर काय परिणाम होईल? ह्याबाबत तो विचार करत होता.

त्याच्या दुसऱ्या भेटीनंतर दिवस कसे झपाटयाने गेले होते. चीनने अल्टीमेटम् तीन दिवसांसाठी वाढविला, पण अखेर ना युध्द,ना शांती, अशी स्थिती निर्माण झाली होती. राजकारणात उलाढाली चालू होत्या. पण ह्या सर्व गोष्टींपासून तो दूर झाला होता.

त्या दगडावर ती दोघे तासन् तास बसून राहात; एकमेकांच्या सान्निध्यात काहीही न बोलता, आपल्याच विचारात गुंगून, आपल्याच स्वप्नात रंगून.

कधी कधी ती बोलण्याच्या मूडमध्ये येई. तिच्या घरच्या लोकांबद्दल, लहानपणच्या दिवसांबाबत, तिच्या मैत्रिणीबाबत ती बोलत राही. आणि तो ऐकत राही .

कधी तो आपल्या मनातील परस्परविरोधी विचारांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न करीत असे. त्याला सतावणाऱ्या असंख्य प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करीत असे.ते एक प्रकारचे स्वगतच असे. पण ती ऐकत राही.

दोघांच्या मनात एकमेकांविषयी किती आपलेपणा, जिव्हाळा, ओढ निर्माण झाली होती, ह्याची त्याला कल्पना होती. त्याच्या मनातील विचार तिला कसे समजत, ह्याबद्दल त्याला कधी कधी खूप आश्चर्य वाटे .त्यावेळी त्यांच्यातील हे नाते शाश्वतचे नाही, असे कुणी त्याला सांगितले असते तरी त्याला पटले नसते. त्या दिवसांत तिच्या सहवासात सर्व आयुष्य काढायची त्याची तयारी होती. तरीही ह्या प्रेमाला शब्दरूप देण्याचे त्याने टाळले होते. प्रेमाच्या अमरत्वाच्या खुळचट कविकल्पना त्याने कधी रंगवल्या नव्हत्या .शाश्वततेवर त्याचा विश्वास नव्हता. शाश्वतता म्हणजे मोत. अशाश्वतता, नित्य बदल म्हणजेच जीवन. असे डिकीचे मत होते. आणि तरीही त्याला जेव्हा जाणवले, की ते एकमेकांपासून दूर जात आहेत, त्यांच्यांतील संबंधांत दुरावा आकार घेत आहे, तेव्हा तो दुखावला होता. त्यांच्यामध्ये निर्माण झालेली जवळीक कायम ठेवण्याचा प्रयत्न नकळत तो ही करत होता.

त्याने तिच्या मनात डोकावण्याचा प्रयत्न केला. या कटू सत्याला ती सामोरी जाणरी आहे का? तिच्या विचारांचा पाठपुरावा करण्याचा त्याने प्रयत्न केला. त्याला माहीत होते, तिच्या भावविश्वापासून तो दूर होता .त्याची इच्छा असली, तरी तिच्या विश्वात तो प्रवेश करू शकणार नव्हता. स्वतःची इच्छा असूनही तो स्वतःला हवा तसा बदलू शकणार नव्हता. त्याच्या भूतकाळाने त्याला घडवले होते आणि ह्या व्यक्तित्वाला पाहिजे त्या पात्रात ओतून त्याचा आकार बदलता येणे शक्य नव्हते. ह्या कठोर वास्तवाचे अस्तित्व ती नाकारीत होती. आपल्या स्वप्निल कल्पनाविश्वाचा कोष आपल्याभोवती उभारण्याचा प्रयत्न ती करत होती. पण हा खुळेपणा होता. वास्तवाला सामोरे जाणे कितीही यातनामय असले, तरी ते नाकारणे हा मार्ग नव्हता. हा सुटकेचा मार्ग नव्हता.

त्यांची मने फार फार दूर झाली होती. शरीराच्या माध्यमातून हा दुरावा घालवणे शक्य आहे काय?

त्याने आपला हात तिच्या खांद्यावर ठेवला. तिचे शरीर ताठरले. डिकीला तिच्या शरीराच्या सवयी ओळखीच्या झाल्या होत्या. तिच्या पाठीच्या कण्यावरून बोटे फिरवली असता तिच्या शरीराची होणारी थर्थर् त्याच्या ओळखीची झाली होती. तिच्या केसांतील चाफ्याचा वास घेण्याच्या निमित्ताने त्याने आपला चेहरा तिच्या केसांत खुपसला. तिच्या कानापाशी त्याचे ओठ पोचले. तिच्या श्वासांची वाढलेली गती त्याला जाणवली. त्याच्या मिठीत तिचे शरीर हेलावले. तिची हनुवटी धरून त्याने तिचा चेहरा आपल्याकडे वळवला .तिच्या केसांच्या बटांमधून पलिकडील झाडांची छायाकृती दिसत होती. तिच्या ओठांचा पुसटता स्पर्श त्याच्या गालाला झाला. ओठांवर ओठ टेकवून तो किंचित थबकला, आपले शरीर वळवून ती त्याला सामोरी झाली. त्याचा हात तिच्या पाठीवर सरकला.ती त्याला अधिकच बिलगली. थंडीने तिचे ओठ उलले होते. त्याला स्वतःला विसरायचे होते .हरवायचे होते .तिच्या ओठांच्या पाकळया विलग करून त्याची जीभ तिच्या दातांना स्पर्श करू लागली, तिचे संपूर्ण शरीर थरथरू लागले. तिच्या हातांचा विळखा त्याच्या खांद्याभोवती पडला होता. पाठीवर तिच्या तळव्याचा वाढता दाब त्याला जाणवत होता. विचार करणे त्याला थांबवायचे होते.

त्याची नजर क्षितिजाकडे गेली. ती छायाकृती आकाशाच्या पार्श्वभूमीवर दिसत होती. एखादा अजस्त्र प्राणी सावजावर दबा धरून बसल्यासारखी .आकाशात चांदण्या लुकलुकत होत्या. हवेतील गारवा वाढला होता.

' नो! इट्स् ओफ नो यूज. नायदर कॅन आय लूज् मायसेल्फ, नॉर कॅन आय फाईंड हर.'

त्याने आपले डोळे मिटले. त्याच्या हाताची बोटे परत तिच्या शरीरावरून फिरू लागली. त्याने तिला जवळ ओढलेच. तिने विरोध केला नाही; पण तिच्या बिलगण्यात ओढ नव्हती, आवेग नव्हता.

त्याच्या प्रयत्नांतील व्यर्थता तिला जाणवली असावी. त्याने डोळे उघडले. आकाशात चांदण्या लुकलुकत होत्या, गारवा वाढला होता.

ही धडपड व्यर्थ आहे.
तीच नव्हे, मी स्वतःही वास्तवापासून पळायचा प्रयत्न करीत आहे.
वास्तवाला नाकारायचा प्रयत्न करीत आहे.
जे संपले आहे, ते टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे.

तिच्याबरोबर काढलेले हे अनंत क्षण
माझ्या अस्तित्वाचा भाग झाले आहेत.
तिच्या सहवासात मी बदललो आहे.
पण अखेर ह्या क्षणाला मी एकटा आहे.
अगदी एकटा .कायमचा एकटा. शाश्वत एकटा.
ज्या क्षणांनी, ज्या परिस्थितीने,
ज्या सिच्यूएशनने आम्हाला जवळ आणले,
तो क्षण गेला आहे.
ती परिस्थिती बदलली आहे.
ती सिच्यूएशन भूतकाळात विलीन झाली आहे.
ती अनुभव परत जिवंत करण्याचा,
तो क्षण परत जगण्याचा प्रयत्न करणे खुळेपणाचे आहे,
भेकडपणाचे आहे.
'काल' रात्रीच्या पोटात गडप झाला आहे,
'आज' उगवला आहे.


रोबो नऊ

त्याच्या बाजेची जाळी फारच ढिली झाली होती. बाजेवर झोपल्यावर झोळीत निजल्यासारखे वाटत असे .खाली ठेवलेल्या ट्रंकेवर त्याची पाठ टेकू लागली, तरीही त्याने बाजेची दोरी ताणून घेतली नाही. सर्वच गोष्टींचा त्याला कंटाळा आला होता.

ते सबंध युनिट निरुद्योगी आणि बेकार होते. जणू आर्मीच्या ह्या अवाढव्य कारभारात ह्या युनिटचे अस्तित्वच विसरले गेले होते. अनेक ट्रेन्ड, अनुभवी वायरलेस ओपरेटरर्स, रेडिओ मेकॅनिक्स त्या कंपनीत बेकार वेळ घालवित होते. मेकॅनिक्सनी दोन वर्षांत स्क्रूच्-ड्रायव्हर हाती घेतला नव्हता, ओपरेटर्सनी 'मोर्स की' ला हात लावला नव्हता. स्टोअर्समधे, स्टोअरबाहेर उभ्या असलेल्या थ्री टनर्स, वन् टनर गाडयांमध्ये अनेक ट्रान्समीटर्स होते. पण त्यांना रोड फडके मारून साफ ठेवणे एवढेच काम होते.

त्याला या युनिटमध्ये येऊन तीन-चार आठवडे होत आले होते. पण हे दिवस त्याला कित्येक महिन्यांसारखे वाटत होते.

एक सकाळ. तीन-चार मेकॅनिक्स बाथरूम्स भोवतालचे गवत साफ करीत होते. तीन-चार ओपरेटर्स मेसच्या भोवतालचे व काहीजण ओफिसच्या भोवतालचे गवत साफ करीत होते. काही परेड ग्राऊंडवर हातात फावडी घेऊन उभे होते,

सकाळी उठायचे, फुल युनिफॉर्म चढवून, बूट चमकवून, परेड ग्राऊंडवर हजर व्हायचे.'सावधान ! लेफ्ट...राईट, दाया..बाया, दाया...बाया, पीछे...मुड!'ह्यामध्ये चाळीस मिनिटे घालवायची. परत बॅरकमध्ये यायचे. हा पँट, बनियन घालायचा .पी.टी. शूज चढवायचे, ब्रेकफास्ट. हातात पावडे वा खुरपे. अकरा वाजेपर्यंत वेळ घालवायचा. मग जेवण, दुपारची झोप, गेम परेड, रोल कॉल, जेवण, झोप.

सकाळी उठायचे, फुल युनिफॉर्म चढवून, बूट....

आला दिवस संपवणे, जमिनीवर एकही तृणांकूर न वाढू देणे, भिंतींना सतत चूना फासणे, सतत झाडू मारीत राहून धुळीचे कण कुठेच स्थिरावू न देणे, हेच जणू त्या युनिटचे काम होते.

' लान्स नायक डिकी... ' हवालदार निरंजनने त्याला बोलावले.

कमरेवर बेल्ट चढवीत डिकी पाय ओढीत त्याच्याजवळ पोहोचला.

'देखो, डिकी, उधर आठ जवान खडे हैं, उनको लेकर सीधे मेजर सेनके बंगलेपर जाओ। और देखो, डबल अप् करते जाना। देर हो गयी, तो मेमसाब चिल्लायेगी।'

'क्या काम हैं बंगलेपर?' डिकीने विचारले.

'अरे, उस्ताद, तुम पहिले उधर पहुँचो तो सही... पहिलेही देर हो गयी है।'

'लेकिन काम क्या हैं?'

कंपनी हवालदार मेजर निरंजन चिडला. तो जरा जोरातच म्हणाला,

'मेजरसाब, छुट्टी जा रहा हैं... कुछ सामान पैक करना होगा.. शायद सामान गाडी में लोड करना होगा। जल्दी चलो।'

डिकी विश्राम पोझिशनमधून 'सावधान' पोझिशनमधे आला. सहज व संथ स्वरात तो म्हणाला,

'नहीं, मेजरजी, ये काम मुझसे नहीं होगा... किसी और को डिटेल करो...'

हवालदार निरंजनच्या कपाळावर आठ्या पडल्या. त्रासिक स्वरात तो म्हणाला,

' अरे, भई, तुम्हे काम करनेके लिये कौन कह रहा है? तुम्हारे साथ आठ जवान हैं, उनसे करवाओ...'

'देखिये, मेजरजी, ओफिसरका निजी काम ना मैं करूंगा, ना ओर किसीसे करवाऊँगा!'

हवालदार निरंजन काही क्षण अवा होऊन त्याच्याकडे पाहात राहिला. त्याचा चेहरा लालबुंद झाला होता.

'ब्लडी फूल! क्या बकवास है। में कुछ सुनना नहीं चाहता हूँ... ओबे द ओर्डर। निकल जाओ यहाँसे, मार्च ओफ।'

आपले मन खूप उल्हसित झाले आहे, असे डिकीला वाटले.

इफ लाईफ इज् डल, आय मस्ट मेक इट् बेअरेबल!

त्याने आजूबाजूला पाहिले. काही अंतरावर उभे राहिलेले आठ जवान आता त्यांच्याकडे पाहात होते. बाथरूमजवळील जवानांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले होते .थंड आणि संथ आवाजात डिकी म्हणाला,

'मेजरजी, गाली देनेकी जरुरत नहीं है।'

हवालदार निरंजनने आसपास बघितले. सर्वांसमोर ह्या माणसाशी वादावादी करणे ठीक नाही, असे त्याला वाटले असावे. त्याने मोठ्या कष्टाने संताप आवरला व धमकीच्या स्वरात तो म्हणाला,

'चलो, कंपनी सुभेदार साबके पास चलो...'

या बदलत्या परिस्थितीत डिकीला रस वाटू लागला. बऱ्याच दिवसांनी आपण श्वासोच्छ्वास करू लागलो आहोत, असे त्याला वाटले. त्याचा मेंदू सतेज झाला होता. दमदार पावले टाकीत तो हवालदार निरंजनच्या पाठोपाठ निघाला. चालता चालता त्याने आपली बरॅट कॅप अधिकच कानावर खेचून घेतली.

कंपनी ओफिसच्या जवळ आल्यावर हवालदार निरंजनने त्यास बाहेर थांबावयास सांगितले. तो झाडाच्या सावलीत उभा राहिला. हवालदार निरंजन आत गेला. बाथरूमजवळून एक जवान हळूच त्याच्याजवळ आला. त्याने आधी ओफिसच्या दरवाज्याकडे कटाक्ष टाकला, आजूबाजूला बघितले, मग हलक्या आवाजात त्याने विचारले,

'क्यौं, उस्तादजी, की हुआ?'

'सत्यजित बाबूकी नानी मर गयी। 'डिकीने गंभीर आवाजात सांगितले.

क्षणभर बंगालीबाबू चक्रावला, मग रागाचा कटाक्ष टाकीत तो दूर सरकला. 'बोकाचोदा' तो हळूच पुटपुटला. डिकी स्वतःशीच हसला.

सुभेदार मणियार ओफिसमधून बाहेर आला. तो जवळ येईपर्यंत डिकी स्थिर नजरेने त्याच्याकडे पाहात राहिला. सुभेदार अगदी जवळ आला, काही तरी बोलावयास त्याचे ओठ विलग झाले, आणि डिकीने खाडकन् बूट आपटून त्याला कडक सॅल्यूट ठोकला. सुभेदार झटक्यात एक पाऊल मागे सरकला. त्याने सॅल्यूटचा स्वीकार केला.

'व्हाट इज् रॉंग?' सुभेदारन विचारले. त्याने हवालदार निरंजनकडे पाहिले, 'यु डिसओबेड् द ओर्डर?' सुभेदारने त्याला पुन्हा विचारले.

'यस्, सर। आय् सेड्, आय् वुड नॉट डु दॅट टाईप ओफ वर्क। मैं मेरे ट्रेडका काम करना चाहूँगा। इस काम के लिये मुझे पगार नहीं दिया जाता। '

'तुम्हे किस काम के लिये पगार दिया जाता है, इसके बारेमें हम सोचेंगे..तुम तुम्हारा काम करो...' सुभेदार संतापला नव्हता. निदान त्याच्या चेहऱ्यावर तरी संताप दिसत नव्हता, तो जवळ आला, डिकीच्या खांद्यावर हात ठेवीत तो म्हणाला,

'देखो, उस्ताद, पागल मत बनो, और दो महिनोंमें तुम पक्का लान्स नायक बनोगे। कितने साल हुए तुम्हें मिलिटरी मे आकर?'

'चार साल ।'

'चार साल? चार साल में तुम नायक बनने जा रहे हो..यू आर लकी! मत अपना करियर खराब करो। समझदारीसे काम लो..'

'जी? जी, बहुत शुक्रिया...लेकिन मुझसे ये नहीं होगा।' डिकीने उत्तर दिले.

'देखो, उस्ताद, आर्मी में ओर्डर ओबे की जाती है। चाहे गलत हो, या सही। ओर्डर इज् ओर्डर। फर्स्ट ओबे इट् देन रिपोर्ट।'

डिकी काही क्षण स्तब्ध राहिला. त्याच्या लक्षात आले, हाच तो टर्निंग पॉईंट आहे. आता त्याच्या उत्तरावर त्याचे भविष्य आकार घेणार आहे. आय् कॅन मेक माय् ओन डेस्टिनी नाऊ. ह्या रटाळ आणि कंटाळवाण्या जगण्याचा त्याला वैताग आला होता.

बट् आय मस्ट बी रीझनेबल.

त्याच्या मनात विचार आला. पण त्या अगोदरच त्याचे ओठ विलग झाले होते.

' आय् डोन्ट थिंक दॅट इज् द सेन थिंग टू डू. आय् ऐम रिपोर्टींग बिफोर ओबेईंग.'

सुभेदार मणियारने अस्वस्थपणे डाव्या हातातील छडी उजव्या हातात घेतली. काही क्षण खाली मान घालून, छडीचे टोक बुटाच्या 'टो'वर मारीत तो उभा राहिला. हवालदार निरंजन चुळबूळ करीत उभा होता. अखेर सुभेदारने आपली नजर वर केली. हवालदार निरंजनकडे जळजळीत नजरेने पाहात तो म्हणाला,

' कल सी.ओ. साबके सामने हाजीर करो इस जवान को...चार्ज शीटके बारेमें बाद में सोचेंगे। मार्च ओफ।' वळता वळता त्याने डिकीकडे ओझरता कटाक्ष टाकला.

डिकी तेथून सरळ निघाला. बरॅकमध्ये येऊन त्याने चारपाईवर अंग टाकले. काही वेळ तो आढयाकडे पाहात राहिला. मग उशाजवळील हर्मन हेसची 'सिध्दर्थ' कांदबरी घेऊन तो वाचू लागला.

दुपारी चहाच्या वेळी हवालदार निरंजनने त्याला बाजूला बोलावून घेतले.

'देखो, डिकी, ठंडे दिमागसे काम लो। आरामसे सोचो। सोचो, इसका नतीजा क्याझ होगा? तुम्हे कुछ तकलीफ है? मुझे बताओ। आखिर हमारा काम क्या है? अभी कुछ बिगडा नहीं.. मैं तुम्हारी मदद करूँगा। लेकिन तुम कुछ बताओ भी।' हवालदार निरंजन हे प्रकरण वाढू नये, म्हणून प्रयत्न करीत होता.

'जी, बहुत अच्छा, लेकिन मुझे तकलीफ नहीं।' डिकीने उत्तर दिले. त्याला प्रकरण मिटवायचे नव्हते. माघार घ्यायची नव्हती.

दुसऱ्या दिवशी सकाळी 9 वाजता डिकी ओफिसजवळ येऊन उभा राहिला. कालचा बंगाली बाबू अजूनही कालच्याच जागी गवत साफ करत होता.त्याने डिकीकडे पाहून स्मित केले. नायक जाधवने मात्र त्याला आज ओळख दाखवली नाही. नायक शर्मा मात्र ओफिसमध्ये शिरताना त्याच्याकडे पाहून हसला आणि डोके हलवीत आत गेला. थोडयाच वेळात सुभेदार मणियार बाहेर आला. त्याने डिकीचा ड्रेस चेक केला. डिकीने बेल्टची बकल्स चमकवली नव्हती. बुटांच्या 'टो' चे पॉलिश देखील खराब झालै होते. सुभेदार मणियार काही बोलला नाही. पण त्याच्या ओठाला मूरड पडली. डोळे आकुंचित झाले.

'चलो, अंदर चलो । सावधान...'

'दाहिने मुड... तेज चल । बाये घुम.. बाये घुम...'

डौलदार पावले टाकीत डिकी कंपनी कमांडरच्या रूममध्ये शिरला.

ओफिस ओलांडून तो कंपनी कमांडरच्या रुममध्ये शिरला.

'दाहिने घूम... बाये घूम..थंब। दो कदम...पीछे चल्! सॅल्यूट! साब सिक्स टू थ्री सेव्हन सिक्स टू फाईव्ह लान्स नायक डिकी, सर.'

लांबरुंद टेबलामागे बसलेल्या मेजर मोहताने आपली नजर समोरील फाईलमधून उचलली. त्याच्या डोक्यावर तुरळक केस होते. नाक धारदार, ओठ एकमेकावर घट्ट मिटलेले, जिवणी पातळ, आपले दोन्ही पंजे समोरील टेबलावर त्याने पालथे ठेवले होते. बोटांच्या सांध्यांवर सोनेरी केस चमकत होते. सावकाश हात उचलून त्याने डोळयांवरील सोनेरी काडयांचा चष्मा काढला. त्याच्या हातांची बोटे जाड होती आणि बोटांच्या पेरांपाशी गाठी होत्या. चश्मा काढून मेजर मोहता मागे खुर्चीत रेलला. आपले पाय त्याने टेबलाखाली ताणले. कित्येक क्षण तो डिकीकडे स्थिर नजरेने पाहात राहिला.

' अ चीप ट्रीक टू इन्टिमिडेट्...' डिकीचा मेंदू पुटपुटला.

त्याच्या नजरेला नजर देऊन डिकी त्याला न्याहाळीत राहिला.

मेजर मोहताने चश्मा चढवला. बाजूच्या ट्रेमधील फाईल त्याने हातात घेतली. आतील पाने उलटल्यासारखे केले. काही सेकंद पास झाले.

'वेल, डिकी, लान्स नायक डिकी. तुझं रेकॉर्ड तर कौतुकास्पद आहे. गुड डिसिप्लिन, एबल इन् ट्रेड, ट्रान्स्फर्ड विथ स्पेशल प्रमोशन. गुड. व्हेरी गुड! मेर खयालसे छे हफ्तेबाद तुम पक्का लान्स नायक बनोगे...जरा सोच समझसे काम लो। दिमागको जरा ठंडा रखो...'

'जी...' डिकीने हुंकार भरला. तो निराश झाला होता. मजा सुरू होण्याआधीच संपली होती. त्याच्या शरीरातून संतापाची लाट वाहात गेली. कानशिले गरम झाली. तळहाताला घाम फुटल्याचे त्याला जाणवले. एकदम उडी मारून मोहताच्या टेबलावर चढावे आणि घसा फोडून मोठयाने ओरडावे, असे त्याला वाटले, काय ओरडावे? टेलिप्रिन्टरवर अनेक वेळा पाहिलेले ते निरर्थक वाक्य त्याच्या मन:पटलावरून सरकत गेले,

नाऊ इज द टाईम फॉर ओल द मेन टू कम टू द एड ओफ द पार्टी.

हे निरर्थक वाक्य आताच आठवावे, हे त्याला समजेना. आपल्या शरीरात उसळया घेत असलेली ही लाट, हा उद्रेक पाहून तो विस्मित झाला होता. पण त्याचबरोबर आत...आत कुठे तरी तो कमालीचा शांत होता आणि हा संताप, हा उद्रेक निरखीत होता.

'जी...' त्याने परत हुंकार भरला. पण या हुंकारात उद्दामपणा होता. मस्ती होती. आव्हान होते. मेजर मोहताला त्याच्या आवाजातील फरक जाणवला असावा. मेजर मोहताने त्याची फाईल बाजूला ठेवली.

'देखो, लान्स नायक डिकी...' मेजर मोहता काही क्षण थांबला,' आर्मी में सर्व्हिस करना है, तो सुपीरिअर्स को ओबे करना पडेगा। ओबे द ओर्डर्स, गिव्ह रिस्पेक्ट टु युवर्स सुपीरिअर्स. सर्वीस करना है, तो तरीकेके साथ करो। तुम्हे सर्विस करनी है, या नही?' हा प्रश्न नव्हता, ती धमकी होती.

दीज् ओफिसर्स, दे ओलवेज् टॉक इन् क्लीशे, लाईक मशीन्स.

'जी,नही।' डिकीने पटकन् उत्तर दिले. त्याचा मेंदू आता पूर्णपणे जागृत झाला होता. खोलीतील प्रत्येक हालचाल त्याचे डोळे टिपत होते. त्याचे कान प्रत्येक आवाज ऐब्सॉर्ब करीत होते. आपल्या पायांना कंप सुटलेला पाहून त्याला आश्चर्य वाटले.

मेजर मोहताला त्याचे हे उत्तर अनपेक्षित होते. त्याने आपले टेबलावरील हात टेबलाखाली घेतले. तो खुर्चीवर सावरून बसला. शेजारी सुभेदार मणियारने अस्वस्थ चुळबूळ केली. बराच वेळ मेजर मोहताची नजर टेबलावर खिळून राहिली. त्याने आपली नजर वर उचलली, तेव्हा त्याच्या ओठावर स्मित होते.

'लेकिन क्यौं, क्या तकलिफ है तुम्हे? बोलो, खुले दिलसे कहो!' मेजर मोहता म्हणाला.

डिकी काही वेळ शांत राहिला.

'शॅल आय् टेल यु द ट्रूथ, सर?' त्याने विचारले.

'ओफ कोर्स, ओफ कोर्स। आय् वॉन्ट द ट्रूथ। सच कहो। डरो मत।' मेजर मोहता म्हणाला.

सुभेदार मणियारने सोडलेला सुस्कारा डिकीच्या कानांवर आला.

'डरो मत, माय फुट्!' त्याचा मेंदू पुटपुटला.

प्रत्यक्षात त्याने उत्तर दिले, तेव्हा त्याच्या आवाजात कंप होता.

'आय् डोन्ट थिंक दॅट बाय् सर्व्हिंग इन् द आर्मी, आय् ऐम सर्व्हिंग द नेशन!'

क्षणभर....एक क्षण..शांतता. दुसऱ्याच क्षणाला मेजर मोहता दोन्ही हातांच्या मुठी टेबलावर आपटून ताडकन् उभा राहिला. रूक्ष आणि भसाडया आवाजात तो काही तरी ओरडत होता. संतापाच्या भरात तो बहुधा त्याच्या मातृभाषेत बोंबलत होता.

सुभेदार मणियार पुढे धावला होता, पण टेबलाजवळ पुढे काय करायचे, हे लक्षात न आल्याने भांबावून तसाच उभा राहिला. त्याची नजर क्षणात कंपनी कमांडर मेजर मोहतावर, तर क्षणात डिकीवर अशी झोके घेत राहिली.

बाहेरच्या ओफिसमध्ये घाईघाईने खुर्ची सरकवल्याचा आवाज आला. त्यानंतर धावत्या पावलांचा आवाज दरवाज्यापर्यंत येऊन थांबला .टाईपरायटरचा ट ट आवाजही बंद आता पडला. टेबलावरील फॅनच्या झोतात ट्रेमधील कागद मात्र फडफडत होते.

आपल्या छातीच्या पिंजऱ्यावर धडका देत असलेल्या हृदयाचे ठोके डिकीला ऐकू येत होते. आपल्या कपाळावर घामाचे थेंब उभे राहिल्याचे त्याला जाणवले. त्याचे अंग घासाने थबथबले होते. पाय थरथरत होते. त्याने आपले लक्ष मेजर मोहताच्या बोलण्याकडे केंद्रित करण्याचा प्रयत्न केला.

मेजर मोहता वारंवार ' हाऊ यु डेअर? हाऊ यु डेअर?' असे पुटपुटत होता. इम्बेसाईल मशीनचे तुकडे तुकडे झाले होते. डिकीने त्याच्याकडे पाहिले.

त्यानंतर मेजर मोहताचे डिकीकडे लक्ष गेले. डिकीची नजर आपल्यावरच आहेसे पाहून त्याने स्वतःला सावरले. घाईघाईत टेबलावरील हात त्याने मागे घेतलेआणि खुर्चीवर बसत तो ओरडला,

'ले जाओ उसे...टेक हिम अवे...आय से, हू इज ही? हू इज् ही?'

सुभेदार मणियारने डिकीचा दंड धरून बाहेर नेले. अनेकानेक वर्षांची डिसिप्लिन सुभेदारसाब विसरले होते. कंपनी कमांडरसाबना सॅल्यूट न देताच त्यांनी डिकीला खोलीबाहेर काढले होते. ओफिसमधील बाबूलोक घाईघाईने आपापल्या खर्ुच्यांवर स्थानापन्न झाले होते. पण प्रत्येकाची नजर त्याच्यावर खिळली होती .त्यांच्या डोळयांत कुतूहल होते. त्यांच्या डोळयांत विस्मय होता, भीती होती.

त्याला हास्याची उकळी फुटली. त्याला माहीत होते, ते सर्वत्याला पागल समजत असणार. ते त्याला समजूच शकत नव्हते किंवा समजू इच्छित नव्हते. पण तो त्यांचा दोष नव्हता. त्यांच्या डोळयांतील भीती अगदी सहाजिक आणि नैसर्गिक होती. डिकीच्या मनात उलटसुलट विचारांचे, शंकेचे, भीतीचे, आनंदाचे वादळ उठले होते. ऐन्ड हियर एन्डस् दॅट मोनोटनी...


त्या संध्याकाळी सेक्शन कमांडर हवालदार नायर त्याच्याजवळ येऊन बसला. सर्व जवान गेम परेडसाठी ग्राऊंडवर गेले होते. बॅरकमध्ये तो एकटाच होता. नायरबद्दल त्याला आदर होता. हवालदार असूनही तो उगाचच आखडूपणा करीत नसे. वरतून आलेल्या ओर्डर्स ज्युनिअर्सना पास करताना, त्यांच्याकडून काम करवून घेताना तो सभ्यतेने पेश येत असे.

अर्थात ह्या क्षणी हवालदार नायरला मेजरसाहेबांनी पाठविले होते, हे निश्चित होते. नायरने त्याला काही विचारले नाही. मात्र तो स्वतःबद्दल बोलत राहिला. नायरची पत्नी आजारी होती. आईवडील म्हातारे, मुलांच्या शिक्षणाचा बोजवारा. गेल्या तीन वर्षापासून त्याला स्वतःला मेडिकल बी मिळालेली. नाईट डयूटी नाही. त्याचा आता काय उपयोग आहे आर्मीला? पण डिसचार्ज मिळतच नाही. पेन्शन फॅसिलिटीज् न घेता जाण्याची तयारी दाखविली, रेकॉर्ड ओफिसची मंजूरीही आली, पण त्याचवेळी सरहद्दीवर परत गडबड सुरू झाली, आणि डिसचार्जऐवजी ह्या युनिटला बदली झाली.

आता पुनश्च हरी ओम् .सर्विस कठीणच. पण आर्मीतून सुटणेही कठीण. वाटते कधी..कधी आयुष्य क्षणाक्षणाने वाया जातंय. कोर्ट मार्शल करून घ्यावे. पण अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. छोटयाशा गोष्टीवर, तात्कालिक अडचणीवर वैतागून चालत नाही. शिवाय सिव्हिलमध्येही कठीण आहे. आर्मीमध्ये दहा-पंधरा वर्षे सर्व्हिस केल्यावर माणूस एकदम निकम्मा होतो .आता इथे हवालदार आहे. बाहेर जाऊन काय करणार?

'बस्, जैसा चलता है, चलाना पडता है। मुझे लान्स नायक होने आठ साल लगे। तुम्हे इतना जल्दी प्रमोशन मिला है। हो सकता है, कमिशन भी मिल जाये, सोचो..' उठता उठता नायर किंचित थांबला व म्हणाला, 'हाँ, एक बात और है, अगर कुछ करना है, तो अभी करो, और दो-चार साल सर्व्हिस हुई तो बस, खेल खतम्।'

---


रोबो दहा

सकाळी डिकी जरा उशिराच उठला. त्याच्या सेक्शनमधील इतर जवान अंगावर कपडे चढवीत होते, काहीजण बुटांच्या लेसेस् बांधीत होते, काही जण अजूनही दाढीच करीत होते. नामदेव झाडू मारत होता. नामदेवने त्याला आज उठवले नव्हते, त्याच्यासाठी चहाही आणला नव्हता. रोजच्या सवयीप्रमाणे डिकी झटकन् उठून दाढीचे सामान पुढयात काढणार होता, पण त्याचे लक्ष कोपऱ्यात शर्टची बटणे लावीत असलेल्या हवालदार नायरकडे गेले. डोक्यावर चादर खेचून त्याने परत डोळे मिटले.

तो उठला, तेव्हा सर्व लोक परेड ग्राऊंडवर गेले होते. त्याने नाईट पायजमा चढविला आणि तो मेसमध्ये गेला. मेस कमांडर मगरम गरम पुऱ्या तोंडात कोंबीत उभा होता. त्याने डिकीकडे दुर्लक्ष केले .डिकीने मग् भरून चहा घेतला आणि तो बॅरकमधे परत आला. खाटेवर बसून तो बराच वेळ घोट घोट चहा घेत राहिला.

तो बाथरूममधून परत आला, तेव्हा सर्व जवान परत आले होते. ड्रिल ड्रेस उतरवून ते हा-पँट व बनियन चढवीत होते. आता अकरा वाजेपर्यंत वेळ काढण्याच्या कामाला जाण्याची तयारी ते करत होते .

हवालदार नायर नेहमीप्रमाणे प्रत्येकाच्या खाटेजवळ येऊन पाहणी करत होता.

'नामदेव, तुम्हारे कंबलका फोल्डींग ठीक नहीं है। और ये किसका बेड है? मास्क्युटो नेट क्यौं नही है? नंबर चार,चारपाई जरासा आगे खींचो, राईट! नंबर सिक्स, पीछे... गुरमुख, दरवाजाके पास झाडू कौन लगायेगा?' हवालदार नायर इन्स्ट्रक्शन देत होता.

डिकीकडे कुणीच लक्ष दिले नाही .तो तसाच बसून राहिला. तिथे असूनही त्यांच्या जगात नसल्यासारखा. आठ वाजता शिट्टी वाजली, सर्व बाहेर निघून गेले, काही वेळ त्यांच्या बोलण्याचा आवाज येत राहिला.

थोडया वेळाने हवालदार निरंजनचा आवाज ऐकू आला.

'कंप..नी....साव...धान्!'

कंपनीला सावधान पोझिशनमध्ये ठेवून हवालदार निरंजन काही फुटांवर उभ्या असलेल्या सुभेदार मणियारला रिपोर्ट द्यावयास जात असणार. त्याच्या बुटांचा खाडकन् आवाज ऐकू आला. मग त्याचा खणखणीत आवाज.

'साब, एकसो अठरा जवान हाजीर है, सर...'

मग काही वेळ अस्पष्ट बोलण्याचा आवाज येत राहिला. हळू हळू सर्व जवान इर्द गीर्द विखुरले. ह्या अशा छोटया नियमांचे, व्यक्तीला ह्या महाप्रचंड, राक्षसकाय यंत्रणेचे गुलाम बनविण्यासाठी, नियमांचे साखळदंड तयार केले आहेत.

सुभेदार मणियार सर्व  बरॅकमध्ये राऊंड घ्यावयास निघाला, दरवाज्यापाशी आल्यावर सुभेदार जरा घोटाळला, मग आत न येता तसाच पुढे सरकला.

डिकीने कंबलची घडी केली. बेड व्यवस्थित केला. हातात पुस्तक घेऊन तो वाचावयास लागला. पण त्याचे लक्ष पुस्तकात लागत नव्हते. बाहेरून येणारे बोलण्याचे आवाज अधूनमधून त्याच्या कानांवर येत होते. वातावरणात भयानक कंटाळा होता, प्रत्येक कण जणू निष्क्रियतेने, आळसाने जडावला होता.

रिकाम्या बरॅकमधून त्याने नजर फिरवली. सकाळपासून त्याच्याशी कुणी बोलले नव्हते. त्यांनी त्याला वाळीत टाकले होते का? सर्वांना तशी सूचना देण्यात आली असेल का?

ओ डॅम इट. हू केअर्स?

एका ओळीत लावलेल्या खाटा. त्या निळया सतरंज्या. उशाच्या बाजूला कंबलची घडी, त्यावर मच्छरदाणीची घडी, घडया एक साईजच्या, एकाच पध्दतीच्या. सेन्टरवर प्रत्येकाचा नंबर.खाटेखाली बुटाचे जोड. लेसेस् व्यवस्थित गाठी बांधलेल्या. सर्व वस्तू जागच्या जागी. नीट. अत्यंत व्यवस्थित, एकही जास्त कपडा बाहेर नाही. एकही जास्त वस्तू बाहेर नाही. जे दिसते, ते सर्व समान. एकाचे सामान दुसऱ्यासारखे.

परेड ग्राऊँडवर जवान एकाच लाईनमध्ये, एका 'रो'मध्ये. इथे मग्ज्, मेसटिन्स, हॅवर सॅस्कस् एका लाईनीत...एका रो मध्ये.

धिस युनिफॉर्मीटी-

इट इज सो डिसगस्टींग !

पण हजारो व्यक्तींवर कब्जा ठेवण्यासाठी, त्यांच्यावर ताबा ठेवण्यासाठी

तोच मार्ग नाही का? टर्न दीज ह्यूमन बीइंग्ज इन् टू मशीन्स. ऐन्ड रूल ओव्हर देम पीसफुली!

सर्व कंबल,मच्छरदाण्या, ह्यांचा एका कोपऱ्यात ढीग करावा. चारपाया उलटया पालटया कराव्यात. बूट भिंतीशी फेकून द्यावेत. ही सिमिट्री, ही युनिफॉर्मिटी...

त्याच्या शरीरावर सर्व बाजूंनी प्रचंड दाब पडत आहे, असे त्याला वाटले. त्याचा जीव गुदमरु लागला. तो तसाच बसून राहिला, विमनस्क.

नऊ वाजले, दहा वाजले. ओफिसमधून बोलावणे येण्याची वाट पाहात तो तेथे बसून होता. त्याने पुस्तक वाचण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण त्याचे लक्ष वाचनात लागत नव्हते .

ओ हेल, व्हाय शुड् आय् केअर?

अकरा वाजले. त्याच्या सेक्शनमधील जवान एक एक करीत परत आले. पण कुणी त्याच्याशी बोलावयास राजी नव्हते. जणू त्यांच्यापुरते त्याचे अस्तित्वच संपले होते. आपले लक्ष नसताना तेआपल्याकडे टक लावून पाहतात, याची त्याला खात्री होती. त्याच्या पाठीवर खिळलेली त्यांची नजर त्याला जाणवत असे. कधी तरी अकस्मात मागे वळून तो एखाद्याची नजर पकडत असे. एखाद्या प्राणीसंग्रहालयातील प्राण्याकडे पाहावे, तसे ते त्याच्याकडे पाहात असत.

काय आहे त्यांच्या नजरेत?
केवळ जिज्ञासा, की विस्मय?
हेटाळणी, की द्वेष?
त्यांच्या नजरेतील भाव, त्यांच्या मनांतील विचार ओळखणे कठीण आहे.
एक गोष्ट निश्चित आहे.
यांच्या नजरेत परकेपणा आहे.
एका दिवसात मी ह्यांना अनोळखी झालो आहे.
परका झालो आहे.
कालपर्यंत मी ह्यांच्यातीलच एक होतो.
पण आज ह्यांनी मला नाकारले आहे.
का मी त्यांना नाकारले आहे.

पायांत स्लीपर्स घालून तो बाहेर पडला. सुभेदार मणियार ओफिसबाहेर पडत होता. त्याने डिकीकडे पाहिले व सायकलवर स्वार होऊन घराच्या रस्त्याला लागला.

आज ना उद्या त्यांना माझ्यावर चार्जेस ठेवावेच लागतील.
दोन दिवसांपासून मी ह्या युनिटमध्ये आराम करतो आहे.
मन मानेल तसा हिंडतो, कोणत्याही परेडला हजर राहात नाही.
फार दिवस त्यांना माझ्याकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही.
सर्व युनिटची डिसिप्लिन त्यामुळे धोक्यात येईल.
तांदळातील खडयाप्रमाणे बाहेर काढून फेकतील ते मला.
पण हा विलंब का?
कदाचित आज चार्जशीट तयार झाले असावे.
उद्या मला कमांडिंग ओफिसरपुढे उभे करतील.
माझ्या गुन्ह्याचा पाढा वाचला जाईल.
चार वर्षांच्या नोकरीचा इतिहास तपासला जाईल.

ह्या बदललेल्या परिस्थितीच्या संदर्भात
त्या इतिहासाचा अर्थ लावला जाईल.
मग तीन ओफिसर्सचे एक पॅनेल नियुक्त केले जाईल.
माझी बाजू मांडणारा एक ओफिसरही असेल त्यात.
होय, प्रत्येक गोष्ट नियमाप्रमाणे झाली पाहिजे.
अगदी काटेकोर.
पॅनेल निर्णय घेईल.
कोर्ट मार्शल करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

मग कोर्ट मार्शलचाही एक सोहळा होईल.
सर्व रेजिमेंटचे जवान, जे.सी.ओ.ज्., ओफिसर्स एक ठिकाणी जमतील.
परत एकदा माझे गुन्हे मला ऐकवले जातील.
परत एकदा पॅनेलचा निर्णय सांगितला जाईल.
कमांडिंग ओफिसर, माझ्या खांद्यावरील कोअरचा बॅच काढून घेईल.
माझा बेल्ट काढला जाईल, मग मी सोल्जर राहाणार नाही.
मी परत सिव्हिलियन होईन.
सिव्हिल जेलमधील अधिकारी त्याच वेळी मला ताब्यात घेण्यासाठी
पोलीस व्हॅन घेऊन उभे असतील.
मग तीन महिने सिव्हिल जेल.

पण हे सर्व नाटक कुणासाठी?
जे अजून चौकटीत आहेत, त्यांच्यासाठी.
कदाचित त्यांच्यामध्ये कुणी तरी,
ह्याच मार्गाने जायचा विचार करीत असेल!
बंडखोराला गोळया घालून ठार करा,
त्याचे मढे वेशीवर लटकवून ठेवा.
-इतरांच्या हृदयात धडकी भरवण्यासाठी.
पण केवळ बेल्ट काढून घेतल्याने मी सिव्हिलियन होणार आहे काय?
केवळ ह्यामुळे माझ्या आयुष्यातील ही वर्षे
'आहे'ची 'नाही' होणार आहेत का?

हे प्रकरण लवकरच संपविले पाहिजे.
' हरी अप्, यू रास्कल्स्!'

जीवनाचे हे पान मला उलटवून टाकायचे आहे. अगदी ह्या क्षणी.
काळाचा वेग मंदावला आहे. पण माझा नाइलाज आहे.
हा खेळ मला खेळावाच लागणार आहे.
त्यांच्या नियमांना धरून. त्यांच्याच पध्दतीने.
पहिले पाऊल तर टाकलेच आहे.
आता माझ्या हातात आहे,
वेट्, वॉच ऐन्ड लिसन.
वाट पाहणे.

लायब्ररी प्रमुख हवालदार बच्चनसिंगने त्याचे हसतमुखाने स्वागत केले. लायब्ररीत अनेक इंग्लिश पुस्तके पडून होती. त्या पुस्तकांच्या चाहत्यांमधे भर पडली, म्हणून हवालदार बच्चनसिंग खूष होता. शिवाय आता वार्षिक स्टॉक चेकिंगची वेळ आली होती. डिकीने बच्चनसिंगला मदत द्यावयाचे कबूल केले होते. बच्चनसिंग खूष असायला ते एक कारण होतेच. बच्चनसिंग गप्पिष्ट होता. त्याच्याशी गप्पा मारता मारता डिकीच्या मनावरील ताण कमी झाला. त्याचे आक्रसलेले स्नायू जरा ढिलावले.

युनिटमध्ये नुकताच एक ऐक्सिडेंट झाला होता, दरवाज्याजवळ उभ्या असलेल्या थ्री टनर ट्रकला पाठीमागून दुसऱ्या ट्रकने टक्कर दिली होती. वाहनांची विशेष मोडतोड झाली नव्हती. पण सिग्नलमन नायडू ठार झाला होता. नायडू सुट्टीवर निघाला होता. सर्व सामान बरोबर घेऊन तो रेजिमेंटच्या मुख्य दरवाजाजवळ उभा होता, स्टेशनकडे जाणाऱ्या गाडीची वाट पाहात. ड्रायव्हरला विचारल्यावर, मोटर स्टेशनकडे जात आहे असे समजल्यावर त्याने घाईघाईने आपले सामान ट्रकमध्ये टाकले होते, आणि तो पाठीमागील बाजूने वर चढत होता. त्याचवेळी मागची गाडी येऊन आदळली होती. केरळमध्ये आपल्या घरी जाण्यासाठी घेतलेले रेल्वेचे वॉरंट खिशात ठेवून नायडूने वेगळाच मार्ग धरला होता.

ते दोघे बराच वेळ बोलत होते. डिकीलाही काही काम नव्हते.

तो जेव्हा परत बॅरकमध्ये आला, तेव्हा जेवणाची घंटा होऊन बराच वेळ झाला होता. हातात डिश आणि मग घेऊन तो मेसकडे निघाला.

मेसमध्ये टेबलाच्या एका कोपऱ्याला तो बसला. त्याच्या बाजूची जागा रिकामीच होती. प्रबोध आला व त्याच्या शेजारी येऊन बसला. हवालदार निरंजन मेस कमांडरशी गप्पा मारीत उभा होता. थोडया वेळाने हवालदार बाहेर गेला आणि प्रबोध त्याच्याजवळ सरकला.

'डिकी, तुमने तो हंगामा कर दिया. कंपनी ओफिस में पूरा दिन उसी बारे में चर्चा होता रहा. कोई कुछ कहता था, और कोई कुछ. मेजर मोहता। दॅट ब्लडी भद्रलोक इज् रिअली कन्फ्यज्ड्. तो तुझ्या वाटेला जाणार नाही एवढयात। अजून तरी चार्जशीट तयार झालेलं नाही।'

प्रबोध बडबड करीत होता. डिकी सुलतान मान हलवीत होता. बोलता बोलता प्रबोध गप्प झाला आणि घोगऱ्या आवाजात त्याने विचारले,

'डिकी, तुम किसी पार्टी के मेंबर हो क्या?

'प्रबोध, डोन्ट टॉक रबिश!'

तो दिवस मावळला.

सर्व दिवस हवालदार नायर त्याच्याजवळ फिरकला नव्हता.

हवालदार निरंजननेही त्याच्याकडे लक्ष दिले नव्हते.

संध्याकाळी सिव्हिल ड्रेस चढवून डिकी बाहेर पडला. कॅम्पबाहेर पडताना दारावरील सेन्ट्रीने त्याच्याकडे रोखून पाहिले, पण त्याला हटकले नाही.

डिकी त्या लांबच लांब रोडवरून चालू लागला. गुळगुळीत, रुंद, लांबच लांब रस्ता. एक एक आलीशान बंगले निरखित तो चालला होता. कोपऱ्यावर 'एस्सो'पेट्रोल पंपाजवळ एका झाडामध्ये शेकडो बारीकसारीक रंगीबेरंगी दिवे लावले होते. रस्ता शांत होता. मधूनच एखादी कार रस्त्यावरून जात होती. त्याने मागे वळून त्या झाडाकडे पाहिले. त्या दाट अंधारात त्या झाडाला रंगीबेरंगी बहर फुटल्यासारखे दिसत होते. उजव्या बाजूस जरा मागच्या भागाला असलेल्या तीन उंच उंच इमारती. त्या बाजूस रोडने दोघे-तिघे तरुण बोलत बोलत त्याच्या बाजूला आले आणि त्याला मागे टाकून झपाटयाने पुढे गेले. त्याच्या मागोमाग एक पोलीस जात होता. डाव्या बाजूस एका शानदार बंगलीसमोर गार्डन चेअर्स टाकून दोन पुरुष, दोन स्त्रिया आपसात बोलत बसले होते. त्यांतील एक स्त्री खळाळून हसली .तिच्या हसण्याचा आवाज फार मधुर होता. त्याच वेळी बंगल्याच्या मागच्या बाजूने एक पांढरा स्वच्छ पोषाख घातलेला नोकर हातात ट्रे घेऊन आला. त्या हसणाऱ्या स्त्रीने, ती ज्या पंख्याने वारा घेत होती, तो पंखा बाजूस ठेवला आणि ट्रेमधील बाटली उचलली.

समोरून येणाऱ्या माणसाला चुकवण्यासाठी डिकी बाजूला सरकला. तो माणूस कपाळाचा घाम पुसत होता. तो वेगाने चालत होता, पण त्या चालण्यात उत्साह नव्हता. तो अत्यंत थकल्यासारखा दिसत होता. परत डिकीच्या कानांवर त्या स्त्रीच्या हसण्याचा आवाज आला. तिच्या आवाजात झोके होते, पण कृत्रिमताही होती.

रस्ता उजव्या बाजूला वळला. पांढऱ्या रंगाची एक भव्य इमारत त्या विस्तीर्ण उद्यानाच्या मध्यभागी उभी होती. ती इमारत पूर्वीच्या काळात, गेल्या शतकात बांधली गेली असावी. एखाद्या राजवाडयासारखी तिची बांधणी होती. उद्यानाचे दरवाजे बद होते. त्या शांत, निःशब्द वातावरणात ती इमारत फारच मोहक दिसत होती.

उद्यानाच्या कंपाऊंडच्या भिंतीच्या आश्रयाला एक कुटुंब राहात होते. ती बाई दगडावर काही तरी वाटण वाटत होती. तिच्या शेजारी एक मोठ्या पोटाचे पोर रडत बसले होते. ती स्त्री आपल्याच कामात दंग होती. आणखी दोन मुले जवळच्या झुडपात अंधारात काही तरी करीत होती. हिरवळीवर एक मनुष्य पाठीवर पडला होता व आकाशातील अंधार निरखीत होता. ते पोर रडतच होते.

डिकी फुटपाथवर उभा राहिला. टक लावून तो त्या स्त्रीकडे, त्या मुलाकडे आणि पाठीमागील त्या राजवाडयासारख्या सफेद इमारतीकडे पाहात होता.

तो फाटक उघडून आत गेला आणि झाडाआड उभा राहिला. ते चौघे अजूनही त्या हिरवळीवर गार्डन चेअरवर बसले होते त्या दोन स्त्रिया आपसांत बोलत होत्या. तो वाट पाहात राहिला. त्याला त्या स्त्रीचे ते मधुर हास्य ऐकावयाचे होते. तो आतुरतेने कान देऊन त्यांचे संभाषण ऐकण्याचा प्रयत्न करीत होता.

बोलता बोलता त्या स्त्रीने मागे खुर्चीवर पाठीवर मस्तक टेकले. आता हसणार...

डिकी दोन पावले पुढे सरकला. तो पुढे सरकला आणि त्याला आश्चर्याचा धक्का बसला. त्या मधुर हास्याच्या ऐवजी त्याच्या कानांवर अत्यंत करुण असे हुंदके ऐकू आले. त्या गार्डन चेअरमधे ती उद्यानातील दगडावर वाटण वाटणारी बाई बसली होती. ती हसण्याचा प्रयत्न करीत होती. पण तिच्या घशातून केवळ हुंदक्यांचाच आवाज निघत होता.

तो आणखी पुढे सरकला. तेवढयात त्याच्या कानांवर शब्द आलेः

' टेक हर अवे, टेक दॅट फुल अवे ! हू इज शी? आय से, हू इज शी?'

त्याने दचकून खुर्चीत बसलेल्या पुरुषाकडे पाहिले. मेजर मोहता त्याच्याकडे पाहात होता. तो झपाटयाने मागे वळला आणि पळत सुटला.

पळता पळता त्याचे आपल्या अंगातील कपडयांकडे लक्ष गेले. तो एकदम उभा राहिला. त्याच्या अंगात पांढरा स्वच्छ पोशाख होता.

त्याने डोळे उघडले. काय विचित्र स्वप्न !कपाळावरील घाम हाताने पुसत त्याने कूस बदलली आणि परत डोळे मिटले.

..खाली वाकून, ओणवा होऊन तो पुढे पुढे जात होता. त्या गुहेत... खोल, खोल,आत...आत. हळू हळू मागून येणारा प्रकाश कमी होत चालला होता. त्याच्या खांद्यांना, दंडांना आता वरचे दगड घासू लागले होते. ती गुहा आता फारच अरुंद झाली होती. ओणवे होऊन देखील पुढे जाता येत नव्हते. हवा गरम आणि कुबट होत चालली होती.

तो क्षणभर बाजूच्या दगडी भिंतीला टेकून विसावला. त्याने पुढे बघितले. दाटणारा काळोख. पुढे चालत जाता येणे अशक्यच होते. तिन्ही बाजूंनी खडकांचे सुळके पुढे आल्याचे अंधूक जाणवत होते. तो पोटावर आडवा झाला आणि भराभर गुडघ्यांच्या आणि कोपरांच्या जोरावर पुढे सरकू लागला. त्याचे गुडघे वारंवार खालच्या करवती धारेच्या दगडांवर घासले जात होते, खरचटून निघत होते. बाजूने पुढे आलेल्या अणकूचीदार खडकांवर आपटत होते. त्याची कोपरे रक्ताळून निघाली होती. कपाळावरून ठिबकणारे घामाचे थेंब त्याच्या डोळ्यांत उतरत होते. घसा कोरडा पडला होता. जमिनीचा गिळगिळीत, बुळबुळीत स्पर्श त्याच्या मांडयांना, पोटाला जाणवत होता.

तो अतोनात थकला होता. त्याच्या पोटातील सर्व स्नायू हळूहळू एकत्र गोळा होत होते. पण क्षणाचीही उसंत न घेता तो पुढे पुढे सरकत होता. जर आपण क्षणभरही थबकलो, तर आपल्याला पुन्हा हालचाल करता येणे अशक्य होईल, हे त्याला माहीत होते. आणि म्हणूनच अजून किती अंतर जायचे आहे, हा विचारही मनात न येऊ देता तो झपाट्याने सरपटत होता. गडद काळोखाच्या दिशेने सरकत होता. कोणत्याही क्षणी आपले मस्तक समोर येणाऱ्या आडव्या भिंतीवर आपटू शकेल असे त्याला वाटत होते .आपला वेग मंदावत आहे, असे त्याला वाटले.

शरीर किंचित उचलून, डोके खाली घालून, दोन पायांमधून त्याने मागे बघण्याचा प्रयत्न केला. मागे गडद काळोख होता. त्याचा कणा वरच्या कातळावर आदळला. तो पोटावर निपचीत पडला, त्याला वाटले, त्या काळोखाच्या पोकळीत आपण अधान्तरी लटकत आहोत, उलटे, पाय पोटाशी घेऊन.

-आणि त्याच्या कानावर तो आवाज आला. पार दुरून येणाऱ्या आगगाडीच्या शिट्टीसारखा, शिळेसारखा. तो आवाज मधूर होता, पण त्या मधुरतेत काही तरी भयावह होते. त्या शिळेमध्ये हेलकावे नव्हते,झोके नव्हते. अत्यंत नियमित. प्रत्येक क्षणाला, क्षणाक्षणाला ती शीळ अधिक तीव्र, उच्च कर्कश होत चालली होती.

तो पुढे सरकत होता. झपाट्याने .काही क्षणातच तो काळोख, त्याच्या मांडयांना, गुडघ्यांना, शरीराला स्पर्श करणारा तो कातळ, त्याचे शरीर, सर्वच, त्या शिळेबरोबर थरथरू लागले. आवाजाची तीव्रता एवढी वाढली होती, की पुढच्या क्षणाला आपला मेंदू क्रिस्टल ग्लाससारखा खळ्ळकन् फुटेल आणि त्याचे तुकडे तुकडे होतील, अस् त्याला वाटत होते.

आवाजाची तीव्रता वाढतच होती. आंधळया, पिसाळलेल्या प्राण्यासारखा तो धडपडत, टकरा देत पुढे पुढे सरकत होता. त्याच्या मेंदूतील, शरीरातील रेणू न् रेणू थरथरत होता, कंप पावत होता.

-अन् तो एकदम थबकला.त्या काळोखात, त्या अज्ञातात, त्याने आपला हात पुढे सरकवला. त्याच्या हाताला दगडाचा कठीण स्पर्श झाला. आपले गुडघे पोटाखाली खेचून त्याने जरा वर चाचपलेच.

'सो धिस इज् एण्ड.'

अगदी पहिल्या क्षणापासून त्याला ठाऊक होते, की हाच शेवट आहे. इम्पास.कोंडी. डोळे घट्ट मिटून त्याने आपले डोळे दंडावर टेकवले आणि पाय ताणले....शांती.

- आणि एकाएकी त्याच्या अस्तित्वात दाट गडद भीतीची कळ उमटली. त्याने धडपडत उठून बसायचा प्रयत्न केला. खडकाचे सुळे त्याच्या पाठीत, कुशीत घुसले. गरम रक्ताच्या धारा त्याच्या छातीवरून, पोटावरून, वाहात गेल्या. त्याच्या डोक्यात प्रचंड स्फोट होत असल्यासारखे आवाज येत होते; आणि प्रथमच, अगदी प्रथमच किंकाळी मारण्यासाठी त्याचे ओठ विलग झाले.

तो जागा झाला. त्याचे सर्वांग घामाने डबडबले होते. तळहात, तळपाय थंड पडले होते. घसा कोरडा पडला होता. काही क्षण अंधाराचा ठाव घ्यायचा त्याने प्रयत्न केला. हळूहळू बॅरकच्या भिंती, छप्पर, दोरीवर लटकत असलेले कपडे, सावल्यांचे आकार स्पष्ट होऊ लागले. तो खाटेवर उठून बसला .

त्या स्वप्नाचा अर्थ स्पष्ट होता.

सो ही हॅज बिकम् अ कॉवर्ड नाऊ.

का तो मुळातच भेकड होता?

तो बराच वेळ तसाच बसून होता. डोक्यात विचारांचे थैमान चालू होते .

मला लढत द्यावी लागणार आहे.

केवळ ह्या बाहेरच्या जगाशीच नाही, तर स्वतःचीही.

भूतकाळातून निर्माण झालेल्या डिकीशी मला झगडा द्यावा लागणार आहे.

देन ऐन्ड देन ओनली, आय शॅल विन !

पण माझ्यात ती ताकद आहे काय?'

त्याने आपल्या विचारांचा पाठलाग करायचा प्रयत्न केला. पण त्या विचारांना दिशा नव्हती, हेतू नव्हता .अनेक आठवणींची, स्वप्नांची पाठशिवण चालू होती.

क्षणात ट्रेनिंग सेंटरमधील पहिल्या दिवसाची स्मृती डोळयांसमोर तरंगत होती, तर दुसऱ्याच क्षणाला सिव्हिल जेलमधून बाहेर पडताच प्रथम काय गोष्ट करायची, ह्याचा विचार त्याच्या मनात झळकून जात होता. गेल्या कित्येक वर्षांच्या स्मृती एकाच वेळीं पृष्ठभागावर येण्यासाठी धडपडत होत्या. जणु त्याच्या अंर्तमनाने त्याच्या कॉन्शस मनाचा, नेणिवेने जाणिवेचा ताबा घेतला होता आणि विस्मृतीच्या थराखाली दडलेल्या असंख्य क्षुल्लक आठवणींचे मोहोळ आता उठले होते.

त्याचे डोके विलक्षण दुखू लागले होते. अंगावरील घाम आता सुकला होता. थंडी आता त्याच्या उघडया अंगाला बोचत होती. बाहेर जाऊन आकाशातील चांदण्या पाहाव्यात, आकाशगंगेच्या काठाने भटकावे, मग उगवतीला शुक्राच्या स्वागताला सज्ज होऊन बसावे, असे त्याला वाटले.

तो उठणारच होता, पण बॅरकबाहेर कुणाचे तरी बूट वाजल्याचा आवाज त्याला ऐकू आला. नाईट सेंट्री बाहेर फिरत असणार. तो जरा मागे सरकून, भिंतीला रेलून बसला. समोरच्या भिंतीवर दरवाज्याच्या फटीमधून येणाऱ्या प्रकाशशलाकेत येणाऱ्या दोरीवरील कपडयांचय सावल्या पडल्या होत्या.

मनःस्थितीत झालेला हा बदल त्याला अनपेक्षित होता. गेल्या पाच-सहा दिवसांत काय घडले, त्याचा आढावा घेऊन आपल्या मनःस्थितीचे विश्लेषण करावयाचे त्याने ठरविले. मंद वाऱ्याने भिंतीवरील त्या सावल्या हलत होत्या.त्या नाचणाऱ्या, हलणाऱ्या आकृत्यांकडे पाहता पाहता त्याच्या मनःपटलावर जुन्या स्मृतींची भुतावळ परत नाचू लागली.

साडेचारच्या सुमारास हवालदार नायर उठला. त्याने बॅरकचा दिवा ओन केला. आजूबाजूला एक एक जवान जागा होऊ लागला. उठल्याबरोबर ते आपल्या कामाला लागले .

प्रत्येकाची नजर अधूनमधून त्याच्याकडे जात होती. पण कुणीच त्याच्याशी बोलले नाही. त्या नजरांनी तो अस्वस्थ होत होता. तो आता त्यांच्यापैकी नव्हता, हे स्पष्ट होते. त्याने कागद पुढे घेतले, पेन उघडून त्याने लिहावयास सुरुवात केली...'प्रिय एन्डया'...त्याला माहीत होते, हे पत्र तो कधीच पोस्ट करणार नव्हता,तरीही प्रत्येक शब्द लिहिताना तो विचार करत होता. प्रत्येक वाक्याचा अर्थ लक्षात घेत होता.

प्रिय एन्डया,
आय् ऐम ओन व्हर्ज ओफ इनसॅनिटी.
गेल्या काही दिवसांच्या घटनांचा विचार केला,
तर झालेल्या घटनांना विशेष महत्त्व नाही, हे मला समजते.
आणि तरीही माझ्या मनाची स्थिती पाहिल्यावर मला भीती वाटतेय,

की ज्ञाताच्या अन् अज्ञाताच्या, सॅनिटी अन् इन्सॅनिटीच्या
सीमारेषेवर मी उभा आहे का?
कदाचित ह्या घटनांना तात्कालिक महत्त्व असेलही,
पण काळाच्या ओघात, आणखी काही महिन्यांनी,
आणखी काही वर्षांनी त्या सामान्य ठरतील.
ह्या घटनांच्या अनुषंगाने स्वःतचाच अन्वय लावण्याचा प्रयत्न करतो आहे मी;
याअनोळखी 'मी' ला पाहून गोंधळलो आहे मी, भेदरलो आहे .
कदाचित असे असावे,
मी कमालीचा स्वयंकेंद्रित असावो,
आणि गेली पाच वर्षे ह्या बिनचेहऱ्याच्या,
अवाढव्य यंत्राचा, एक बिनचेहऱ्याचा पार्ट म्हणून जगल्याने,
मनाविरूध्द, इच्छेविरूध्द जगल्याने मनावरील सतत ताणामुळे
असा कोलमडली असेन.
माझी कल्पनाशक्ती अनैसर्गिक,
पर्व्हर्सली फ्लेअर-अप् झाली आहे.
माझे मन हायवर सेन्सेटिव्ह झाले आहे .
घटनांना परस्पेक्टिव्हमध्ये बघण्याची कुवतच नाहीशी  झाली असावी.
थोडक्यात, ह्या सर्व खाणाखुणांवरून
माझा नर्व्हस ब्रेक डाऊन झाल्याचे निदान करता येईल काय?

गेली पाच वर्षे मी सतत फुगडी खेळत होतो .
माझ्या मनाला दाबून ठेवीत गरगर गरगर फिरत होतो,
गिरक्या घेत होतो.
अगदी प्रथमपासून वाटत होते, थांबून जावे,
पण थांबू शकलो नाही,
आणि स्वतःही हट्टाने फिरत राहिलो.
फिरतच राहिलो - गोल..गोल, स्वतःभोवती
- जोपर्यंत गती होती, माझा माझ्यावर ताबा होता.
आता मी थांबण्याचा प्रयत्न करत आहे.
पावलांचा वेग मंदावीत आहे.
पण डोळयांसमोरील जग आता गरगर फिरत आहे,
अंग हेलकावे खाऊ लागले आहे,
मस्तक भ्रमण करीत आहे.

मला समजत नाहीये,
काय योग्य अन् काय अयोग्य?
गरगर फिरत राहाणेच योग्य, की थाबणे योग्य?
सत्य काय आहे?
मी स्तब्ध आहे. जसा होतो, तसाच आहे,
आणि हे जग फिरत आहे गरगर?
की जग स्थिर आहे आणि मीच फिरतो आहे गरगर?

ह्याच जगाने मला वाढवले,
ह्याच जगाने मला 'मी'पणा दिलाच
माझा 'मी'पणा फुलवला.
त्याची जोपासना केली, त्याला वाढवले,
त्याची वाढ कौतुकाने पाहिली.
माझ्या चालण्यातील वेगळेपण, माझ्या विचारांतील वेगळेपण,
हा 'मी' जिवंत ठेवणे, त्याची ताकद वाढवीत राहाणे,
त्याला पसरवीत जाणे हे त्यांनी शिकवले ना मला?
आय् ऐम युनिक.
दुसऱ्या 'मी'ना पायांखाली तुडवून,
त्यांच्या मढयांवर पाय देऊन,
वर वर चढण्यातच 'मी'चे 'मी'पण आहे,
हे त्यांनीच बिंबवले ना माझ्या मनावर?
वाक्यातील 'मी' चा निराळेपणाचा
अभिमान बाळगावयास शिकवले त्यांनी मला!

- आणि आज तेच जग सांगते आहे :
यु आर् अ नॉनएन्टीटी .तू एक नंबर,
तू डिकी नाहीस .
तू एक यंत्र, एक मशीन.
ह्या अवाढव्य यंत्रातील एक भाग.

फायर !...ओर्डर ऐकल्याबरोबर
तुझ्या हातांची अंगुली ट्रिगरवर दाबली जाणार आहे.
समोर कोणतीही आकृती हलताना दिसली,
की तुझ्या बंदुकीची गोळी

ह्या आकृतीच्या आतडयाचा, फुफ्फुसाचा वेध घेणार आहे .
आवेशाने, त्वेषाने, दातांवर दात रोवून, आरोळी ठोकत
तू आपली संगीन
त्या समोरील माणसाच्या पोटात खुपसणार आहेस.
संगीन बाहेर खेचून
ती लालनिळी आतडी बाहेर खेचून काढणार आहेस,
तु कुणाला मारतो आहेस आणि का मारतो आहेस,
याचा विचार करायची तुला गरज नाही.
नव्हे, विचार न करणे हेच तुझे कर्तव्य .
थिस वर्ल्ड इज व्रेच्झी,अवर वर्ल्ड इज क्रेझी.
नॉट टू क्वेशन व्हाट ऐन्ड व्हाय्, बट चु किल ओर डाय् .

तुला माहीत आहे,
मी सेंटिमेंटल नाही,
मी आयडियालिस्टही नाही.
आय डोन्ट माईंड किलिंग.
मानवाच्या अस्तित्वासाठी,
माणसाचा बळी द्यायला काही हरकत नाही. पण माझे अस्तित्व
ह्या ब्रेनलेस मॉनस्टरच्या ताब्यात देण्यास माझी तयारी नाही.
कधीही नाही.

मला माहीत आहे,
हा संघर्ष आहे, हा लढा आहे.
स्वतःशीच स्वतःच मान्य केलेल्या,
स्वतःला घातलेल्या बंधनांशी.
ह्या मानसिक बंधनांना,
ह्या  भंपक प्रस्थापित मुल्यांना
झुगारून द्यावयाची ताकद माझ्यात आहे का?
हा काही दिवसांचा, काही वर्षांचा झगडा नाही.
हा सततचा, कधीही न संपणारा लढा आहे.
ह्या कोषातून बाहेर पडल्यावर
मी दुसऱ्या कोषात गुरफटला जाणार आहेच
कदाचित तो कोष जास्त मोठा असेल,
जास्त ऐसपैस असेल,

*पण सीमाबध्द करणारा कोषच अखेर!*
*ऐम आय टॉकिंग मिस्टिसिझम्?*

*हे काही दिवस*
*माझ्या जीवनात अंतर्बाह्य बदल करणारे ठरणार आहेत.*
*माझा विश्वास आहे,*
*मी यातून लढतच बाहेर पडणार आहे.*
*पण...पण तरीही मला भीती वाटतेय, मला शंका वाटतेय!*
*ज्ञाताच्या अन् अज्ञाताच्या सीमारेषेवरच मी उभा आहे ना?*
*की मी सीमोल्लंघन केले आहे?*
*हॅव आय् ओलरेडी क्रॉस्ड ओव्हर?*
*आय डोन्ट नो, आय डोन्ट नो..*

---



# रोबो अकरा

त्या दिवशी सकाळी दहा वाजेपर्यंत तो बरॅकमध्येच बसला होता. रेजिमेंट कमांडर काय प्रश्न विचारेल? आपण काय उत्तर देऊ, ह्याबद्दल तो चित्रे रंगवीत राहिला. वाट बघत राहिला. ओफिसमधूनच बोलावणे येण्याची. पॅनेलसमोर तो एक भाषणच झोडणार होता. अनेक वेळा ते काल्पनिक प्रश्न आणि त्यांची काल्पनिक उत्तरे ह्यांची मनातल्या मनात त्याने उजळणी केली होती. ती उत्तरे स्वतःशीच पुटपुटून त्याने त्यांच्यांत अनेक बदल केले होते. त्याला विचार करणे थांबवायचे होते. किती वेळा त्याने पुस्तक वाचायचा प्रयत्न केला असेल, पण व्यर्थ!

त्याने आपली जुनी डायरी काढून त्या दिवसांच्या आठवणींमध्ये स्वतःला रमवण्याचा प्रयत्न केला, पण त्या आठवणी त्याला आता परक्या झाल्या होत्या. जणू तो कुणी वेगळाच डिकी होता.

गेल्या महिन्यात सुनीताचे पत्र आले नव्हते. तो खिन्न झाला. मग त्याच्या लक्षात आले, की त्याने आपला पत्ता तिला कळवला नव्हता. सुनीताच्या बहुतेक चिठ्ठया त्याने फाडून फेकल्या होत्या. जपून ठेवलेली एक दोन पत्रे त्याने बॅगेतून काढली. पण ती बंगाली लिपीतील अक्षरे त्याच्या मेंदूपर्यंत पोचू शकली नव्हती.

वर्तमानापासून दूर पळण्याचा त्याने प्रयत्न केला. पण परत परत मेजर मोहता, पॅनेल, कोर्ट मार्शल, सिव्हिल जेल ह्यांभोवतीच त्याचे विचार गिरक्या मारीत राहिले.

तो बरॅकच्या दरवाज्याजवळ येऊन उभा राहिला. युनिटचा कार्यक्रम नेहमीप्रमाणे चालू होता. खुरपीवाले जवान बाथरूमजवळ मांडी ठोकून बसले होते. त्यांच्या आपसात गप्पा चालू होत्या. स्टोअरपाशी दोन जवान हातांत शॉव्हेल्स घेऊन उभे होते.

तो थोडा वेळ तिथे रेंगाळला. कुणीही त्याच्याकडे लक्ष दिले नाही. ओफिसमदून जाधव बाहेर पडला. डिकी त्याच्याबरोबर काही पावले चालला. चालता चालता त्याने विचारले,

' काय जाधव, माझ्यासाठी काही ओर्डर?'

'कुछ नहीं।'

डिकी तसाच लायब्ररीकडे निघाला. हवालदार बच्चनसिंगने त्याचे स्वागत केले. पण त्यात थंडपणा होता. थोडा वेळ अवांतर गोष्टी करून त्याने मुद्द्यालाच हात घातला.

'डिकी, तुम फिकर मत करो। ये लोक जबतक तुम्हारा किसी दुसरी युनिट में पोस्टिंग नहीं करते, आरामसे पडे रहो। तुम्हे कोई चार्जशीट पर नही रखेगा। इस रेजिमेंट से इस साल और कोर्ट मार्शल नहीं होगा। गये दो महिनों में तीन कोर्ट मार्शल हुए है। एरिया कमांडरने अपने कमांडिंग ओफिसरसे कहा है, 'इस साल और कोर्ट मार्शल नही चाहता हूँ...'

डिकी लायब्ररीतून बाहेर पडला. प्रकरण लांबतच चालले आहे. पोस्टिंग होण्याआधीच काही तरी केले पाहिजे. ते त्याच्यावर चार्ज ठेवणार नाहीत. कारण चार्ज ठेवला, तर तो त्यांच्या ऐथॉरिटीलाच चॅलेंज करणार होता .मग त्यांना कोर्ट मार्शल करण्याशिवाय मार्गच उरणार नव्हता. हे सर्व त्यांना माहीत होते आणि म्हणूनच ते काहीही चार्ज ठेवणार नव्हते. त्याला आराम नको होता. त्याला कामचूकारपणा, वेळकाढूपणा जमणार नव्हता. नवीन मार्ग शोधला पाहिजे.

कॉल मी इन्सेन ऐन्ड लेट मी गो ।

मानसतज्ञाच्या वेटिंगरूममधे तो एकटाच बसला होता. आत आल्याबरोबर डिकीने, मेडिकल ओफिसरने त्याला दिलेले पत्र डॉक्टरकडे पाठवले होते व तो आता डॉक्टरांची वाट पाहात होता.

ह्या ठिकाणी पोचण्यासाठी त्याला दीड महिन्याचा काळ आणि खुपसा मानसिक ताण सहन करावा लागला होता. युनिट मेडिकल ओफिसरने त्याची केस वर रेफर करावयाचे टाळले होते. दोनदा त्याला परतवून लावले होते; तरीही तो परत मेडिकल ओफिसर समोर हजर झाला होता. मेडिकल ओफिसरन त्याला दमदाटी देऊन पळवून लावायचा प्रयत्न केला होता. पण डिकी टिकून राहिला होता.

ह्या काळातील मानसिक त्रासाच्या खाणाखुणा त्याच्या चेहऱ्यावर उमटल्या होत्या. त्याचा चेहरा ओढलेला व फटफटीत दिसत होता. आपण कित्येक वर्षांनी म्हातारे झालो आहोत, असे त्याला वाटत होते.

ह्या दीड महिन्यात तो कंपनीमध्ये असूनही नसल्यासारखा होता. मेजर मोहताने, कपंनी हवालदार निरंजनने त्याच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले होते. त्याच्या साथीदारांनी तर त्याला कधीच वाळीत टाकले होते, आपले मनोधैर्य टिकविण्याच्या धडपडीत तो त्यांच्यापासून अधिकच दूर गेला होता.

तो आता थकला होता. आपल्या अंगातील उरली सुरली ताकद पणाला लावून त्याला हा शेवटचा टप्पा पार करावयाचा होता.

समोर छोटेसे टेबल होते. त्यावर काही न्यूज-पेपर्स, काही मासिके पडली होती. कोपऱ्यात रेडिओ होता. फ्लॉवरपॉटमध्ये ताजी फुले, भिंतीवर काही कॅलेन्डर्स, एखाद्या लिव्हिंग रूमसारखे त्या खोलीचे रूप होते. भिंतीना सौम्य निळा रंग होता. आलेला माणूस नकळत रिलॅक्स व्हावा, हा त्या मागील उद्देश आहे, हे डिकीला माहीत होते. डिकी रिलॅक्स होणार नव्हता. त्याने आपल्या हातांकडे पाहिले. तळहातांवर, बोटांवर घास चमकत होता. हातांचा कंप नजरेला स्पष्ट जाणवत होता.

आपण हे नाटक करून लोकांच्या डोळयात धूळफेक करत आहोत, की आपण नाटक करीत आहोत, अशी समजूत करून घेऊन स्वतःच्याच डोळयांत धूळ फेकीत आहोत? आपण सीमारेषेपलीकडे गेलो आहोत काय? पम त्यामुळे काय फरत पडणार होता? सीमेपलीकडे जाऊनच जर माझी ह्यातून सुटका होणार असेल, तर काय हरकत आहे?'

तो अस्वस्थ झाला होता. दाराला असणाऱ्या 'पीप होल'मधून आपल्यावर नजर असणार, असे त्याला वाटले.

त्याचे हातपाय घामाने थबथबले होते, पायांतील स्लीपर्स ओल्या झाल्या होत्या. मग त्याच्या लक्षात आले, गेली कित्येक मिनिटे तो आपल्या बोटांकडेच टक लावून पाहात होता. तो पुढे झुकला होता. सर्व शरीरभर ताण निर्माण झाला होता. एखाद्या वळवळणाऱ्या अळीसारखे बोट दिसत आहे. लहानपणी कोबीच्या गड्ड्यावर सापडलेल्या हिरव्या अळीवर डायझिनॉनचा थेंब टाकून तिची तडफड त्याने अशीच निरखली होती. आपल्या नजरेच्या झोतात ती बोटे वळवळत आहेत, असा त्याला भास झाला.

त्याने आपली नजर बाजूला वळवली. खिडकीमधे काही कुंडया होत्या. त्यामध्ये वेगवेगळया प्रकारची कॅक्टसची रोपे लागलेली होती. एक रोपटे उर्मट तोऱ्याने उभे होते .गोल, जाड, ताठर पाने. गर्विष्ठ. त्या ताठ हिरव्यागार पानांना कचाकच तोडावे, त्यांचे तुकडे तुकडे करावे, पायांखाली तुडवावेत, अशी तीव्र इच्छा त्याच्या मनात उत्पन्न झाली.

हा लहानसा बुडबुडा पाहता पाहता पसरला आणि त्याच्या मेंदूला त्याने व्यापून टाकले.

त्या हिरव्यागार पानांवरील कांटयांनी पिवळट हास्य करून त्याला खिजवले. तो झटक्यात उठला, आणि खिडकीजवळ पोहोचला. त्याचा हात त्या रोपटयाकडे सरकला.

त्याचे लक्ष खिडकीकडे गेले. समोरील बंगल्याच्या व्हरांडयात एक तरुणी उभी होती. आपले लांबसडक केस तिने खांद्यावरून पुढे घेतले होते. डाव्या हाताने केस मुठीत धरून, उजव्या हातातील कंगवा केसांतून फिरवताना ती कमरेमधून किंचित पुढे झुकली होती. कंगव्याच्या वरखाली होणाऱ्या हालचालींबरोबर तिचे शरीर हेलकावत होते. तिच्या ओठांची होणारी अस्पष्ट हालचाल त्याला दिसत होती. ती काही तरी गाणे गुणगुणत होती. तिच्या ओल्या अंगाचा आणि केसांना लावलेल्या शाम्पूचा गंध आपल्या मस्तकामधे भिनतो आहे, असे त्याला वाटले.

' ओ, व्हाट नॉन्सेन्स !'

खिडकी बंद आहे. दोन बंगल्यांमध्ये हा रुंद रस्ता पसरलेला आहे. इतक्या दूर हा गंध येणे शक्यच नाही.

त्याने दीर्घ श्वास घेतला. जस्मीन....नो !भास, केवळ भास.
इज ही रिअली मॅड?'

'हॅलो, डिकी...प्लीज् सिट डाऊन.'

डिकी मागे वळला, त्याच्याच वयाचा एक तरुण सोफ्याजवळ उभा होता. त्याच्या अंगातील पँटचे व शर्टाचे मॅचिंग डिकीला एकदम पसंत आले. काहीसा स्थूल देह, भव्य कपाळ, किंचित कुरळे केस,तुकतुकीत कांती,डिकी सावकाश पुढे सरकला.

नाऊ इज द टाईम !
प्रत्येक स्टेप आता विचारपूर्वक घ्यावी लागणार आहे.
वरून शांत दिसणारे हे डोळे माझी प्रत्येक हालचाल टिपणार आहे.
ह्या डोळयांमागे असणारा मेंदू माझ्या प्रत्येक हालचालींचा,
माझ्या प्रत्येक शब्दाचा
अन्वय लावण्याचा प्रयत्न करणार आहे.
का हे सर्व माझ्या मनाचे खेळ आहेत?
अवाजवी अपेक्षा आहे?
ह्या यंत्रातील हा मानसतज्ज्ञ देखील एक भागच अखेर?
आत येता येता - किंबहुना आधीच,
त्याने ह्या केसचा काय निकाल लावायच, हा निर्णय घेतलेला असेल!

डॉक्टर त्याच्याशेजारी बसला. डिकीकडे पाहून तो मोकळेपणी हसला, त्याचे हास्य डिकीला आवडले. हा माणूस इतके निरागस हास्य कसे करू शकतो? डॉक्टरने त्याच्या खांद्यावर हात ठेवला, बोलू लागला,

'प्लीज मेक युवरसेल्फ ऐट होम. आरामात बैस. मला वाटतं, प्रस्तावना करण्याची गरज नाही. पण तरीही... इथं आपण मित्र आहोत. मी ओफिसर नाही, तू ओ.आर. नाहीस. मी डॉक्टर नाही, तू पेशंट नाहीस. आपण दोघेही, बरंचसं जग पाहिलेल्या मॅच्युअर व्यक्ती आहोत.कदाचित माझ्यापेक्षा जगाचा अनुभव तुलाच जास्त असावा. आपणा दोघांना काही गोष्टींचा शोध घ्यावयाचा आहे. तुझ्यातील हे जे दोष आहेत, तात्पुरते आहेत. खरं तर दे आर् ओनली सिम्प्टम्स. नॉट अ डिसीज्. सो लेट अस ट्राय् टु फाइंड आऊट व्हाट इज् रॉंग ऐंड व्हेअर इट इज्. तुला स्वतःला जे माहीत नाही, ते मला माहीत होईल, अशी काही जादू माझ्याजवळ नाही. हा रस्ता तुलाच चालावयाचा आहे. मी केवळ तुला साथ देणार आहे.

आपल्याला समस्येच्या मुळाशी जायचे आहे. अगदी तळाशी. भिंतीला तडे पडले असतील, तर केवळ तडयांची डागडुजी करून भागणार नाही. भिंतीचा पायाच कच्चा असेल, रेतीच्या आधारावर बांधला असेल, आणि सर्व पायाच खाली खचत असेल, तर वरवर डागडुजी करून काय फायदा, अर्थात दोष पायातच आहे, ह्याची खात्री मात्र झाली पाहिजे .

'होय, आणि एकदा खात्री झाली, तर ही भिंत मुळापासून खणून काढली पाहिजे, अगदी मुळापासून उलथली पाहिजे!'

डॉक्टरांनी मंद स्मित केले. त्याच्या डोळयांच्या कडांना सुरकुत्यांचे जाळे होते, त्याचे तपकिरी डोळे लुकलुकत होते. त्याच्या आवाजात लयबध्द चढउतार होता. बोलता बोलता डॉक्टर त्याचा दंड एका तालात थोपटत होता.

'मी तुझ्या मनातील विचार वाचू शकणार नाही. तू बोलत राहा, तुला वाटेल त्या विषयावर, तुझं बालपण, तुझे आई-वडील, तुझं काम, तुझं घर, तुझी स्वप्नं....

ओ धिस इडियट इज् ट्राईंग टु हिप्नोटाईझ मी.
काही तरी विलक्षण अनपेक्षित कृती करून
अचानक डॉक्टरला जोरदार धक्का द्यावा,
त्याच्या वागण्यातील ही सहजता,
हा नैसर्गिकपणा ओरबाडून काढावा.
स्टुपिड, ही इज् पिटीईंग मी!
तुझ्या मित्रत्वाची, सहानुभूतीची गरज नाही मला.
मी तर निर्णय घेऊनच इथपर्यंत आलो आहे .
साखळदंडाचे बंध तोडून भरारी घेणार आहे मी.
झपाझप पंख मारून उंच उंच जाणार आहे,
विस्तारणारे क्षितिज न्याहाळीत.

तू मूर्ख आहेस !
खांद्यावर वागवीत आहेस भूतकाळाचे सतत वाढणारे ओझे.
शतकानुशतकांचे.
ह्या इतिहासाच्या ओझ्याखाली वाकला आहेस तू.
झुकली आहे तुझी नजर.
तुझ्या नजरेसमोर फक्त खालची जमीन आहे,
तेच तुझं विश्व,तेच तुझे क्षितिज.

सर्व छिनावून घेतलंस माझ्यापासून तू...सर्व हिरावून घेतलंस,
आणि स्वतःच्या पाठीवर लादून घेतलंस.
तुला वाटलं, स्वतःची ताकद वाढवीत आहेस तू.
आपल्या पाठीवरील भार वाढविलास, रे तू!
अधिक खाली झुकलास .मला नागवं केलंस तू.
पण म्हणूनच माझं मस्तक ताठ झालं आहे.
माझा भूतकाळ, माझ्या स्मृती, माझ्या आठवणी...
मुक्त केलं आहेस,रे, तू मला ह्या ओझ्यापासून

डिकीचे लक्ष डॉक्टरकडे गेले .डॉक्टर त्याच्याकडे एकटक पाहात होता. त्याच्या हातात पेन होते, समोर डायरी उघडलेली होती. आपण आपल्या मनातील विचार मोठ्याने बोलत होतो, की काय? नक्कीच आपण बरळत असलो पाहिजे. त्याने आपले ओठ घट्ट मिटले.

'शब्दांच्या जाळयामधे फसू नकोस, डिकी. भरार्‍या मारणार्‍या गरुडाला जमिनीवर उतरावंच लागतं. उंच उंच भरार्‍या घेताना देखील त्याची नजर अस्मानाचा वएध घेत नसते, जमिनीवर खिळलेली असते...' डॉक्टर बोलत होता,' स्वातंत्र्य ह्या शब्दाला काही अर्थ नाही, डिकी. ही केवळ कल्पनेतील अवस्था आहे. स्वातंत्र्य कशापासून, कशासाठी? स्वातंत्र्याचा संबंध ह्या कॉंक्रीट रिऐलिटीशी आहे, डिकी, वास्तवाच्या संदर्भातच आपण स्वातंत्र्याचा विचार केला पाहिजे. तुला स्वातंत्र्य कशापासून पाहिजे आहे? वेट्...वेट्, आय नो द अन्सर.ह्या सैनिकी जीवनापासून तुला स्वातंत्र्य पाहिजे. हा तुरुंग, हा बंदिवास, माणूस एकदा ह्यात अडकला, की फसला, कायमचा फसला. माणूस ह्या अमानुष यंत्राचा,ह्या अमानवी पध्दतीचा पार्ट होऊन राहू शकणार नाही. ह्या कोशातून बाहेर पडण्याची धडपड केल्याशिवाय राहात नाही. पण लवकरच त्याच्या लक्षात येते, ह्या तुरुंगातून बाहेर पडण्याची आशा नाही. तोच कैदी आहे आणि तोच जेलर आहे. इच इज् हिज ओन मेकींग.

हा तुरुंग अखेर काय आहे रे, बाहेरच्या तुरुंगातील छोटा तुरुंग. बाहेरच्या जीवनाचंच प्रतिबिंब. ह्या अवाढव्य यंत्रणेचा एक अविभाज्य पार्ट .हिस्सा. ह्या तुरुंगातून तू बाहेर पडशील. स्वतःचं अस्तित्व पणाला लावून धडपडशील. ह्या चौकटीतून तू बाहेर निघशील, हे जोखड फेकून देशील, पुढं काय? नाही, डिकी,नाही !वुई आर मेन ओफ रीझन. ओफ रॅशनॅलिटी.भिंतीवर डोकं आपटून शहीद होण्यात काय मतलब? वुई मस्ट लर्न टु अडॉप्ट अवरसेल्फस्. ह्या जीवनाशी जमवून घेणं अवघड आहे, पण ह्यातून सुटका करून घेणंही अवघड आहे. आपण एखाद्या परिस्थितीशी किती प्रमाणात ऐडॉप्ट करून घेतो, ते आपल्या रॅशनॅलिटीवर अवलंबून आहे,डिकी.'

डॉक्टर थांबले. डिकी काही क्षण स्तब्ध राहिला. मग तो बोलू लागला,

'ही भिंत खचली आहे, डॉक्टर, तिला तडे पडले आहेत. भेगा पडल्या आहेत. ह्या जगात कोणतीही वस्तू शाश्वत नाही, कोणताही विचार, कोणतीही कल्पना, कोणताही धर्म, कोणतीही संस्कृती,तत्त्वज्ञान, समाजव्यवस्था काहीही शाश्वत नाही. जीवनाची अशाश्वतता हाच एक शाश्वत नियम. आपण शाश्वताचा शोध घेत राहातो. अशाश्वताला शाश्वत म्हणून स्वतःलाच फसवतो. ह्या प्रचंड भिंतीचा पाया घसरू लागला आहे, हे आपल्या लक्षात येत नाहीये, डॉक्टर.'

डॉक्टर काही वेळ स्तब्ध राहिला मग म्हणाला,

'वेल, परहॅप्स यु आर राईट. पण आता आपण मुख्य प्रश्नाकडे येऊ या. आता तुझ्या बालपणाबद्दल सांग. इथं येण्यापूर्वी तू काय करीत होतास? तुझा ट्रेड ओपरेटर आहे, तुझं रेकॉर्डही चांगलं आहे. तेव्हा हा दोष काही काळापूर्वीच निर्माण झाला असावा. गेल्या एक-दोन वर्षांत काही घडलं का?'

डिकी आपल्या पूर्वायुष्याबाबत बोलावयास तयार नव्हता. भूतकाळ संपला होता. तो मुडदा स्मशानभूमीत गाडण्यात आला होता. ते दिवस, ते आयुष्य वाळवंटासारखे रखरखीत होते, का हिरव्यागार वनराजीने आच्छादलेले होते, हे आता फारसे महत्त्वाचे नव्हते. तो त्या प्रदेशातून आता पार झाला होता.वाटेत त्याची पावले ठेचाळली होती. काटयाकुटयांतून वाट काढताना ती रक्ताळली होती. तापलेल्या रेतीत भाजून त्यांना तडे पडले होते, की लुसलुशीत हिरवळीवरून चालताना ती सुखावली होती, याचेही त्याला आता फारसे महत्त्व वाटत नव्हते. ह्या प्रदेशावर तो आता केवळ दुरूनच, स्मृतीच्या पंखांवर आरूढ होऊनच घिरटया घालू शकणार होता. भुतांवर भ्रमण, आणि इतक्या दुरून बघताना ते वाळवंट, ती वनराजी, रूक्ष नग्न पहाड, ते झरे, हिरवळ, सर्वच दृश्य मनोवेधक दिसणार होते, सुंदर भासणार होते.

डिकी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत होता. जे तोंडाला येईल, ते सांगत होता.

डॉक्टरांनी त्याच्यासमोर काही चित्रे ठेवली. एका चित्रात एक नग्न जोडपे, एकमेकास बिलगून उभे होते.जवळच एक प्रौढ स्त्री नग्नावस्थेत उभी होती. तिच्या उंचावलेल्या हाताच्या बोटाने ती जोडप्याला निर्देशित करत होती.

ह्या चित्रात काय असावे? डिकीला ही टेस्ट माहीत होती. पेशंटच्या अंतर्मनाचा शोध घेण्यासाठी ह्या चित्राचा उपयोग होत असे.

डॉक्टरांनी इतरही काही टेस्टस् घेतल्या.

डिकीला विश्वास होता, जर टेक्निक माहीत असेल, तर कुणाही मानसतज्ज्ञाला बेवकूफ बनविणे शक्य असते. अखेर मानसतज्ज्ञ किती धूर्त आहे, मानवी मनाची त्याला किती ओळख आहे, मानवी समाजातील परस्परसंबंधांचा त्याला किती अनुभव आहे, त्यावरच सर्व अवलंबून असते.

डॉक्टर एकीकडे नोटस् घेत होते.

बराच वेळ चर्चा झाल्यावर डॉक्टर एकाएकी उठले,

' डिकी, मला जरा अर्जंट काम आहे, जरा थांब. मी आलोच.'

डिकीने पाय लांबवले, तो आरामात मागे रेलला. पाच मिनिटांतच डॉक्टर परत आले, त्यांच्या चेहऱ्यावर मघाचेच स्मित होते.

' मी विचार केला, तुला खोळंबून ठेवण्यात काही अर्थ नाही. लेट अस् फिनिश विथ इट्! 'सोफ्यावर बसता बसता म्हणाले.


' मी तुला काही दिवस अंडर ट्रिटमेंट ठेवतो. मला वाटतं, काही दिवस विश्रांती आणि वातावरणात बदल ह्यामुळे तुला बरं वाटेल. तू कधी कधी विनाकारण ओव्हर एक्साईट होतोस. पण हा दोष थोडयाशा प्रयत्नानं काढून टाकता येईल. आणि ते तुझ्याच हातात आहे. तुझी ऐन्युअल सुट्टी शिल्लक आहे का? नाही तर मी तुला मेडिकल लीव्ह रेकमेंड करतो आहे. मला वाटतं,तू सुट्टीवर जावंस.'

डिकी त्यांच्याकडे पाहात राहिला .डॉक्टर काही काळ स्तब्ध राहिले. त्यांनी खिशातून एक लिफाफा काढला, मग मनाशी काही तरी निर्णय घेतल्यासारखे ते म्हणाले,

' मला माहीत आहे, डिकी, तुला बाहेर निघायचं आहे. तू ह्या जीवनाशी जुळतं गेऊ शकणार नाहीस. तुला मोकळं करणं तुजय काहीसं फायद्याचंच होईल, पण ...वेल, तुला माहीत आहे. माझ्या हातात काही नाही. माझे हात बांधलेले आहेत. तू.. तू असं कर, सुट्टीवरून परत आल्यावर मला भेट. बघू आपण, काही मार्ग निघतो का?'

डिकीला समजले, डॉक्टर त्याला दुखवू इच्छित नव्हता.

डॉक्टरांचे पत्र खिशात कोंबून तो बाहेर पडला


बारा

तो बाहेर पडला, तेव्हा संध्याकाळ झाली होती. ती लेन पार करून तो मेनरोडवर आला. जवळच कुठे तीर फॅक्टरीचा भोंगा वाजला .आणि काही वेळातच माणसांचे घोळके पाठीमागून येऊन त्याच्या अंगावरून वाहात पुढे जाऊ लागले. ती असंख्य माणसे एकाच दिशेने स्टेशनकडे झपाझप चालत होती. त्यांची पावले जलद पडत होती. ती आपसांत बोलत होती. पण त्यांच्या थिजलेल्या नजरा मात्र केवळ समोरचेच पाहात होत्या. श्रांत चेहऱ्यांवर घाम चमकत होता. काही जण एकेकटेच चालले होते. त्यांच्या घट्ट मिटलेल्या ओठांआड दडलेल्या शब्दांना त्यांचे हातवारे आकार देत होते.

फूटपाथवर तीन-चार पोरी उभ्या होत्या. बोलताना त्या खिदळत होत्या. त्यांचे पदर वारंवार घसरत होते. खिदळतांना त्यांचे उरोज हिंदकळत होते. जाणाऱ्या माणसांचे त्यांना वारंवार धक्के लागत होते. पण ते त्यांच्या लक्षातही येत नसावे.

भिंतीजवळ दोन तीन नागडी पोरं पत्र्याच्य फुटक्या डबडयात माती भरत होती.

जवळून जाताना त्या पोरींपैकी एकीचे त्याच्याकडे लक्ष गेले. ती हसता हसता थबकली, त्याच्याकडे पाहून तिने भुवया उंचावल्या. डाव्या हाताने झटका देऊन तिने न घसरलेला पदर सावरला. तिचे काळेभोर डोळे फार बोलके होते. उजव्या खांद्यावर तिचा ब्लाऊज फाटला होता आणि खालच्या बाजूने ब्रेसिअरची पट्टी लटकलेली दिसत होती. तिच्या पोटावर वळया पडल्या होत्या आणि त्या वळयांतील खोल भागांत, कोपरांवर मळाची पुटे चढलेली दिसत होती.

पुढे चालता चालता तो मागे वळून तिच्याकडे पाहात होता. त्याची पावले मंदावली. तिच्या शेजारील पोरीनेही मागे वळून त्याच्याकडे पाहिले.ती हसली, तेव्हा पान खाऊन रंगलेले दात, काळसर ओठ त्याला दिसले. घाईघाईत नजर फिरवून तो पुढे चालू लागला.

गर्दी आता वाढली होती. गर्दीबरोबर वाहात जाताना त्याचे लक्ष आजूबाजूला चाललेल्या बोलण्याकडे होते. त्याला त्यांची भाषा नीट समजत नव्हती; पण प्रत्येकजण उत्तेजित झाला आहे, एक्साईट झाला आहे, हे त्याला जाणवले. त्याने लक्ष देऊन त्यांचं बोलणं ऐकण्याचा प्रयत्न केला. कुठे तरी गडबड झाली होती. लाठीहल्ला झाला होता . लोक चिडले होते.

कुठे तरी गडबड झाली होती. हाही प्रयत्न विफल ठरला होता. काही तरी चुकत होते. प्रत्येक वाट त्याला कुठेच पोहोचवित नव्हती. प्रत्येक रस्त्याचा शेवट म्हणजे दुसऱ्या नव्या रस्त्याची सुरूवात. चक्रव्युहात तो सापडला होता, भटकत होता.

त्याने डिसचार्ज मिळवायचा प्रयत्न केला होता. कोर्ट मार्शलसाठी धडपडला होता. मेन्टली इन्व्हॅलिड म्हणून सुटायचा प्रयत्न केला होता. प्रत्येक रस्त्यावर अखेरच्या क्षणी त्याच्या मार्गात प्रचंड भिंत उभी राहिली होती.

ही भिंत सतत त्याला आडवी आली होती. कोणत्याही मार्गाने जा, त्याच्या जगाभोवती ही भिंत होती. 'पण हे जग माझे आहे काय? हे लोक कोणत्या हकिकतीविषयी बोलत आहेत?'त्याच्या लक्षात येईना, हे केव्हा झाले? आज, काल, की काही आठवडयांपूर्वी? गेल्या महिन्यापासून तो तशा प्रकारच्या बातम्या वाचत होता. तरुण पोरे हातात लाठया घेऊन बंदुकांना सामोरी जात होती. ही मूर्ख माणसं हातातील दगडविटांनी बंदुकीच्या गोळयांना जबाब द्यायचा प्रयत्न करीत आहेत. हा खुळचटपणा? हा मूर्खपणा? का ही माणसे ह्या वेडाच्या आहारी जात आहेत?

मुळापासून चुकत आले आहे. अगदी सुरूवातीपासून, गेली पाच वर्षे झगडतोय, लढतोय.

पण ह्या यंत्रणेशी दिलेला हा संघर्ष खराखुरा होता का?
मी झगडत होतो,
पण त्यांनी घालून दिलेल्या नियमांच्या बंधनात राहून.
त्यांचे रूल्स पाळून, त्यांची मूल्ये मानून
ह्या अवाढव्य यंत्राचा भाग बनूनच राहिलो मी .
आणि आपली जागा न सोडता हे यंत्र थांबविण्याचा प्रयत्न केला...
त्याच वेळी ह्या यंत्राची ऊर्जा बनून राहिलो,
एक भाग बनून
ह्या यंत्राची हालचाल कायम ठेवण्यास मदत करत राहिलो.
आय कॅन नॉट डिस्ट्रॉय इट् ऐन्ड बी अ पार्ट ओफ इट्.

थँक गॉड, मी पोलीस नाही.
कमीत कमी निःशस्त्र लोकांवर गोळया झाडण्याचे काम
तरी करावे लागत नाही.
शत्रुसैन्यातील सैनिक निरपराध जरूर असतील,
पण निःशस्त्र निश्चितच नसतात.
सो व्हॉट?
सशस्त्र निरपराध माणसाला मारणे योग्य आहे का?

तो पुढे जात होता. तो कुठे जात होता, हे त्याच्या लक्षात येत नव्हते. कुणी तरी ढकलल्यासारखा तो पुढे पुढे चालला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंची दुकाने भराभर बंद होत होती. आता तो त्या घोळक्यातील एक भाग झाला होता. त्या प्रचंड कोलाहलात, गोंगाटात पुढे पुढे जात होता.

हे त्यांचे नियम.
खेळ कसा खेळायचा, हे त्यांनीच ठरवलेले,
खेळ केव्हा थांबवायचा, हेही त्यांनीच ठरवायचे.
खेळ त्यांचाच,नियमही त्यांचेच, रेफरीदेखील त्यांचेच.
स्वतःच्या विरोधात जातील, असे नियम ते बनविणार तरी कसे?
वो जीत गये, तो उनकी जीत
और वो हार गये, तो भी उनकीही जीत.
त्यांच्याविरुध्द लढायचे,
आणि त्यांच्या नियमांच्या, त्यांच्या मूल्यांच्या चौकटीत राहूनच?
आय मस्ट रिजेक्ट इट टोटली!
त्यांची मूल्ये,त्यांच्या कल्पना, त्यांची नीती,
त्यांची प्रतिष्ठा, त्यांचा धर्म, त्यांची मानवता,
त्यांची संस्कृती, त्यांचे सत्य.
सर्व...सर्व - जे जे त्यांना आधार देते, ते ते नाकारले पाहिजे मी!

रस्त्याच्या फुटपाथवरील विक्रेत्ते आपले सामान गोळा करीत होते. दुकानातून एक माणूस बाहेर पडला .रस्त्याच्या दुसऱ्या साइडने जाणाऱ्या टॅक्सीला थांबविण्याकरता तो ओरडत पळू लागला. पळता पळता तो डिकीच्या अंगावर आदळला आणि जोरात किंचाळला. डिकीने त्याच्याकडे आश्चर्याने पाहिले. त्या माणसाने एका हाताने धोतराचा सोगा गच्च धरून ठेवला होता. त्याच्या दुसऱ्या हातात बॅग होती. त्याच्या छातीचा  भाता जोरजोरात हलत होता. भेदरल्या डोळयांनी, उघडया तोंडाने तो डिकीकडे पाहात राहिला. त्याचा चेहरा भीतीने विदीर्ण झाला होता.

दुसऱ्याच क्षणाला तो माणूस डिकीपासून दूर दुसऱ्या साइडला पळाला.

व्हाय इज ही आफ्रेड ओफ मी? मला घाबरला का हा? भेकड!

आपण थांबलो आहोत, हे डिकीच्या लक्षात आले. त्याने आजूबाजूला पाहिले. तो आता फुटपाथवर नव्हता .रस्त्याच्या मध्यभागी होता. त्याच्या आजूबाजूला सर्व तरुण मुले होती. हात हवेत फेकून ती घोषणा देत होती. त्यांचे शब्द पकडायचा त्यान प्रयत्न केला .

आजूबाजूच्या चेहऱ्यांचे तो निरीक्षण करू लागला. त्यांचे केस विस्कटले होते. कपाळांवर, चेहऱ्यांवर घामाचे थेंब चमकत होते. त्यांचे डोळे चमचमत होते. त्यांचे कपडे मळलेले होते.त्यांची नजर सर्व दिशांनी भिरभिरत होती. हवेत हात फेकून, घसा फोडून ती ओरडत होती. त्या घोषणा देण्यात कसले समाधान, कसला आनंद त्यांना मिळत होता? जणू त्या घोषणा जास्तीत जास्त जोरात ओरडून देणे ह्यावर त्यांचे अस्तित्व अवलंबून होते, अशा ईर्षेने, अशा त्वेषाने ते ओरडत होते. मधूनच काही माणसे घोषणा देता देता थांबत; भांबावल्यासारखी आजूबाजूला पाहात. तो चारी दिशांना हेलावणारा जनसमुदाय पाहून परत घोषणा द्यावयास सुरूवात करीत.

लोंढा आता वेगाने पुढे पुढे जात होता. क्षणाक्षणाला लोकांची गर्दी वाढत होती. त्याने मागे वळून पाहिले. दूरपर्यंत नुसती डोकी आणि हलवणारे हात. जमाव वळण घेऊन उजव्या बाजूस गल्लीत शिरला. पुढे कुणी तरी ओरडून काही तरी सांगत होते.

हजारो हातांचा, हजारो पायांचा हा प्रचंड प्राणी हळूहळू पुढे सरकत होता. गल्लीत घुसल्यावर त्याने मागे वळून पाहाण्याचा प्रयत्न केला. पण पाठीमागील माणूस त्याच्या अंगावर आदळला. जमावाबरोबर तो पुढे जात राहिला. आपल्या भोवती ही गर्दी केव्हा जमा झाली? का आपण ह्या गर्दीत शिरलो आहोत?

ते दुसऱ्या रोडवर आले. समोरील फूटपाथच्या बाजूने लोकांचा घोळका उलट गामे येत होता. जवळच्या एका बिल्डिंगचय दरवाज्याजवळ एकच गदा झाली होती. अनेक लोक एकाच वेळी त्या लहान दरवाज्यात घुसण्याचा प्रयत्न करीत होते. लोकांचा गलका भयंकर वाढला होता.ते भेदरलेले दिसत होते. आता त्याच्या आजूबाजूचे लोकही थबकून, समोरून त्यांच्या दिशेने धावत येणाऱ्या लोकांना पाहात होते.

एकदम असंख्य किंकाळया,आरोळया ऐकू आल्या. आणि काय होते आहे, हे समजण्याच्या आत, त्याच्या पुढची, आजूबाजूची सर्व माणसे एकाएकी पाठीमागे वळली आणि त्यांनी उलटया दिशेने धावायला सुरूवात केली. तोही मागे वळला होता. तो जर झपाटयाने मागे वळला नसता, तर त्याला तुडवून हे लोक गेले असते. तो झपाटयाने मागे वळला होता, तरीदेखील जमावाचा इतका जोरदार धक्का त्याच्या पाठीला बसला, की त्याच्यासमोर माणूस नसता, तर तो कोलमडलाच असता.

जमाव आता धावत सुटला. प्रत्येकजण घाबरला होता. घोषणा आता बंद पडल्या होत्या. एकच कोलाहल माजला होता. एका अनामिक भीतीने सर्वांचा ताबा घेतला होता .

मान उंच करून त्याने पुढे बघण्याचा प्रयत्न केला. जमावाची गती आता मंद झाली. पुढे रस्त्यात गर्दी थांबली होती. पळणारे लोक त्या गर्दीत जाऊन मिसळत होते. त्या जमावातून वाट काढीत, ओरडत एक माणूस जमावाच्या उलट दिशेने जात होता. त्याच्यामागे एका पोलिसाभोवती पाच-सहा लोकांनी कडे केलेले होते. त्या पोलिसानेच कपडे फाटलेले होते.

गर्दीच्या मध्यभागी, दुकानाच्या फळीवर उभा राहून एक तरुण पोरगा मूठ जोरजोरात हवेत फेकून काही तरी ओरडून सांगत होता. केसांची झुलपे मागे फेकीत तो बोलत होता. संतापाने त्याचा आवाज कापत होता.

मग घोषणांची प्रचंड गर्जना वातावरणात उठली. आत्मविश्वासाची, बेदरकारपणाची, एक शक्तिमान लाट त्या जमावाच्या डोक्यावरून पसरत गेली. जणू अज्ञातातून आलेल्या संदेशाप्रमाणे तो जमाव परत मागे वळला. त्याच्या लक्षात आले, जमावाबरोबर तोही मागे वळला होता. त्याच्याही हाताची मूठ वळलेली होती.

तो जमाव परत पहिल्या दिशेने निघाला .उत्साहाने, बोंबाबोंब करीत, धावत जमाव मोठया रस्त्यावर आला. उजव्या बाजूने आणखी काही लोक त्या जमावात येऊन मिसळले. जमावाच्या पुढे पळणाऱ्या पोलिसांच्या आकृत्या दिसत होत्या. आरोळया ठोकीत जमाव त्यांच्या पाठीमागे धावत होता. धावता धावता प्रत्येकजण घसा फोडून ओरडत होता. एका पोलीस ओफिसरची कॅप उंच हवेत जाताना दिसली. बहुधा पुढील बाजूस जमावाच्या तावडीत एखादा इन्स्पेक्टर सापडला असणार आणि लोक त्याची धुलाई करीत असणार.

लोक आता थांबले होते. त्या कोलाहलातही त्याला पोलिस व्हॅनचा सायरन ऐकू आला. सायरनचा आवाज वाढत चालला होता. त्याने वर बघितले,चवथ्या मजल्यावरएक बाई खिडकीतून वाकली होती. ती शेजारच्या घरातील खिडकीतील पुरुषाला काही तरी ओरडून सांगत होती. हात लांब करून काही तरी दाखवत होती.

एकाएकी गोळयांच्या फैरी झाडल्याचा आवाज आला - कानठळया बसवणारा, थरकाप करणारा. मान उंचावून समोर पाहण्यासाठी समोरच्या माणसाच्या खांद्यावर हात ठेवून त्यान टाचा उंचावल्या, तोच त्याच्या डोक्यावर वेगाने खाली येणारी तांबडी-पांढरी आकृती त्याला दिसली. डोके खाली घालून, हात डोक्यावर घेऊन त्याने बाजूला सूरकांडी मारली. त्याचे पाय कशाला तरी अडकले व तो जोरात खाली आदळला. त्याचक्षणी त्याच्या शरीराला अडखळून एक माणूस त्याच्या अंगावरून पलीकडे जाऊन आदळला. त्या निसटत्या क्षणात त्याच्यापासून काही अंतरावर असलेल्या दुकानाच्या फळीखालील सुरक्षितता त्याच्या लक्षात आली. अंगातील सर्व शक्ती एकवटून त्याने कोसळलेल्या माणसाच्या त्याच्या अंगावर असलेल्या तंगडया बाजूला ढकलल्या. काही क्षणातच तो त्या फळीखाली पोहोचला. गुडघ्यांना छातीशी खेचून घेऊन तो काही क्षण तसाच पडून राहिला. त्याने आपले तोंड रस्त्याच्या बाजूला वळवले. तेव्हा त्याच्या गुडघ्यातून निघालेली कळ त्याच्या डोक्यापर्यंत पोचली.

क्षणभर त्याच्या डोळयांसमोर अंधार पसरला. डोळे घट्ट मिटून अगदी स्तब्ध राहिला तो काही क्षण. कपाळावरील घास पुसण्यासाठी हात हलविला, तेव्हा हात दुखावल्याचे त्याच्या लक्षात आले. कुणी तरी बुटाचा पाय त्याच्या हातावर दिला होता किंवा फलीवर कुठेतरी त्याचा हात आपटला होता. त्याच्या लक्षात आले, त्याचा हात रक्ताळलेला आहे.

त्याने नजर उचलली, तेव्हा एक थंड, निर्जीव नजरेत त्याची नजर अटकली.

त्याचे अंग शहारले. खिडकीतून डोकावणाऱ्या त्या स्त्रीची आकृती त्याने ताबडतोब ओळखली. तिचा लांबवलेला हात तिच्या शरीराखाली दुमडला गेला होता. उघडया जिवणीवर आश्चर्याचा भाव होता. तिचा प्रत्येक अवयव ओघळला होता. कुठेही ताठरपणा, कडकपणा नव्हता. हवा निघून गेलेल्या फुग्यासारखा तिचा देह चोळामोळा होऊन तिथे पडला होता. तिच्या कुशीखालून निघालेला रक्ताचा लाल प्रवाह रस्त्यावरून वाट काढीत पुढे पुढे सरकत होता. कित्येक क्षण त्याची नजर त्या प्रवाहावर खिळून राहिली.क्षणाक्षणाने, कणाकणाने पुढे सरकणाऱ्या त्या प्रवाहात त्याचे सर्व अस्तित्व बुडून गेले. वेडावल्यासारखा तो एकटक त्या सरकत्या, बदलत्या लाल आकाराकडे पाहात राहिला. आता आत कुठे तरी धोक्याची घंटा वाजत होती. सर्व इच्छाशक्ती कसाला लावून त्याने आपली नजर बाजूला वळविण्याचा प्रयत्न केला. त्याच्या कपाळावर घामाचे थेंब उभे राहिले. वेगाने होणाऱ्या त्याच्या श्वासोच्छवासाचा आवाज त्याला ऐकू येत होता. त्याच्या पाठीचा कणा थरथरू लागला. हा ताण त्याला असह्य झाला, डोळयांचा आणि मेंदूचा संबंधच तुटला होता जणूं!

- आणि अचानक त्याच्या शरीराचा आणि त्याच्या मनाचा सांधा जुळला. त्याच्या शरीराने हालचाल केली. क्षणार्धात तो आपल्या पोटावर आडवा होऊन त्या फळीखालून वेगाने रांगू लागला. रस्त्याच्या कोपऱ्यावर आल्यावर त्याने बाहेर डोकावले.त्याच्या समोरच, रस्त्याच्या पलिकडील बाजूस पोलिसांची व्हॅन उभी होती. गाडीजवळ कुणी तरी ओफिसर उभा होता. त्याच्या कमरेला लटकत असलेले पिस्तुल डिकीला दिसत होते. रस्ता पूर्ण रिकामा झाला होता. फक्त व्हॅनपासून काही अंतरावर चार-पाच पोलीस ओफिसर्स घाईघाईत काही तरी चर्चा करीत होते. व्हॅनमधील रेडिओ ओपरेटर ओरडून ओरडून रिपोर्ट देत होता. त्याने आपले डोके किंचित मागे वळवले, तोच कुणी तरी ओरडल्याचा आवाज त्याच्या कानी आला. त्याचबरोबर जड बुटांचा धप् धप् आवाज जवळ येत असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्या स्त्रीच्या प्रेताजवळ एक पोलीस ओफिसर उभा होता. क्षणभर त्याची आणि डिकीची नजर एकत्र भिडली. झटकन् डिकीने आपले शरीर फळीबाहेर खेचले अन तो सुसाट धावत सुटला.

रस्त्याच्या पलिकडील बाजूस इमारतीच्या दरवाज्याशी असलेली आणखीन दहा पंधरा माणसे त्याच्याबरोबर धावत सुटली. दूर, समोर लोकांचा जमाव पळताना दिसत

होता. काही पोलीस हातांतील काठ्या उंचावून त्यांचा पाठलाग करीत होते.धावता धावता तो आजूबाजूला बघत होता. त्याला एखाद्या गल्लीतून पळ काढणे आवश्यक होते. नाही तर समोर पोलीस आणि मागून पोलीस अशा कैचीत तो सापडला असता. धावता धावता डाव्या बाजूच्या बारीकशा बोळाशी एक मनुष्य उभा राहून हाताने खुणावत आहेसे त्याला दिसले. तो एकच क्षण घोटाळला, मागून इतरही माणसे धावत येत होती. त्यांच्या पावलांचा आवाज त्याला ऐकू येत होता. तो माणूस कदाचित त्यांच्यापैकी कुणाला तरी खुणा करीत असावा. त्याचाशेजारी कुणी तरी ओरडले.धावता धावता एक माणूस खाली कोलमडला होता. पाठीमागे पोलिसांचा आरडाओरडा ऐकू येत होता. एका क्षणात त्याने निर्णय घेतला. मागून येणाऱ्या माणसांना चुकवत त्याने आडवी धाव घेतली. तो रोडच्या दुसऱ्या बाजूला पोहोचला. तो त्या बोळाशी पोहोचला व थबकला. त्याने, तो ज्या दिशेने पळत आला, त्या दिशेकडे पाहिले. पण त्याचवेळी त्या माणसाने त्याच्या खांद्याला धरून त्याला आत खेचले.भयंकर उग्र दुर्गंध त्याच्या नाकात शिरला. तो मागे सरकणार होता, पण त्या माणसाने जोरदार धक्का मारून त्याला आत ढकलले आणि तो माणूसही आत आला. तो माणूस शरीराने उंच आणि धिप्पाड होता. त्याच्या पांढऱ्या पिवळया मिशा त्याच्या ओठांवर झुकल्या होत्या. त्याच्या खांद्यावरील तांबडा गमछा पाहून तो बिहारी असावा, हे डिकीच्या लक्षात आले. डिकी काहीतरी बोलणार, तो त्या माणसाने त्याच्या खांद्यावर थोपटून त्याला चूप राहण्याची खूण केली. दोन बिल्डिंग्जमधील फटीत ते उभे होते. खालून गटार वाहात होते. बाहेरील प्रकाशातून एकदम ह्या काळोख्या जागेत आल्याने त्याचे डोळे अंधारले होते. तो थकला होता. तो भिंतीवर रेलला, त्याने डोळे मिटले.

त्याने डोळे उघडले, तेव्हा आपण कुठे आहोत, हेच त्याच्या लक्षात येईना. भिंतीला टेकून तो उभ्याउभ्याच झोपी गेला होता, की अतीव ताण पडल्याने त्याला गुंगी आली होती? त्याने आठवण्याचा प्रयत्न केला.त्याने आजूबाजूला पाहिले, चांगला काळोख दाटला होता. बोळाच्या तोंडाकडून रस्त्यावरील प्रकाश आता येत होता. तो हळूहळू बाहेर आला.रात्र पडली होती. रस्त्यावरील स्ट्रीट लाईटसच्या प्रकाशात त्याने घडयाळ पाहिले. त्याचे घडयाळ बंद पडले होते.

खिशातून रुमाल काढून आपल्या गालांवर ओघळलेले अश्रू त्याने पुसले, तेव्हा रुमालाला लागलेले रक्ताचे डाग त्याला दिसले. त्याने वर बघितले. निरभ्र आकाशात चांदण्या चमचमत होत्या. त्या आकाशाच्या फितीकेड पाहात तो उभा राहिला. त्या आकाशाचा गारवा आपल्या डोळयांतून शरीरात झिरपत आहे आणि आपल्या नसानसात शिरून सर्व शरीरभर पसरत आहे, असे त्याला वाटले. रस्त्याच्या कडेने तो चालू लागला .दूर काही दुकाने उघडी दिसत होती. त्या दुकानांमधून येणारा प्रकाश

रस्त्यावर पडलेला दिसत होता .बाकी मधे रस्त्यावर अंधार होता. रस्त्यावरील बहुतेक सर्व स्ट्रीट लाईटस् फोडले गेले असावेत. त्याच्या गुडघ्यातून कळा निघत होत्या.

तो दुकानावरून पुढे सरकला. डाव्या बाजूला एक मोटारचा सांगडा जळत होता. फडफडणाऱ्या ज्वाळांचा आवाज त्याला ऐकू आला. मोटरच्या जवळ दोन पोलीस उभे होते.

तो पुढे सटकला. उजव्या बाजूस काही अलिशान बिल्डिंग्ज्च्या खिडक्यांतून येणारे प्रकाशझोत रस्त्यावर पडले होते. बिल्डिंगच्या आवारात नळ होता. डिकीने आपला चेहरा स्वच्छ धुतला. पँटवरील, शर्टवरील रक्ताचे डाग त्याने ओल्या रुमालाने घासून साफ करायचा प्रयत्न केला. नळाला तोंड लावून तो घटाघटा पाणी प्यायला.

तो फाटकापाशी आला. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पाहून त्याने आपण कुठे आहोत, याचा अंदाज घेतला. त्याच्या मनातील वादळ शांत झाले होते. त्याच्या मनातील सर्वच प्रश्नांना उत्तरे मिळाली नव्हती. पण ह्या प्रश्नांचे मूळ कुठे आहे, हे आपल्याला समजले आहे असे त्याला वाटत होते. आयुष्याच्या प्रत्येक क्षणाला ह्या प्रश्नांची उत्तरे शोधीत राहावी लागणार आहेत. कदाचित काही प्रश्न प्रश्नच राहणार आहेत. पण ह्या प्रश्नांची उत्तरे कुठे शोधायची, हे त्याला उमजले होते. त्याच्या मनातील गोंधळ दूर झाला होता.

हळूहळू रस्त्यावरील रहदारी वाढत होती. तो शहराच्या मुख्य भागाजवळ येत चालला होता. त्या छोटया हॉटेलमध्ये काही माणसे पुढयात चहाचे कप घेऊन बसली होती. हॉटेलच्या काउंटरवर बसलेल्या माणसाने त्याच्याकडे नजर टाकली. गरम गरम चहा पिण्याची तीव्र इच्छा त्याला झाली, पण तो तसाच पुढे चालत राहिला.

परत जुन्या जगात आल्यासारखे त्याला वाटत होते.

दोन्ही बाजूची दुकाने उघडी होती. कोपऱ्यावरील  दुकानांपुढे काही अंतरावर गाठोडयावर रेलून दोन स्त्रिया फूटपाथवर बसल्या होत्या. डोक्यामध्ये बोटे खुपसून कराकरा खाजवीत त्यातील एक बाई दुसऱ्या बाईला उच्च स्वरात काही तरी सांगत होती. त्या मायलेकी असाव्यात. मुलीची छाती थोडी उभार दिसत होती. बाकी दोघींमधे जाणवण्यासारखा दृश्य फरत नव्हता. मुलीच्या मांडीवर एक कोवळे मूल हातपाय हलवत पडले होते.

डिकीने खिशात हात घालून चाचपले स्टेशनमध्ये शिरता शिरता समोरून येणाऱ्या हातगाडीला वाट करून देण्यासाठी तो बाजूला झाला. लाऊड स्पीकरवरून अनाउन्समेंट चालू होती :

' नऊ बजकर चालीस मिनिटपर आनेवाली सियालड एक्स्प्रेस प्लॅटफॉर्म नंबर पाँचपर खडी है। इस गाडीसे आगे जानेवाले यात्री कृपया...'

खिशातून नोटा काढता काढता तो बुकींग ओफिसकडे वळला.

त्याला खिडकीजवळ जागा मिळाली, म्हणून तो खुष झाला. गाडी पुलावर आली, तेव्हा त्याने दीर्घ श्वास घेऊन ओला खारट वारा छातीत भरून घेतला. बाहेरचे आकाश पाहण्याचा त्याने प्रयत्न केला. पण खिडकीसमोरून सरकणाऱ्या ब्रीजच्या बीम्सशिवाय त्याला काहीच दिसले नाही. मधून मधून खोल खाली पाणी मात्र चमकताना दिसत होते.

त्याने खिशातून डॉक्टरांनी दिलेले पत्र काढले आणि बाहेर भिरकावले. वाऱ्याच्या झोतात ते उडून मागे गेले. डिकीचा हात परत खिशाकडे गेला. 'पे बुक' हातात घेऊन तो काही क्षण त्याकडे पाहात राहिला. त्याने पे बुक उघडले. डाव्या बाजूस असलेल्या फोटोमधून लान्स नायक डिकीचा चेहरा त्याच्याकडे पाहात होता. त्याने हात खिडकीबाहेर काढला आणि अलगद लान्स नायक डिकीचे 'पे बुक' त्याने खाली सोडून दिले. वाऱ्याच्या झोताने ते मागच्या दिशेला भिरकावले गेले. त्या खडखडाटात अन् धडधडाटात ते पाण्यात पडल्याचा आवाज ऐकण्यासाठी त्याने कान टवकारले. स्वतःशीच हसून त्याने इंजिनच्या दिशेने नजर वळवली.

____________ समाप्त ____________


ई साहित्य प्रतिष्ठान



१०० रुपयांत
३०० ई-पुस्तके
www.esahity.com
esahity@gmail.com
e साहित्य प्रतिष्ठान ®